CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक २२ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विनम्र अभिवादन



सामाजिक अन्यायाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष करणारे महात्मा जोतिबा फुले यांची आज पुण्यतिथी

## भाजपाचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग आज मोकळा होणार

# मोदी-शाह घेतील तो निर्णय मान्य : शिंदे

## भाजपा-शिवसेना-राकाँच्या नेत्यांची दिल्लीत होत आहे बैठक

◆ **मुंबई, २७ नोव्हेंबर**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाबाबत आणि सरकार स्थापनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल आणि शिवसेनेचे या निर्णयाला पूर्ण समर्थन असेल, असे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी स्पष्ट केले. ते येथे भरगच्च पत्रकार परिषदेत बोलत होते.



भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीचे राज्यातले प्रमुख नेते उद्या राजधानी दिल्लीत जात असून, तिथे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत त्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीत मुख्यमंत्रिपदाचा निर्णय तर होणारच आहे, मंत्रिमंडळाची रचनाही निश्चित केली जाणार आहे.

मला अडीच वर्षे मुख्यमंत्रिपद मिळाले. या अडीच वर्षांत राज्याच्या विकासासाठी असंख्य कामे करता आली. राज्यातल्या लाडक्या बहिणींचा लोकप्रिय भाऊ अशी ओळख मला मिळाली. एकही दिवस सुटी न घेता अविश्रांत काम करून राज्याला प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर केल्याचे समाधान मला आहे असे सांगताना एकनाथ शिंदे म्हणाले की, माझ्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह हे दोघेही अगदी पहाडाप्रमाणे माझ्या पाठीशी उभे राहिलेत. त्यामुळे ते जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल.

दोन दिवसांपासून एकनाथ शिंदे हे नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र, आपण कोणत्याही प्रकारे नाराज नसल्याचे आणि महायुतीसोबत भक्कमपणे उभे असल्याचे शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केल्याने तर्क-वितर्कांना विराम मिळाला आहे.

महायुती म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढलो असून आमच्यात कुठलीही नाराजी नसल्याचे त्यांनी वारंवार स्पष्ट केले. तसेच, महायुती मजबूत असून जनतेने जो जनादेश दिलाय तो लक्षात घेऊन आता आणखी खूप काम करायचे आहे, नापी है जमीन पुरा आसमान बाकी है... असे म्हणत एकनाथ शिंदेंनी एकप्रकारे मुख्यमंत्रिपदाच्या निरोपाचेच भाषण केल्याचे पाहायला मिळाले.

दोन दिवस कुठे होतात या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर त्यांनी दिल्याने महायुतीमध्ये कोणत्याही प्रकारे ताण नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. मंगळवारी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांच्याशी फोनवर बोलल्याची माहिती देखील एकनाथ शिंदेंनी दिली. तसेच, नव्या मंत्रिमंडळात त्यांचे काय स्थान असेल, या प्रश्नावरही त्यांनी उत्तर दिले.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना म्हटले की, महायुतीने केलेले काम आणि लोकांनी दाखवलेला विश्वास हेच महायुतीच्या विजयाचे कारण आहे. एकीकडे विकास आणि दुसरीकडे कल्याणकारी योजनांची सांगड आम्ही घातली, महायुतीच्या सर्वांनीच खूप काम केले. मी पहाटेपर्यंत काम करायचो आणि तीन-चार तास झोप घेऊन पुन्हा कामाला लागायचो. मी कालही कार्यकर्ता होतो, आजही कार्यकर्ता आहे आणि कार्यकर्ता म्हणूनच काम करेन, असे शिंदेंनी स्पष्टपणे सांगितले.

सर्वसामान्यांसाठी मी काम केलंय, गरीब कुटुंबीयांच्या वेदना मला समजत होत्या, त्यामुळे मी त्यांना डोळ्यांसमोर ठेवून काम केलं. अडीच वर्षांच्या काळामध्ये केंद्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचं पाठबळ आमच्या पाठीमागे होते. अडीच वर्षे त्यांनी मला मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली, मी त्यांना धन्यवाद देईन. कारण, आमच्या सरकारने घेतलेले अनेक निर्णय हे क्रांतिकारक ठरले आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ अशी माझी ओळख निर्माण झाली. मला सर्व पदांपेक्षा ही ओळख मोठी वाटते. मी समाधानी असून, गेल्या अडीच वर्षांत केलेल्या कामाबाबत आनंदी आहे. आम्ही नाराज होऊन लढणारे नाही, तर लढून काम करणारे आहोत. विधानसभा निवडणुकीतील आजचा विजय हा ऐतिहासिक आहे. मी माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत महाराष्ट्राच्या जनतेसाठी काम करेन. मला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोन आला होता, मी त्यांनाही फोनवर बोलताना सांगितले की, एनडीएचे प्रमुख म्हणून तुम्ही जो निर्णय घ्याल तो मला मान्य राहील. मी गृहमंत्री अमित शाह यांना देखील फोन केला होता. त्यांनाही धन्यवाद दिले, असे शिंदे म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### पुन्हा येणार...



### ‘इस्कॉन’वरील बंदीसाठी बांगलादेशात याचिका

**ढाका, २७ नोव्हेंबर**

बांगलादेश सरकारच्या हिंदू धर्माविरोधातील कारवाया सुरू आहेत. आता इस्कॉन या हिंदू संघटनेवर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.

बांगलादेश सरकारने इस्कॉनला धार्मिक कट्टरतावादी संघटना म्हणून संबोधले. या संघटनेची चौकशी सुरू असल्याचे बुधवारी सांगितले. दरम्यान, सनातनी जागरण ज्योत या हिंदू संघटनेचे प्रवक्ते चिन्मय प्रभू यांना बांगलादेशातील मोहम्मद युनूस सरकारने देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक केली. या कारवाईविरोधात बांगलादेशात निदर्शने सुरू आहेत.

बांगलादेशात राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याप्रकरणी ३० ऑक्टोबर रोजी चिन्मय प्रभू यांच्यासह १९ जणांवर देशद्रोह कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. २५ ऑक्टोबर रोजी सनातन जागरण मंचने चितगाव येथील लालदिघी मैदानावर आठ कलमी मागण्या घेऊन रॅली काढल्याचा आरोप आहे. यावेळी चौकात असलेल्या आझादी स्तंभावर काही लोकांनी भगवा ध्वज फडकावला होता. या ध्वजावर आमी सनातनी असे लिहिले होते. याबाबत चिन्मय प्रभू यांच्यावर राष्ट्रध्वजाचा अवमान आणि अपमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. इस्कॉनने निवेदनात म्हटले आहे की, चिन्मय प्रभू हे बांगलादेशातील अल्पसंख्यकांच्या हक्कांसाठी बोलतात. सरकारनेही नागरिकांच्या हक्कांचे रक्षण केले पाहिजे.

### महत्त्वाचे

### निर्देशांक, निफ्टीच्या वाढीने गुंतवणूकदारांना दिलासा

**मुंबई :** बुधवारी देशांतर्गत शेअर बाजाराचा कारभार सपाट सुरू झाला होता. मात्र, सत्राच्या शेवटी बाजार तेजीसह बंद झाला. आठवड्याच्या तिसऱ्या दिवशी निर्देशांकातील ३० पैकी १६ कंपन्यांचे शेअर्स वधारले होते आणि उर्वरित १४ शेअर्स तोट्यात होते. निफ्टीतील ५० पैकी २५ शेअर्स फायद्यात होते. दिवसभरातील कारभारात अदानी पोर्ट्सचे शेअर्स सर्वाधिक नफ्यात राहिले. त्यापाठोपाठ एनटीपीसी, एचडीएफसी, बजाज फायनान्स, मारुती सुझुकी, जेएसडब्ल्यू, ॲक्सिस बँक, महिंद्रा, नेस्ले इंडिया आदींचा समावेश होता. बाजारात सत्राअखेरच्या तेजीचा गुंतवणूकदारांना फायदा झाला आणि बाजार भांडवल तब्बल ४.८२ लाख कोटींनी वाढले.



### दिवसाढवळ्या लुटली कारंजातील नर्सरी

**कारंजा लाड :** काही वर्षांपासून कारंजा शहरातील बायपास परिसरात उत्तरप्रदेशातील रहिवासी नरेश शाह याने नर्सरी थाटली होती. नर्सरीतून तो फूल व फळझाडांची विक्री करीत असे. चार दिवसांपासून तो परिसरात न आढळल्याने नर्सरी मालक फरार झाल्याचे समजून नागरिकांनी बुधवार, २७ नोव्हेंबरला दिवसाढवळ्या नर्सरीतील दोन लाखांच्या फूल व फळझाडांवर हात साफ केला. सूत्रांच्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ११ वाजता नर्सरी मालक फरार झाल्याचे लोकांच्या निदर्शनास आले. त्यांनी नर्सरीमधील फूल व फळझाडे नेण्यासाठी एकच गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत नागरिकांनी फूल व फळझाडांवर हात साफ केला होता. नर्सरी मालक नरेश शाहकडे कारंजा शहरातील पतसंस्थांसह खाजगी सावकारांचे जवळपास ३० लाखांचे कर्ज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नागरिकांनी लंपास केलेल्या मालात फूल व फळझाडांसह पणत्या, मातीच्या व प्लॅस्टिकच्या कुंड्यांचा समावेश आहे. वृत्त लिहिस्तोवर या संदर्भात पोलिसात कुठल्याही प्रकारची तक्रार दाखल केली नव्हती.

**कर्जापायी मालक बेपत्ता झाल्याची माहिती**

### नाशिक पश्चिममध्ये होणार फेरमतमोजणी

**नाशिक :** नाशिक पश्चिम येथील शिवसेना ठाकरे गटाचे पराभूत उमेदवार सुधाकर बडगुजर यांनी फेरमतमोजणी मागणी केली होती. ती मागणी निवडणूक आयोगाने मान्य केली आहे. नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक मतदारसंख्या असणाऱ्या नाशिक पश्चिम मतदारसंघात पुन्हा ‘कमळ’ फुलले. महायुतीतील भाजपाच्या उमेदवार सीमा हिरे यांनी एक लाख ४१ हजार ७२५ मते मिळवत विजयाची हॅट्‌ट्रिक साधली. येथे १५ उमेदवारांमध्ये आमदार हिरे या एकमेव महिला उमेदवार होत्या. शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांचा हिरे यांनी ६८,१७७ मतांनी पराभव केला. बडगुजरांना ७३,५४८ मते मिळाली. मनसेचे दिनकर पाटील यांना ४६,६४९ मते घेऊन तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्यानंतर आता अनेक ठिकाणी ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार केल्याचा दावा करीत फेरमतमोजणीची मागणी केली. नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक मतदारसंख्या असणाऱ्या नाशिक पश्चिम मतदारसंघात पुन्हा ‘कमळ’ फुलले. अनेक मतदारसंघामध्ये मृत व्यक्तींच्या नावानेही मतदान झाल्याचा दावा काही मतदारसंघामध्ये करण्यात आला आहे.

## महायुती मजबूत, अभेद्य; शिंदेंच्या भूमिकेचे स्वागत

◆ **नागपूर, २७ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार मजबूत आणि अभेद्य आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय करेल तो सर्वांनाच मान्य असेल, असे सांगत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचे समर्थन केले. आमची लढाई मुख्यमंत्रिपदासाठी नाही, तर महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी आहे, असे ते म्हणाले.

नागपूर येथे पत्रकार परिषेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी, एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचे स्वागत करताना आभार मानले. डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून राज्याला पुढे नेण्याचे काम केले, असे सांगून बावनकुळे म्हणाले की, शिंदे यांची भूमिका महाराष्ट्राला पुढे नेणारी आहे. महायुतीच्या अभूतपूर्व विजयात तिन्ही नेते आणि सर्व घटक पक्षांची मेहनत असून, त्यामुळे मोठा जनादेश मिळाला आहे. युती सरकारचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या योजनांना बंद करण्याचे काम महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. बंद पडलेल्या विकास प्रकल्पांना गती देण्याचे काम मुख्यमंत्री शिंदे यांनी केले आहे.

यावेळी बावनकुळे म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना एकनाथ शिंदे यांनी एक मंत्री म्हणून उत्कृष्ट काम केले. फडणवीस यांच्या खांद्याला खंदा लावून समृद्धी महामार्गासारखा मोठा महामार्ग पूर्ण केला. उद्धव ठाकरे यांनी भाजपाला धोका दिला. हे शिंदे यांना पटले नाही आणि त्यासाठी हिंदुत्वाची भूमिका घेऊन, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराला पुढे घेऊन महायुतीचे सरकार सत्तेत आणण्यासाठी मोठी भूमिका घेतली होती.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्यावेळी महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी आणि मित्र पक्षांनी एकत्र काम केले. आतापर्यंतच्या इतिहासात इतके प्रचंड बहुमत मिळाले नव्हते. तेवढे संख्याबळ आमच्या महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी मिळवले आहे. मोदींच्या नेतृत्वात महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी बहुमत मिळवले आणि महायुती भक्कम करण्याचे काम केले, याकडे बावनकुळे यांनी लक्ष वेधले. ◂(तभा वृत्तसेवा)

### चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून समर्थन



### सीईटीचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

◆ **पुणे, २७ नोव्हेंबर**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षांचे (सीईटी) संभाव्य वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) जाहीर केले. त्यानुसार अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची एमएचटी-सीईटी ९ ते २७ एप्रिल या कालावधीत घेतली जाणार आहे.

९ ते १७ एप्रिल या कालावधीत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (पीसीबी) या गटासाठीची, तर १९ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीबी) या गटासाठीची परीक्षा घेतली जाणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## भाजपाचे कार्यकारिणी निवडणुकीसाठी पर्यवेक्षक नियुक्त

### विनोद तावडेंकडे उत्तरप्रदेश, बिहारची जबाबदारी

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी पक्षाच्या कार्यकारिणी निवडणुकीसाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. त्यात विनोद तावडे यांच्याकडे बिहार आणि उत्तरप्रदेशची जबाबदारी सोपविण्यात आली आहे तसेच महाराष्ट्राचे प्रभारी अरुणसिंह राहणार आहेत.

श्रीकांत शर्मा उत्तराखंड, सुनील बन्सल पश्चिम बंगाल, आसाम, झारखंड आणि हरयाणाचे पर्यवेक्षक आहेत. तरुण चुग यांना केरळ, तामिळनाडू, पुड्डुचेरी, कर्नाटक आणि लक्षद्वीपचे पर्यवेक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. शिवप्रकाश यांना मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणाची जबाबदारी देण्यात आली असून, अरुणसिंह यांच्याकडे महाराष्ट्रासह गोवा, दमण, दादरा नगर हवेलीही सोपविण्यात आले आहे. राजस्थान, पंजाब, चंदिगड आणि गुजरातच्या पर्यवेक्षकपदी राधा मोहन दास यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या पर्यवेक्षकांची मुख्य जबाबदारी संबंधित राज्यांमध्ये होणाऱ्या पक्षाच्या संघटनात्मक निवडणुकीची निगराणी करावी लागेल. जेणेकरून पक्षाची आंतरिक संरचना मजबूत आणि पारदर्शक राहील. या नियुक्त्यांसोबतच पक्षाने आपल्या संघटनात्मक निवडणुकीसाठीची तयारीला गती दिली आहे. ◂(वृत्तसंस्था)



लोकसभेचे माजी सभापती जी. व्ही. मावळणकर यांच्या जयंतीनिमित्त संविधान सदन येथे बुधवारी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला व इतर मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली

## अजमेर दर्ग्याबाबत हिंदू पक्षाची याचिका स्वीकारली

### शिवमंदिर असल्याचा दावा

◆ **अजमेर, २७ नोव्हेंबर**

अजमेरच्या ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यात संकट मोचन महादेव मंदिर असल्याचा दावा करणारी याचिका अजमेर दिवाणी न्यायालयाने स्वीकारली. बुधवारी न्यायालयाने ती सुनावणीस योग्य मानली. हिंदू सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विष्णू गुप्ता यांच्या वतीने ही याचिका दाखल करण्यात आली आहे.

दिवाणी न्यायालयाने अल्पसंख्यक व्यवहार मंत्रालय, दर्गा समिती अजमेर आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला (एएसआय) नोटीस पाठवली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० डिसेंबर होणार आहे. याचिकेत निवृत्त न्यायाधीश हरविलास शारदा यांनी १९११ मध्ये लिहिलेल्या ‘अजमेर : हिस्टोरिकल ॲण्ड डिस्क्रिप्टिव्ह’ या ऐतिहासिक आणि वर्णनात्मक पुस्तकाचा हवाला देत, असा दावा करण्यात आला की, दर्ग्याच्या बांधकामात मंदिराचा मलबा वापरण्यात आला होता. ◂(वृत्तसंस्था)

### पुरातत्त्व विभागाने चौकशी करावी

विष्णू गुप्ता म्हणाले, तुम्ही अजमेर दर्ग्याभोवती फिराल, तर तुम्हाला दिसेल की बुलंद दरवाजावर हिंदू परंपरा कोरलेली आहे, जिथे शिवमंदिर आहे. तिथे नक्कीच धबधबे, झाडे इ. तिथे पाणी नक्कीच आहे. अशा स्थितीत पुरातत्व विभागाकडेही चौकशी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### युनिफाईड लायसन्सला मंजुरीची शक्यता

**नवी दिल्ली :** अधिवेशनात विमा कायद्यात सुधारणा करण्याचा सरकारचा विचार आहे. विमा कंपन्यांसाठी युनिफाईड परवाना आणि या क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीची मर्यादा सध्याच्या ७४ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत वाढविली जाईल. त्यामुळे विम्याचा आवाका वाढेल.

### ईपीएफच्या रकमेत सहा वर्षांत पाच पटीने वाढ

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या (ईपीएफ) निष्क्रिय खात्यांमधील एकूण रक्कम आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ८ हजार ५०५ कोटी रुपयांवर पोहोचली असून या रकमेत सहा वर्षात पाच पटीने वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये ही रक्कम १ हजार ६३८ कोटी रुपये होती. ईपीएफ योजना १९५२ मधील परिच्छेद ७२ (६) अंतर्गत वर्गवारी करण्यात आलेली निष्क्रिय खाती आहेत. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अखेरीस २१ लाख ५५ हजार ३८७ निष्क्रिय खाती आहेत.


## ‘फेंगल’ चक्रीवादळ आज आणखी तीव्र होणार

### तामिळनाडूमध्ये मुसळधार पाऊस

### जनजीवन विस्कळीत

◆ **चेन्नई, २७ नोव्हेंबर**

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचे मंगळवारी तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतर झाले. आज त्याचे चक्रीवादळात रूपांतर झाले आहे. हे चक्रीवादळ गुरुवारी तामिळनाडूच्या किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता आहे. सध्या बंगालच्या उपसागराच्या नैर्ऋत्य भागात खोल दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे पंबनमध्ये जोरदार वारे वाहत आहेत. भारतीय हवामान विभागानुसार, कमी दाब क्षेत्र उत्तर-वायव्येकडे सरकण्याची आणि आज चक्रीवादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.



तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक जिल्ह्यांतील शाळा बंद आहेत. फेंगल वादळाने आज चक्रीवादळाचे रूप धारण केले आहे. या चक्रीवादळाचे अनेक राज्यांवर परिणाम होणार आहेत. मात्र, याचा सर्वाधिक फटका तामिळनाडूला बसण्याची शक्यता आहे.

पुढील ३ दिवस तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे तामिळनाडूतील अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडत आहे. फेंगल चक्रीवादळाच्या पृष्ठभूमीवर अधिकाऱ्यांनी चेन्नई, चेंगलपट्टू, तिरुवल्लूर, विलुप्पुरमसह अन्य जिल्ह्यांतील शाळांना सुटी जाहीर केली आहे. हवामान विभागाने आज तामिळनाडूच्या तीन जिल्ह्यांत आणि पुडुचेरीच्या एका जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कसे पडले ‘फेंगल’ नाव?

या वादळाला फेंगल हे नाव सौदी अरबने दिले असून, त्याचा अर्थ आक्रमक असा होतो. हिंदी महासागरात यंदाच्या वर्षभरातील हे तिसरे चक्रीवादळ आहे. जागतिक हवामान संघटना (डब्ल्यूएमओ) आणि युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक ॲण्ड सोशल कमिशन फॉर आशिया ॲण्ड द पॅसिफिकद्वारे देखरेख केलेल्या पद्धतशीर प्रक्रियेचा भाग म्हणून चक्रीवादळ फेंगलला त्याचे नाव मिळाले. या संस्था हिंद महासागर क्षेत्रासाठी चक्रीवादळ नामकरण व्यवस्थापित करतात, ज्यात भारत, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव आणि ओमानसारख्या देशांचा समावेश आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हिंदूंवरील अत्याचारांकडे बांगलादेशी डोळेझाक

बांगलादेशातील हिंदूंना प्रताडित करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. याविरुद्ध जगभरातील हिंदूंनी आवाज उठवला आहे. भारतात तर त्याविरुद्ध आवाज उठवून, तेथील हिंदूंना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तथापि, बांगलादेशचे विद्यमान सरकार हिंदू कसे कचाट्यात सापडतील, त्यांच्याविरुद्ध गुन्हे कसे दाखल होतील, त्यांना तुरुंगवासाची हवा कशी दाखवली जाऊ शकेल, हिंदूंना देशद्रोही कसे ठरवले जाऊ शकेल, याच प्रयत्नात आहे. खरे तर जगाच्या पाठीवर जिथे कुठे हिंदू आहेत तेथे ते अतिशय शांतपणे आपली नोकरी अथवा व्यवसाय, त्या-त्या देशातील कायद्यानुसार आणि त्या देशातील घटना प्रमाण मानून करीत आहेत. हिंदू समाजाच्या शांतता आणि सामाजिक सौहार्दतेचा गुण ध्यानात घेऊनच अनेक देशांत हिंदूंचे निरनिराळे सण मोठ्या प्रमाणात साजरे व्हायला लागले असून, हिंदूंना आपल्या धर्मानुसार पूजा पद्धतीचा अधिकार दिला गेला आहे. जगाच्या इतिहासाचा धांडोळा घेतल्यास हिंदूंचे त्या त्या देशाच्या विकासात आणि आर्थिक प्रगतीत मोलाचे योगदान असल्याचे स्पष्ट होते. पण बांगलादेशातील मुस्लिम नागरिक आणि तेथील इस्लामी शासक हिंदूंना पूजा पद्धतीचे स्वातंत्र्य देण्यास कुचराई करीत आहे. एवढेच कमी की काय, म्हणून हिंदूंवरील अत्याचारांकडे डोळेझाक करण्याचे कामही करीत आहे. अशी अनेक प्रकरणे उघडकीस आली असून त्यातील नुकतेच घडलेले एक प्रकरण जगभरात चर्चेत यायला हवे. हिंदू समाजात जनजागृती करणारे आणि देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेले बांगलादेशमधील हिंदू नेते चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांना बांगलादेशमधील न्यायालयाने जामीन नाकारून त्यांची रवानगी तुरुंगात केली आहे. त्यांच्या अटकेविरोधात चितगाव आणि ढाक्यात आंदोलने उभी राहिली नसती तरच नवल. भारतीय आंदोलकांनी रस्त्यारस्त्यांवर धरणे आणि घोषणा देत चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांच्या सुटकेची मागणी केली आहे. भारताने या घटनेवर गंभीर चिंता व्यक्त केली असून, हिंदूसह सर्व अल्पसंख्यकांच्या सुरक्षेची हमी बांगलादेशने द्यावी, अशी मागणी केली आहे. तथापि, त्यांच्या अटकेबाबत भारतातील धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षांच्या नेत्यांनी साधलेली चुप्पी अनाकलनीय आहे. बांगलादेशात काही वावगे घडतच नाही, अशी स्वतःची धारणा त्यांनी बनवून टाकली आहे.

बांगलादेश पोलिसांनी सोमवारी चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांना ढाक्यामधील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून अटक केली. सम्मिलित सनातनी जोत या हिंदू संघटनेचे नेते असलेले दास चितगावकडे जात होते. त्यांच्यासह १८ जणांविरोधात ३० ऑक्टोबर रोजी खटला दाखल करण्यात आला आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या नेत्याने त्यांच्याविरोधात तक्रार केली आहे. २५ ऑक्टोबर रोजी हिंदू समुदायाच्या रॅलीदरम्यान बांगलादेशच्या राष्ट्रीय ध्वजाचा अपमान केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. शेख हसीना सरकार कोसळल्यापासून ५० जिल्ह्यात हिंदू अल्पसंख्यकांवर २०० हून अधिक हल्ले झाले आहेत. सध्या शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. भारताने दास यांच्या अटकेच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करून बांगलादेश सरकारकडून हिंदूंसह सर्व अल्पसंख्यकांच्या सुरक्षेची हमी मागितली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन प्रसिद्ध केले असून, त्यानुसार बांगलादेशात हिंदूंची कशी गळचेपी होत आहे, याकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. देशातील सत्तापरिवर्तनानंतर हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांवर बांगलादेशमधील अतिरेकी घटकांकडून हल्ले करण्यात आले आहेत. अल्पसंख्यकांची घरे आणि व्यावसायिक आस्थापनांची जाळपोळ आणि लूटमारीच्या अनेक घटना नोंदविल्या गेल्या आहेत. तसेच, बांगलादेशमधील मंदिरांत चोरी आणि देवतांच्या विटंबनेच्या घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने या घटनांतील दोषी मोकाट फिरत आहेत आणि वैधानिक मार्गाने शांततापूर्ण मागणी करणाऱ्या धार्मिक नेत्याविरुद्ध आरोप केले जात आहेत. विशेष बाब म्हणजे दास यांच्या अटकेच्या निषेधार्थ शांतिपूर्ण निदर्शने करणाऱ्या अल्पसंख्य समाजाच्या लोकांवरही हल्ले होत असून, त्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलिस प्रशासन बिचकत आहे. शांतिपूर्ण निदर्शकांवरच अवैध मागण्या करीत असल्याचे आरोप जडले जाऊ लागले आहेत. दास यांच्या अटकेबाबत इस्कॉनने भारत सरकारकडे मागणी करून त्यांच्या सुटकेचा मुद्दा बांगलादेशच्या सरकारपुढे उपस्थित करण्याची विनंती केली आहे. इस्कॉनची मंदिरे अनेक देशांत उभारली गेली असून ती वास्तुकलेचा नमुना म्हणूनही ओळखली जातात. विविध देशांतील भिन्नधर्मीय लोक इस्कॉन चळवळीशी आपले नाते जोडून, श्रीकृष्ण भक्तीतून आत्मिक सुखाचा आनंद घेत आहेत. कुठल्याच देशात इस्कॉनचा संबंध दहशतवादाशी जोडला गेल्याचे उदाहरण नाही. याउपरही बांगलादेशातील एका नेत्याने केलेल्या आरोपावरून इस्कॉनच्या एका प्रभावशाली नेत्याला अटक होणे, ही बाब दुर्दैवीच म्हटली जायला हवी.

बांगलादेश आता पाकिस्तानी आयएसआयच्या कचाट्यात पुरता सापडला असून, त्याने देशात वेगाने इस्लामी कायदे लावण्याचा सपाटा लावला आहे. स्वातंत्र्यापूर्वी या देशात अस्तित्वात असलेल्या हिंदूंची संख्या घटून काही लाखांपर्यंत मर्यादित झाली आहे. माजी पंतप्रधान शेख हसीना सत्ताच्युत झाल्यानंतर तेथील परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. देशात विकास आणि पायाभूत सुविधांची निर्मिती होण्याऐवजी त्याच्याभोवतीची जिहादी उन्मादी तत्त्वांची मगरमिठी अधिकच घट्ट होत चालली आहे. येत्या काळात पाकिस्तानप्रमाणे बांगलादेशालाही भिकेचे डोहाळे लागले तर नवल वाटून घेऊ नये. पाकिस्तानात ज्याप्रमाणे ईशनिंदेचा दानवी कायदा अस्तित्वात आहे, त्याच धर्तीवर येथेही इस्लाम आणि मोहम्मद पैगंबराबाबत टीका-टिप्पणी करणाऱ्याला मृत्यूची शिक्षा देण्याची तरतूद करण्याची तयारी सुरू झाली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पाकिस्तानप्रमाणेच येथेही या नव्या येणाऱ्या कायद्याच्या आडून अल्पसंख्यक हिंदूंना प्रताडित केले जात आहे. बांगला सरकारच या कायद्याबाबत गांभीर्याने विचार करीत आहे, असे नसून बांगलादेश उच्च न्यायालयाच्या एका पीठानेही याबाबत एक निर्णय देऊन, कुराण तथा मोहम्मद पैगंबराबाबत विनाकारण भडकाऊ टिप्पणी करणाऱ्याला मृत्युदंड द्यायला हवा, असे मत नोंदविले आहे. संसदेने याबाबत विचार करावा, अशी शिफारस खंडपीठाने केली आहे. त्यामुळे इस्लामविरोधासाठी मृत्युदंडाचा कायदा येत्या काळात तेथे अस्तित्वात येईल, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. न्यायालयाने अशा प्रकारचे मत नोंदविणे, याकडे बांगलादेशच्या संपूर्ण इस्लामीकरणाचा घाट, या दृष्टीने बघितले जाऊ लागले आहे. युनूस यांच्या अंतरिम सरकारने यापूर्वीच इस्लामीकरण आणि शरिया कायद्याच्या अस्तित्वाचे संकेत दिलेले आहेत. यातूनच तेथील कट्टर मुस्लिम आणि पाकिस्तानी आयएसआयच्या कात्रीत सापडलेल्या सरकारलाही हिंदूंच्या रक्ताची चटक लागलेली आहे. शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर देशातील जिहाद्यांनी सर्वत्र जो हैदोस घातला तो जगाने अनुभवला आहे. हिंदूंची घरे जाळून टाकणे, हिंदू कलाकारांना मारझोड करून त्यांच्या घरांची लुटालूट करणे, हिंदू मुली-बायका यांच्यावर सामूहिक अत्याचार, हिंदू परिवारांना त्यांच्या घरातून हाकलून लावत त्यांच्या संपत्तीचा कब्जा घेणे, या प्रकारांकडे हताशेने बघण्यापलीकडे भारत काहीही करू शकलेला नाही. बांगलादेशातील अंतरिम सरकारने देशात सौदी अरबमधील मदीना मशिदीप्रमाणे मोठी मशीद उभारण्याचे सुतोवाच केले आहे. त्यामुळे आता बांगलादेशात धर्मनिरपेक्षता या शब्दाचा उच्चार करणेही धोक्याचे ठरणार आहे. बांगलादेशात अमेरिकेतील वोकिझमचा पुरस्कार करणाऱ्यांचे युनूस सरकार सत्तेत असून, या सरकारने दास यांच्या अटकेच्या निमित्ताने देशाच्या पुढच्या हिंसक प्रवासाची नांदी दिली आहे. देशातील कायदे, फौजा, पोलिस, विद्यापीठे आणि प्रशासन सरकारच्या नियंत्रणात असल्याचा देखावा निर्माण केला जात असला, तरी या यंत्रणांच्या चाव्या प्रत्यक्षात इस्लामी उन्मादींच्या हाती असल्याच्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. दास यांची अटक प्रातिनिधिक म्हणत, भविष्यात होणाऱ्या कठोर हल्ल्यास सामोरे जायची तयारी हिंदू समुदायाने ठेवायला पाहिजे.

## इतस्तत:

### रडणे ईव्हीएमवर

**डॉ. विवेक राजे**

हरयाणा आणि जम्मू-काश्मीर मागोमाग झारखंड, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश (पोटनिवडणूक) राज्य विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले. लागलीच काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी आपला ‘ईव्हीएम’ राग आळवायला सुरुवात केली. २०१४ पासून काँग्रेस प्रत्येक निवडणूक पराभवानंतर हे रडगाणे नित्यनेमाने गात असते. कारण काँग्रेसला काही झाले तरी आपली धोरणे चुकताहेत; किंबहुना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासूनच चुकताहेत, हे मान्य करायचे नाही. गांधी-नेहरू घराण्याची एकाधिकारशाही सोडायची नाही. सगळ्याच राज्यकर्त्या कुटुंबात जन्माला येणारी तिसरी-चौथी पिढी ही कर्तृत्वहीन निपजते, हे त्रिकालाबाधित सत्य मान्य करून पक्षांतर्गत खरी लोकशाही या पक्षाला स्थापित करावयाची नाही. हिंदुहिताची धोरणे वारंवार पराभूत होऊनही आखायची नाहीत आणि या हिंदुस्थानातील अस्सल हिंदू संस्कृती आपली म्हणायचीदेखील नाही. माणसाला रस्ते, वीज, पाणी, पैसा या पलीकडे सामूहिक आणि सांस्कृतिक सुरक्षा व या गोष्टीचा विकास हवा असतो, हे समजूनही घ्यायचे नाही. आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या खऱ्या वारस्याचे जतन करायचे असते, हेही लक्षात घ्यायचे नाही. गांधींनी सांगितलेल्या बेगडी तत्त्वज्ञानावरच गुजराण करायची असेल तर फारच फार दोन एक पिढ्या करू शकतात, हेही ध्यानात घ्यायचे नाही. भाकरी फिरवावी लागते हे तोंडाने फक्त बोलत राहायचे; प्रत्यक्षात कृती मात्र करायची नाही. मग दोष देण्यासाठी लोकशाही व्यवस्थेत उरते फक्त ईव्हीएम...

भारतीय निवडणुकांत ईव्हीएमचा वापर सुरू होऊन आता ४० वर्षे झाली. अनेकांनी अनेकदा या मशीन्सच्या कार्यपद्धती आणि संपूर्ण सुरक्षिततेची हमी देऊन झाली आहे. सर्वोच्च न्यायालयानेदेखील या मशीन्सचा अभ्यास करून त्या सर्व दोषांपासून मुक्त असल्याचा निर्वाळा दिला आहे. निवडणूक आयोगाने तर काही वर्षांपूर्वी ते मशीन हॅक करून दाखवावे म्हणून खुले आव्हान दिले होते. तेव्हाही या पृथ्वीवरील कोणीही माईचा लाल हे मशीन हॅक करण्याचे आव्हान स्वीकारायला पुढे आला नव्हता, हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतात अनेक वर्षे कागदी मतपत्रिकेच्या साहाय्याने निवडणुका घेतल्या गेल्या. परंतु प्रक्रिया अत्यंत खर्चीक, संथ, अपारदर्शक आणि पर्यावरणास प्रतिकूल होती. त्यामुळे भारतीय निवडणूक आयोगाने ‘ईव्हीएम’चा वापर निवडणुकांत करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात आणि प्रायोगिक स्तरावर या मशीन्सचा वापर केल्यानंतर लोकसभा निवडणूक-२००४ पासून लोकसभा आणि राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीन्सचा पूर्णपणे वापर सुरू झाला. २००४ च्या निवडणुकीत भाजपाचा पराभव करून काँग्रेसचे डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान झाले. त्यानंतर २००९ मध्येदेखील काँग्रेस लोकसभेच्या निवडणुकीत यशस्वी झाली. या दोन्ही वेळेस काँग्रेस वा विरोधी पक्षाला ईव्हीएम मशीन्स सुरक्षित वाटत होत्या. त्या हॅक होण्याची कोणतीही शक्यता हाच पक्ष फेटाळून लावत होता. देशात निवडणूक आयोगाचे गठन करण्यात आले तेव्हा काँग्रेस पक्षच सत्तेवर होता. निवडणूक आयुक्तांची संख्या एकवरून तीनवर नेली तेव्हादेखील काँग्रेस पक्षच सत्तेवर होता. ईव्हीएम मशीन्सचा सरसकट वापर या देशात सुरू झाला तेव्हाही काँग्रेस पक्षच सत्तेत होता, हे लक्षात घेतले पाहिजे. या ईव्हीएम मशीन्सचा जेव्हा २००४ मध्ये पहिल्यांदा लोकसभेच्या निवडणुकीत सरसकट वापर केला गेला, तेव्हा फक्त एकदा आणि एकदाच लालकृष्ण अडवाणी यांनी या मशीन्सवर संशय व्यक्त केला होता. पण त्यानंतर कधीही भाजपाचा कोणताही नेता आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम मशीन्सवर फोडताना पाहिलेला नाही. भारतातील बहुतेक राजकीय पक्षांनी विचारधारेशी बांधिलकी केव्हाच सोडून दिलेली आहे तसेच राजकीय पक्षांच्या नेत्यांना चारित्र्य या विषयाशी काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. समाजजीवनात, त्यातही राजकीय भूमिका निभावताना भारतासारख्या बहुधर्मीय देशात, प्रमुख धर्मांची काही माहिती, अभ्यास असावा, असेही यांना वाटत नाही. अनेक पक्षांच्या सल्लागारांना पक्षाला या ना त्या मार्गे सत्तेवर कसे येता येईल, एवढाच विचार करता येतो, असे समजण्यास जागा आहे. कारण निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र आणि निःपक्ष संस्थेविरुद्ध आपण ईव्हीएमच्या नावे जेव्हा गळे काढतो, तेव्हा बदनाम करीत असतो, याचेही भान राहिलेले दिसत नाही. कोणतेही संघटनात्मक काम करायचे नाही. लोकांमध्ये मिसळून त्यांचे प्रश्न समजून घेऊन सनदशीर मार्गाने त्यांची सोडवणूक करण्यासाठी ही राजकीय मंडळी आणि त्यांचे संधिसाधू पक्ष प्रयत्न करताना दिसत नाहीत. म्हणजे विचारांवर निष्ठा नाही, विचारधारेशी बांधिलकी नाही, लोकांच्या प्रश्नांविषयी संवेदनशीलता नाही, समाजाप्रति उतराईची भावना नाही; मग मिळेल ती संधी साधून सत्ता पदे मिरवणारे हे राजकीय पक्ष सातत्याने सोयीस्कर पवित्रा घेत राहतात आणि ईव्हीएम मशीन्सवर आपल्या पराभवाचे खापर फोडण्यात धन्यता मानताना दिसतात. पराभूत होणाऱ्या राजकीय पक्षांनी सातत्याने घेतलेल्या आक्षेपांमुळे २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम मशीन्सच्या वापरात कागदी चिठ्ठीचादेखील वापर करून एक प्रकारे आपण देत असलेले मत आपल्या इच्छित उमेदवारालाच मिळत असल्याची खात्री देणारी दृश्य यंत्रणा देण्याचे निवडणूक आयोगाला निर्देश दिला. त्याप्रमाणे मतदान करताच मतदाराला मतदान निर्देशक कागदी पत्रिकेद्वारे मत निश्चिती देणारी यंत्रणा (व्हीव्हीपीएटी) ईव्हीएम मशीन्सला संलग्न करण्यात आली. आता प्रत्येक मतदार आपण केलेले मतदान या मशीन्समधील छोट्या खिडकीतून पडणाऱ्या कागदी मतपत्रिकेवर पाहून खात्री करून घेऊ शकतो. जर यात गफलत किंवा काही चूक होत असेल तर मतदाता लगेच आक्षेप घेऊ शकतो. तसेच प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी एक अभिरूप मतदान सर्व मतदान केंद्रांवर विविध पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर घेण्यात येते. भारतीय निवडणूक आयोगाने या आधीदेखील ईव्हीएम मशीन्स या दोषरहित असल्याचा निर्वाळा अनेकदा दिला आहे. तरी जर दरवेळी पराभूत होणारे पक्ष ईव्हीएम मशीन्सवर संशय घेत असतील तर याला पक्षीय अभिनिवेशातून येणारा बेजबाबदार रडीचा डावच म्हटले पाहिजे.

महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणूक निकाल लागताच महाराष्ट्रातील काही दरबारी राजकारण्यांनी पुन्हा ईव्हीएमच्या नावाने रडगाणे सुरू केले. झारखंडचे निकाल केंद्रातील सत्ताधारी भाजपाच्या विरोधात तर महाराष्ट्रातील निकाल भाजपा महायुतीच्या बाजूने लागले आहेत. काँग्रेस आघाडीचे ५० आमदार निवडून आले आहेत. मग जिथे काँग्रेस आघाडीचे उमेदवार निवडून आले तेथेदेखील ईव्हीएम मशीन्स हॅक केले होते, असे म्हणावे लागेल. एका नेत्याने तर पुन्हा मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे. आपल्या पक्षाची ध्येयधोरणे येथील सर्वसामान्य माणसाच्या इच्छा-आकांक्षाशी सुसंगत न बनवता, समाजमनाचा धांडोळा न घेता, पराभवाची खरी कारणे समजून न घेता, हे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते आज दोन दशके स्वतंत्र आणि निःपक्ष असलेल्या आपल्याच देशाच्या व्यवस्थेवर संशय घेत आहेत. निःपक्ष निवडणूक आयोग आणि निर्दोष ईव्हीएम मशीन्सला धोपटण्यापेक्षा या पक्षांनी खऱ्या अर्थाने भाकरी फिरवण्याची वेळ आलेली आहे, हेच सर्वसामान्य मतदार वारंवार सांगतो आहे. पण राजकीय पक्षांच्या बौद्धिक दिवाळखोरीच्या या काळात ‘लक्षात कोण घेतो?’

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

### ईव्हीएममधून उमटला ‘राष्ट्रभक्तीचा हुंकार’

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ‘महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे’ असे म्हटले होते. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सावरकरांच्या विधानाची विशेष आठवण होते. लोकसभा निवडणुकीत देशभर ‘संविधाना’बाबतच्या खोट्या गोष्टी रेटून सांगत जनमानसात भीती निर्माण करणाऱ्यांना तेव्हा यश मिळाले. आपली क्लृप्ती खोटी का असेना, पण यशस्वी ठरल्याच्या आनंदात ही मंडळी होती. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्रात आरक्षणाच्या नावावर जाती-जातीत फूट पाडण्याचे षडयंत्र उपयोगी ठरत असल्याच्या उकळ्या सत्ताकांक्षींना फुटत होत्या. दुसरीकडे गठ्ठा मतदानासाठी तुष्टीकरणाची परिसीमा ओलांडल्याचे चित्र होते. केवळ सत्ता आणि त्यातून पैसा हाच एकमेव उद्देश असणाऱ्यांना एकसंध समाज, देव, देश याच्याशी काहीच देणे-घेणे नसल्याचे दिसून येत होते. पण ज्यांच्या जीवनात देव, देश आणि धर्म याला प्राधान्य आहे, राष्ट्र प्रथम हा ज्यांच्या जीवनाचा मंत्र आहे असा बहुसंख्य समाज या सर्व प्रकाराने अस्वस्थ होता. त्यांची ही अस्वस्थता समाजातील सजग प्रहरींनी ओळखली आणि त्यानंतर राष्ट्रभक्तीच्या निखाऱ्यावर फुंकर घालण्याच्या कामाला सुरुवात झाली. त्यातूनच उठलेला राष्ट्रभक्तीचा हुंकार म्हणजेच नुकताच लागलेला महाराष्ट्र विधानसभेचा निकाल. आता हा निकाल अनेकांना अनाकलनीय, राक्षसी बहुमत वाटत आहे. पण संविधानाबाबतच्या खोट्या गोष्टी, जाती-जातीत दुही निर्माण करणारी नीती आणि कृती तर गठ्ठा मतांसाठी तुष्टीकरणाचा कळस गाठणारे ‘मी तुमच्या देवांचा बाप आहे’ असे म्हणणारे या निकालासाठी जबाबदार नाहीत का?

महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा असल्याची उजळणी करणाऱ्या व स्वतःला तथाकथित धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या राजकारणाऱ्यांची कृती आणि उक्ती किती फोल आहे, याचेही दर्शन या निवडणुकीच्या माध्यमातून झाले तर स्वतःला हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्यांचा खोटारडेपणा प्रकर्षाने पुढे आला. कोण कुठला तो सज्जाद नोमानी नावाचा विकृत येथे येऊन गठ्ठा मतदान एका बाजूने करा, जे असे करणार नाहीत त्यांच्यावर बहिष्कार टाका, अशी चित्रफीत प्रसारित करतो. दुसरीकडे हाच नोमानी मराठा आंदोलनाच्या प्रमुखाला भेटून एकत्र येत हिंदुत्वाला पराजित करण्याची भाषा बोलतो तर उलेमा संघटना १७ मागण्यांचे पत्र देतात. त्यात दंगलीतील गंभीर गुन्ह्यातील आरोपींना सोडून देणे, रा. स्व. संघासारख्या देशभक्त संघटनेवर बंदी आणण्यासहित विविध मागण्या होत्या. या मागण्यांबाबत सकारात्मक पाठिंब्यांची पत्रे स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या राजकीय पक्षांनी दिली. यातील कोणती बाब संवैधानिक होती? संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी जणू आमचीच असा टेंभा मिरविणाऱ्यांना येथे संविधानाच्या पावित्र्याचे भान नव्हते का? एकीकडे तुष्टीकरणासाठी मुस्लिमांसमोर गुडघे टेकविणारे दुसरीकडे मात्र, औरंगजेब, अहमद शाह यांचे उदात्तीकरण करताना अहल्यादेवी, संभाजीराजे यांनादेखील नाकारत असल्याचे दिसून आले. व्होट जिहाद, वक्फ बोर्ड आणि लव्ह जिहाद या सर्वच बाबींनी क्षुब्ध झालेला बहुसंख्य हिंदू समाज निवडणूकनिमित्ताने ईव्हीएममधून व्यक्त झाला. हिंदू आणि हिंदुत्वाशी नाळ तुटलेल्यांना मग हा निकाल अनाकलनीय वाटायला लागला.

लोकसभा निवडणुकीपासूनच खोट्या गोष्टी पसरवून भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केवळ ‘हिंदुत्व’ पराभूत व्हावे या हेतूने केला गेला. खरं म्हणजे निवडणूक ही राजकीय पक्षांमध्ये लढली जाते. पण असे असताना स्वतःला सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार म्हणविणारे अनेक जण केवळ हिंदू विचार संपावा म्हणून इरेस पेटले. या सर्वांनीच अक्षरशः अनेक षडयंत्र रचले. हिंदूंमधील जाती व्यवस्थेचा फायदा घेत जाती-जातीत भांडणे लावण्याचा प्रयत्न केला. संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याची खोटी आरोळी ठोकली. त्यावरही कळस म्हणजे मुस्लिमांचे गठ्ठा मतदान व्हावे असा अजेंडा राबविला. अर्थातच हा केवळ सत्ताकांक्षेसाठी केलेला डाव होता. हा डाव सर्वप्रथम हरयाणात हाणून पाडण्यात आला. यासाठी राष्ट्रभक्त समविचारी संघटना, व्यक्तींनी सूक्ष्म नियोजन केले. मनामनात असलेल्या देव, देश आणि धर्म या विचाराला फुंकर घातली. एवढेच नव्हे, तर देशहितासाठी १०० टक्के मतदान व्हावे म्हणून लाखो अराजकीय कार्यकर्ते कुठल्याही स्वार्थाशिवाय २० तारखेच्या सायंकाळपर्यंत कार्यरत होते. याचेच फलित म्हणजे ईव्हीएममधून उठलेला राष्ट्रभक्तीचा हुंकार. आता काहींना तो अनाकलनीय तर काहींना राक्षसी वाटत असेल तर त्याला सामान्यजनांचा नाईलाज आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

### झारखंड निवडणूक निकालाचा अन्वयार्थ

**श्यामकांत जहागीरदार**



झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुका आटोपल्या. दोन्ही राज्यांतील निकालात काही साम्य आहे. पहिले म्हणजे दोन्ही राज्यांतील सत्ताधारी आघाड्या आपली सत्ता कायम ठेवण्यात यशस्वी ठरल्या. महाराष्ट्रात महायुतीने नेत्रदीपक यश मिळविले, तर झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वात इंडिया आघाडीने बहुमत मिळविले. दोन्ही राज्यांतील निकालाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही राज्यात लाडकी बहीण योजनेचा प्रभाव पडला. महाराष्ट्रात ही योजना ‘लाडकी बहीण’ नावाने, तर झारखंडमध्ये ही योजना ‘मईया सन्मान योजना’ नावाने राबविण्यात आली. झारखंडमध्ये ही योजना सुरू करताना सुरुवातीला एक हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात टाकण्यात आले; निवडून आल्यानंतर ही राशी २५०० रुपये करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सरकारने दिले. महाराष्ट्रात या योजनेतून महिलांना १५०० रुपये मिळाले. महायुतीची सत्ता आल्यानंतर ही राशी २१०० रुपये करण्याचे आश्वासन देण्यात आले.

या दोन राज्यांतील निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेस पक्षाला दोन्ही राज्यांत प्रत्येकी १६ जागा मिळाल्या. झारखंडमध्ये २०१९ मध्येही काँग्रेसला १६ जागाच मिळाल्या होत्या. गमतीचा भाग म्हणजे दोन्ही राज्यांतील मुख्यमंत्री दाढीधारी होते. इंडिया आघाडीत असणाऱ्या राजदने या निवडणुकीत पाच जागा जिंकल्या. विशेष म्हणजे बिहारमध्ये झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत राजदला एकही जागा जिंकता आली नाही. झारखंडमध्ये काँग्रेस असो की राजद, त्यांना जे यश मिळाले, त्यात त्यांचे फारसे कर्तृत्व नाही. झामुमोचे मित्रपक्ष म्हणून मतदारांनी त्यांना पसंती दिली. झारखंडमध्ये झामुमोचे हेमंत सोरेन यांचा शपथविधी २८ नोव्हेंबरला होत असताना महाराष्ट्रात मात्र महायुतीच्या मुख्यमंत्र्याची अद्याप निवड झाली नाही.

निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यातील भूखंड घोटाळ्यात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक झाली, त्यांना तुरुंगातही जावे लागले. अटक होण्यापूर्वी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत सोरेन यांनी या पदाची प्रतिष्ठा कायम राखली. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याप्रमाणे धुळीस मिळविली नाही. पाच-सहा महिने तुरुंगात राहिल्यानंतर सोरेन यांची जामिनावर सुटका झाली. तुरुंगात जाण्याच्या अगोदर सोरेन यांनी आपल्या जागी आपल्याच पक्षातील ज्येष्ठ नेते चम्पई सोरेन यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली. जामिनावर बाहेर आल्यानंतर हेमंत सोरेन यांनी चम्पई सोरेन यांना हटवून मुख्यमंत्रिपद स्वतःकडे घेतले. यामुळे नाराज होत चम्पई सोरेन यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला होता.

झामुमोचे संस्थापक शिबू सोरेन यांचे ज्येष्ठ पुत्र दुर्गा सोरेन यांचे काही वर्षांपूर्वी आकस्मिक निधन झाले. तोपर्यंत दुर्गा सोरेन हेच शिबू सोरेन यांचे राजकीय उत्तराधिकारी मानले जात होते. दुर्गा सोरेन यांच्या निधनानंतर हेमंत सोरेन यांचा झामुमोच्या राजकारणात प्रवेश झाला. दुर्गा सोरेन यांच्या पत्नी सीता सोरेन यांना झामुमोच्या राजकारणात डावलण्यात आले. त्यामुळे दुखावलेल्या सीता सोरेन यांनीही भाजपात प्रवेश केला. भाजपाजवळ बाबुलाल मरांडी आणि चम्पई सोरेन असे दोन माजी मुख्यमंत्री तसेच सोरेन घराण्यातील सीता सोरेन होते. पण हे तिघेही हेमंत सोरेन यांचा राज्यातील विजयरथ रोखू शकले नाही.

८१ सदस्यीय झारखंड विधानसभेत हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीने ५७, तर भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला २४ जागा मिळाल्या. झारखंड मुक्ती मोर्चाने सर्वाधिक म्हणजे ३४ जागा जिंकल्या. काँग्रेसला १६ जागा मिळाल्या. राजदने ५ तर भाकपा मालेने २ जागा जिंकल्या. रालोआत भाजपाने सर्वाधिक म्हणजे २१ जागा जिंकल्या. लोजपा आणि ऑल झारखंड स्टुडंड युनियन या पक्षांना प्रत्येकी एक जागा जिंकता आली. भाजपाला राज्यात बहुमत मिळविता आले नसले, तरी भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत घट झाली नाही. यावेळी भाजपाला ३३.२८ टक्के मते मिळाली. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाच्या मतांची टक्केवारी ३३.२७ होती. २०१४ मध्ये भाजपाला ३१ टक्के मते मिळाली होती. इंडिया आघाडीत झारखंड मुक्ती मोर्चाला २३.२० टक्के मते मिळाली तर काँग्रेसला १५.४५ टक्के. २०१९ च्या निवडणुकीत झामुमोने १८.७२ टक्के तर काँग्रेसला १३.८८ टक्के मते मिळाली होती.

भ्रष्टाचाराच्या आरोपात आपल्याला झालेल्या अटकेचा संबंध हेमंत सोरेन यांनी आदिवासींच्या अस्मितेशी जोडला. भाजपा आदिवासी विरोधी असल्याचा तसेच आदिवासीबहुल झारखंड राज्याला केंद्र सरकार निधी देत नसल्याचा आरोप केला. दुसरीकडे भाजपाने ‘रोटी, बेटी आणि माटी’ची घोषणा देत आपल्यालाही आदिवासी अस्मितेशी जोडण्याचा प्रयत्न केला. बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा उपस्थित करत राज्याच्या काही भागात लोकसंख्येत असंतुलन निर्माण झाल्याचा आरोप केला. हे बांगलादेशी घुसखोर आदिवासींचा रोजगार म्हणजे रोटी हिरावतात, त्यांच्या मुलींशी लग्न करतात म्हणजे बेटी पळवतात आणि माटी म्हणजे आदिवासींच्या जमिनींवर कब्जा करतात असा प्रचार केला, पण त्यावर राज्यातील आदिवासींनी विश्वास ठेवला नाही. भाजपाला त्याचा फटका बसला. लोकसभा निवडणुकीत आदिवासींसाठी राखीव असलेल्या राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला होता. यावेळी राज्यातील आदिवासींसाठी राखीव २८ पैकी २७ विधानसभा मतदारसंघात भाजपाला पराभवाचे तोंड पाहावे लागले. महाराष्ट्रातही लोकसभा निवडणुकीत भाजपाशी अशीच स्थिती होती. पण महाराष्ट्रात भाजपाने लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका दुरुस्त केल्या, त्याचे फळ विधानसभा निवडणुकीच्या निकालातून त्याला मिळाले, पण झारखंडमध्ये भाजपाला यात यश आले नाही. महाराष्ट्रात भाजपाचे निवडणूक प्रभारी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव यांना जे जमले, ते झारखंडमध्ये केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांना जमले नाही. झामुमोच्या हेमंतने भाजपाच्या हिमंतावर आपल्या राजकीय कौशल्याने मात केली, असे निवडणूक निकालावरून दिसून आले. राहुल गांधी काँग्रेसला निवडणूक, मग ती लोकसभेची असो की विधानसभेची, जिंकून देऊ शकत नाही, हे आधी लोकसभेच्या तसेच नंतर हरयाणा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून सिद्ध झाले आहे. झारखंडमध्ये काँग्रेसला जे यश मिळाले, त्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे कोणतेच योगदान नाही, ती झामुमोचे हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाची कमाल आहे.

९८८१७१७८१७

### घवघवीत यशाचे खरे श्रेय संघाचेच

२०१९ ते २०२४ दरम्यान महाराष्ट्रात घडलेल्या अनेक राजकीय घडामोडींनंतर विधानसभा निवडणूक झाली आणि महायुतीला घवघवीत यश मिळाले. भाजपाचा विजय एवढा मोठा की, यापुढे इतरांच्या कुबड्यांची फारशी गरज पडू नये आणि त्यांच्या नखऱ्यांवर नियंत्रण यावे. काहीही असो; यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी स्वतःला झोकून देऊन मतदारांमध्ये जागृती निर्माण केली आणि मतदान टक्का वाढविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. कोणी कितीही नाकारले तरी राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यात संघ स्वयंसेवकांनी हातभार लावला. यावेळी महायुतीचे काही उमेदवार पाच हजारांपेक्षा कमी मतांनी निवडून आले; त्याला वाढीव मतदान टक्काही कारणीभूत आहे. निवडणुकांपूर्वी काही वाचाळवीर विरोधकांनी वैयक्तिक हीन दर्जाची चिखलफेक करून वातावरणात गर्मी निर्माण करण्याचे जे प्रयत्न केले, ते धुळीस मिळाले हेही नसे थोडके.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### युती त्सुनामीचे हेही एक कारण

२३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले व भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने विरोधी आघाडीला पार नेस्तनाबूत केले. सध्या याचे पृथक्करण करण्यात वृत्तपत्रे मश्गूल आहेत. त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी गयाना-डोमिनिका, ब्राझील या देशांच्या दौऱ्यावर होते व त्यांना ‘ऑर्डर ऑफ एक्सलन्स अवॉर्ड’ मिळाल्याची बातमी आली. यावरून लोकांना मोदींना आतापर्यंत २० च्या वर आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचे आठवले. निवडणुकीत कुठले राजकीय पक्ष जनतेची प्रामाणिकपणे सेवा करायला निवडणूक लढत आहेत, याचे उत्तर मिळाले. मोदींना जगात लोक एवढा मान देतात. त्यांचे कर्तृत्व खरंच कौतुक करण्यासारखे आहे. त्यांच्यासारखा दूरदृष्टी व कार्यक्षमता असलेला नेता सध्यातरी भारतात नाही. जे काही नावाजलेले पुढारी आहेत, ते बहुतेक राजकारण करा व घराण्याकरिता माया कमवा, याच उद्देशाने प्रेरित होऊन निवडणुकी लढतात. हे टाळण्यासाठी निर्णय पक्का झाला व मी माझे मतदान केले.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### खरा नेताच पंतप्रधान असतो

खरा नेता कधीच स्वार्थी नसतो. तो देश, समाज यांच्या विकासासाठीच झटत असतो. देशाला शक्तिशाली बनवणे हाच एकमेव उद्देश अशा नेत्याचा असतो. म्हणून आपले पंतप्रधान म्हणतात ‘सबका साथ, सबका विकास’ आणि म्हणून ते तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान झाले. सत्य तेच स्वीकारावे व सत्य तेच बोलावे, असा स्वभाव नरेंद्र मोदींचा आहे. म्हणून ते जगात सर्वमान्य आहेत. खोटा नेता आपला स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी स्वदेशीला कधी जवळ करतो तर कधी दूर लोटतो, खुर्चीची स्वप्ने पाहात ती साकारण्यासाठी कोणत्याही स्तरावर जातो. सुज्ञ जनता असा खोटा नेता लगेच ओळखते आणि मतपेटीतून आपला निर्णय देते. मोदींवर व पर्यायाने भाजपावर टीका करणारे कधीच संपून जातात.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### शासकीय आरोग्य व्यवस्था बळकट करण्याची गरज



राज्यातील लोकसंख्येचा फार मोठा भाग हा ग्रामीण भागात राहतो. ग्रामीण भागाचेही दुर्गम, अतिदुर्गम, गाव, वस्त्या असे अनेक भाग असतात. या भागातील ग्रामस्थ त्यांच्या आरोग्यासाठी त्या-त्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून असतात. तथापि, या केंद्रातील दुरवस्था झालेल्या पायाभूत सुविधा, नादुरुस्त यंत्रसामग्री आणि कुशल मनुष्यबळाचा अभाव हा सरकारसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. राज्यातील जवळपास अडीचशेपेक्षा जास्त प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. त्यांना गळती लागली आहे किंवा धोकादायक इमारत म्हणून त्या जाहीर झाल्याचा अहवाल राज्याच्या आरोग्य विभागानेच तयार केल्याचे वृत्त अलिकडेच माध्यमात प्रसिद्ध झाले. साडेतीनशेपेक्षा जास्त आरोग्य केंद्रांमध्ये पुरेसे डॉक्टर्स नाहीत. विशेष तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध नसतात. परिणामी ४० टक्के खाटांचाच वापर होतो, असे आशियाई बँकेने निदर्शनास आणले. याचाच अर्थ ६० टक्के खाटांचा वापर होत नाही. प्रसार माध्यमेही अधूनमधून या सेवेतील उणिवांचा पंचनामा करतात. महाराष्ट्रासाठी हे चित्र भूषणावह नाही. समाजमनावर अंधश्रद्धेचा विळखा अजूनही पाहायला मिळतो. शासकीय स्तरावरदेखील विविध योजना राबविल्या जातात. एवढी यातायात करून लोक आरोग्य केंद्रापर्यंत येत असतील आणि त्यांच्या हाती सेवेचा भोपळाच लागत असेल तर ते शासनाचे अपयशच ठरते. व्यवस्था बळकटीकरण ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारी सेवेला डॉक्टरांची पसंती का नसावी. इमारतींची दुरवस्था आदी प्रश्नांची उत्तरे जनतेला देणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यातील अडचणी सोडवून सक्षम सेवा पुरवणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पोट हिश्याच्या मोजणी प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## जनशक्ती शेतकरी संघटनेचा उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २७ नोव्हेंबर-**

एका जमीन प्रकरणात अधिकार नसताना बेकायदेशीरित्या केलेली पोट हिश्याची मोजणी रद्द करावी तसेच भूमी अभिलेख कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशीअंती कारवाई करावी. या मागणीसाठी बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा जनशक्ती शेतकरी संघटनेचे सोलापूर शहर प्रमुख निखिल नागणे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे बाळे येथील सोलापूर ते उस्मानाबाद रेल्वे मार्गात जाणाऱ्या एका जमीन प्रकरणात अधिकार नसताना बेकायदेशीरित्या पोट हिश्याची मोजणी करण्यात आली आहे. पोट हिश्यात बदल करून नव्याने स्वतंत्र सातबारा उतारा करण्यात आला. गैरमार्गाचा अवलंब करून रेल्वे मार्गात जाणाऱ्या क्षेत्रफळात नकाशा मध्ये बदल करून सोयीनुसार दाखविण्यात आले, असा आरोप त्यांनी केला आहे.

उत्तर सोलापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक यांच्या विरोधात या प्रकरणी तक्रार देऊनही कारवाई झाली नाही. त्याप्रकरणी तत्काळ चौकशी करून कारवाई करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनशक्ती शेतकरी संघटनेच्या वतीने दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे निखिल नागणे यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस रवी काळे, शितल काळे आदी उपस्थित होते.

# वाहतुकीचा दंड न भरणाऱ्या ३५० वाहन चालकांवर अटक वॉरंट

## १३ वाहन चालकांना अटक करून न्यायालयात हजर केले

### वाहनचालकांनी दंड भरून वॉरंट केले रद्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २७ नोव्हेंबर**

सोलापूर शहर हद्दीतील ३५० वाहन चालकांविरुद्ध जिल्हा न्यायालयाने वॉरंट काढले आहे

यापूर्वी असलेल्या वाहतूक केसेस संदर्भात या वाहन चालकांवर न्यायालयाने समन्स काढले होते समन्स काढलेले असतानाही या वाहन चालकांनी न्यायालयात हजर न राहता दंडाची रक्कम भरली नाही अशांविरुद्ध हे वॉरंट काढण्यात आले आहे

आता जिल्हा न्यायालयाने वाहतुकीच्या केसेसच्या समस म धील न्यायालयात हजर न राहिलेल्या ३५० वाहन चालकांविरुद्ध वॉरंट काढले आहे या वॉरंटची बजावणी करण्यासाठी सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १३ वाहन चालकांना वॉरंट मध्ये ताब्यात घेऊन त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता या वाहन चालकांनी कायदेशीर दंड भरून वॉरंट रद्द करून घेतले त्यामुळे ज्या वाहन चालकांना समन्स मिळाले आहे.

त्यांनी त्यांच्यावरील केसची कायदेशीर दंडाची रक्कम भरणा करून पुढील कायदेशीर कारवाई टाळावी असे आवाहन पोलीस आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आले आहे


## जाहीर नोटीस

यात मी **हाफिजनूरमोहम्मद मदारसाहब शेख, रा. गाळा नं. ३९२, गाडेगांव रोड, खाजानगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर** जाहीर करतो की, माझ्या जुन्या पासपोर्ट वर माझे नांव **हाफिजनुर मोहम्मद शेख** असे होते. तसेच माझ्या आधारकार्ड वर माझे नवीन नांव **हाफिजनूरमोहम्मद मदारसाहब शेख** असे नमूद आहे. **हाफिजनूरमोहम्मद शेख** व **हाफिजनुर मोहम्मद मदारसाहब शेख** या दोन्ही नावाची व्यक्ती मीच आहे. असे प्रतिज्ञापत्र ॲफिडेव्हिट नं. ७६८/२०२४ अन्वये केलेले आहे.

**सही/-**
**हाफिजनुरमोहम्मद मदारसाहब शेख,**
**गाळा नं. ३९२, गाडेगांव रोड, खाजानगर, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**


# परस्पर मोजणी करून सातबाऱ्याचे पोट हिस्से तयार करणाऱ्यां मोजणी कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २७ नोव्हेंबर**

परस्पर मोजणी करून सातबाऱ्याचे पोट हिस्से तयार करणाऱ्या भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कर्मचाऱ्यांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुनिल वसंतराव पोतदार (वय ६४, रा. शुक्रवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नितीन सावंत, तबस्सुम सय्यद, मुकुंद काडगावकर, श्रीशैल काळे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल पोतदार यांची सोलापूर हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील बिनशेती खुली जागा सर्व्हे नं. ३०६/१ यास नवीन सर्व्हे नं. १५४/१ ही जागा असून या जागेचे एकूण क्षेत्र ४ हेक्टर ७६ आर आहे. या मिळकतीवर सुनिल पोतदार व त्यांचे पाच चुलत भाऊ असे एकूण ६ जणांचे वारसाहक्क आहे. पोतदार यांच्या मिळकतीची मोजणी करण्याबाबतचा अर्ज उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांच्या कार्यालयात आल्यानंतर पोतदार यांना मोजणी प्रकरणाची कोणतीही कल्पना अथवा नोटीस न देता पोतदार यांच्या गैरहजेरीत भुमी अभिलेख कार्यालयातील नितीन सावंत, तबस्सुम सय्यद, मुकुंद काडगावकर, श्रीशैल काळे यांनी १४ ऑक्टोबर २०२२ ते ९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत मोजणी करून सदर मिळकतीच्या सातबारा उताऱ्याचे पोट हिस्से तयार करून इतर मिळकतदारांना त्याचा फायदा करून दिला आहे. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.



## रक्तदान करून पोलिसांची शहिदांना आदरांजली

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

शहर आयुक्तालयातील सदर बझार पोलीस ठाणे येथे २६/११ मध्ये झालेल्या अतिरेकी हल्यातील शहिदांना पोलिस कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त यशवंत गवारी, सदर बझार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लाकडे, पोलीस निरीक्षक भालचंद्र ढवळे, सदर बझार पोलीस ठाणेचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी रक्तदान करुन शहिद झालेल्या शहिदांना श्रध्दांजली वाहिली. हे रक्तदान शिबीर सिध्देश्वर ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते.

## संजीवनी कुलकर्णी यांचे निधन

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**



अवंती नगर येथे राहणाऱ्या महानगरपालिकेतील निवृत्त शिक्षिका संजीवनी पांडुरंग कुलकर्णी (वय ७७) यांचे दि.२६ नोव्हेंबर रोजी दीर्घकालीन आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात बहिणी, भाचे, नातवंडे असा परिवार आहे.

## मौला पठाण यांचे निधन

**सांगोला, दि.२७ नोव्हेंबर-**



सांगोला आगारातील सेवानिवृत्त कर्मचारी मौला तय्यब पठाण (वय ७२) यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार नविद पठाण यांचे ते वडील होत.


## जाहीर नोटीस

**सिरो चिट्स प्रा. लि. लातूर**

येथील सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, सेक्युरिटी रिलीज नोटीस ब. न. एल टी आर / १० दिनांक ०४/०२/२०२२ एफ . डी. आर नंबर ८००७२७३१३९४ एस आर नंबर ११९९७९८ बी सी ग्रुप सी. सी. बी. यु-०१ रक्कम रुपये २,००,०००/- ची सेक्युरिटी एफ डी रिलिज करण्यात येत आहे. तरी कोणाचा आक्षेप असल्यास निम्म साक्षांकित याची कार्यालयात आजच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत आक्षेप नोंदवावा. कोणताही आक्षेप प्राप्त नाही झाल्यास सदरील सेक्युरिटी एफ. डी. रिलिज करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**सहप्रबंधक चिट्स लातूर**

Classifieds

**पाहिजेत**
**डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळ:- ९-५/६ फोन नं : ७०२०१४८४२६ ८६५२७५१९०२**

**पाहिजेत**
**अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला संपर्क : ९८९०१४३४३२**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.




# नू.म.वि. मराठी शाळेत संविधान दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

नू.म.वि. मराठी शाळेत संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व २६ नोव्हेंबरच्या मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्या शहिदांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या सेवाज्येष्ठ शिक्षिका स्मिता माळवदकर तसेच सहशिक्षिका रोहिणी चौधरी व आशा गायकवाड यांनी केले.

शिक्षकांच्या वतीने नर्मदा कनकी यांनी संविधान दिनाचे महत्त्व सांगितले.

मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन रोहिणी चौधरी यांनी केले.


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे भुईंजे ता. माढा जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

मौजे भुर्थजे ता. माढा जि. सोलापूर येथील ग.नं ५९/२/अ/१ यासी क्षेत्र १ हे. २० आर. ५९/२/अ यासी क्षेत्र २ हे ०० आर ५९/१ यासी क्षेत्र २ हे ०० आर. ११/१ यासी क्षेत्र ०० हे. ४० आर. या मिळकती १. महेंदकुमार पो. गुंदेचा २. महेंककुमार पो. नहाटा १. विवेक धरमचंद लोढा ४. नेमीचंद गोकुळचंद मुध्या ५. संतोष लिलाचंद गाढ़िया ६. दिलीप पसंतलाल कोठारी ७. नितीन हुकुमचंद कुग्गड ८. महेंद्र पोपटलाल वहाटा ९. बिपीन प्रकाश बोटा यांचे खरेदी मालकीवहीवाटीच्या असून त्यांनी सदरच्या मिळकती निर्वेध व निजोखमी असलेची आमचे अशिल दत्तात्रय सुरेश जाधव यांना खात्री देवून त्यांनी सदरच्या मिळकती आमचे अशिलास विक्री करणेचे ठरवले आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचा खरेदी, गहाण, दान, लीज, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, साठेखत, नोटरी दस्त, सावकारी, दावा अशा स्वरूपाचा किंवा इतर कोणताही हक्कहितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांच्या आत खालील पत्यावर लेखी हरकत योग्य त्या कागदपत्र्यांसह नोंदवावी जर मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध व निजोखमी असल्याचे समजून आमचे अशिल ठरल्याप्रमाणे वर नमूद मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कसलीही हरकत किंवा तक्रार आमचे अशिलावर किंवा सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २७/११/२०२४

**सही/-**
**ॲड. सागर अजिनाथ कन्हेरे**
**मु. पो. माढा, ता. माढा, जि. सोलापूर**
**मो. नं ७७६९८१८१८४**
**श्री. दत्तात्रय सुरेश जाधव**
**रा. पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर तर्फे ॲडव्होकेट**





# संविधानामुळे भारतीय लोकशाही जगात बलशाली : कुलगुरू डॉ. महानवर

### आधार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या पुरस्कारांचे वितरण, तरुण भारतचे पत्रकार किरण बनसोडे यांचा समावेश

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वावर आधारलेले संविधान या देशाला दिले. संविधानामुळे भारतीय लोकशाही जगात बलशाली आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी येथे केले.

आधार बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे शिवस्मारक सभागृहात थाटात वितरण कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी विचारवंत डॉ. नभा काकडे या होत्या. यावेळी विचारमंचावर प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धम्मपाल माशाळकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराचे हे १५ वे वर्ष आहे. सन्मान चिन्हे, सन्मानपत्र, शाल व पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. नभा काकडे म्हणाल्या, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही विकासाचे प्रश्न सुटू शकले नाहीत. दृष्टी आणि दृष्टिकोनही महत्त्वाचा आहे. आधार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार काढले.

याप्रसंगी सत्कारमूर्ती सचिन कवले, ॲड. संदीप उडाणशिव आणि तरुण भारतचे पत्रकार किरण बनसोडे यांनी प्रतिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक अध्यक्ष डॉ. धम्मपाल माशाळकर यांनी केले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मध्ये जनसंज्ञापन व पत्रकारिता विभागात गेस्ट फॅकल्टी म्हणून निवड झाल्याबद्दल प्रा.डॉ.मधुकर जक्कन यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर सचिव किर्तीकुमार शिवशरण यांनी आभार मानले.

**या मान्यवरांचा झाला पुरस्काराने सन्मान**

यावेळी संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जात पडताळणी समितीचे सचिन कवले (डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजसेवा पुरस्कार), ॲड. संदीप उडाणशिव (शिक्षण सेवा पुरस्कार), नेत्ररोग तज्ञ डॉ. शुभ्रा अग्रवाल (वैद्यकीय सेवा पुरस्कार), संतोष धाकपाडे ( पर्यावरण रक्षक पुरस्कार), तरुण भारतचे पत्रकार किरण बनसोडे ( आदर्श पत्रकारिता), परंडा येथील अण्णा जाधव (समाज भूषण पुरस्कार), आसिफ इकबाल ( सामाजिक समता पुरस्कार), प्रा. राजशेखर पवार ( आदर्श शिक्षक पुरस्कार).

# आ. सुभाष देशमुखांकडून देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत यश मिळवत भाजपाने १३३ जागा जिंकल्या. या अभूतपूर्व यशाबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आ. सुभाष देशमुख यांनी बुधवारी मुंबईत भेटून अभिनंदन केले.

तब्बल ७७ हजारांपेक्षा अधिक मताधिक्य मिळवत आ. देशमुख यांनी जिल्ह्यात रेकॉर्डब्रेक विजय संपादन केल्याबद्दल आ. देशमुख यांचा यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सत्कार केला.



यावेळी आ. सुभाष देशमुख यांच्या विजयात किंगमेकर ठरलेले मनिष देशमुख व रोहन देशमुख हे दोन्ही बंधू उपस्थित होते. दरम्यान, फडणवीस हे कुशल आणि अनुभवी आहेत. महायुतीच्या सरकारमध्ये फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा आ. सुभाष देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.


## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्व्यये दि. १९/०८/२०२४ रोजी मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१

**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. / कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०७/२०२४ अखेर | मागणी नोटीस दिनांक / प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्ज खाते क्र. ००४००३२०२००००९५** **कर्जदार :** **१) उमेश दत्तात्रय गोटे** **प्रोपः उमेश दत्तात्रय गोटे** रा : प्लॉट नं.१४/ब, नंदिकेश सोसायटी नं.२, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३००२ **जामीनदार :** **२) विजयकुमार कांतय्या हिरेमठ** रा : प्लॉट नं.६/ब, नंदिकेश सोसायटी, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३००२ **३) श्रीनिवासराव नारायणराव नोमुला** रा : ब्लॉक नं. ६, अनिकेत अपार्टमेंट, कर्णिक नगर, सोलापूर ४१३००६ | एकूण रक्कम रुपये २६,२७,५८४.७२ (रु. सव्वीस लाख सत्तावीस हजार पाचशे चौऱ्याऐंशी रुपये बहात्तर पैसे) + दि. ०१/०८/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च | १९/०८/२०२४ / २५/११/२०२४ | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाड मधील मौजे शेळगी येथील श्री नंदिकेश सहकारी गृह निर्माण संस्था, सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरामधील मिळकत यांसी सिटी सर्व्हे नंबर ६२५/ब/१४ यासी एकूण क्षेत्र २४६ चौ. मी. त्या पैकी पूर्व बाजूची प्लॉट नं. १४ ब याचे क्षेत्र १२३.०० चौ. मी. हि घरजागा यांसी चतुर्सिमा : **पूर्वेस** - खुली जागा **पश्चिमेस** - सदर प्लॉट पैकी उर्वरित राहिलेली जागा **उत्तरेस** - रस्ता **दक्षिणेस** - प्लॉट नं. ३० ची जागा |
| २ | **कर्ज खाते क्र. ००४००३२१७००००८६** **कर्जदार :** **१)उमेश दत्तात्रय गोटे** **प्रोपः उमेश दत्तात्रय गोटे** रा : प्लॉट नं.१४/ब, नंदिकेश सोसायटी नं.२, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३००२ **जामीनदार :** **२) विजयकुमार कांतय्या हिरेमठ** रा : प्लॉट नं.६/ब, नंदिकेश सोसायटी, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३००२ **३) संतोष किसन पुळूजकर** रा : १५८, वज्रेश्वरी नगर, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००५ | एकूण रक्कम रुपये १६,८१,०६२/- (रु. सोळा लाख एक्याऐंशी हजार बासष्ठ) + दि. ०१/०८/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च | १९/०८/२०२४ / २५/११/२०२४ | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाड मधील मौजे शेळगी येथील श्री नंदिकेश सहकारी गृह निर्माण संस्था, सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरामधील मिळकत यांसी सिटी सर्व्हे नंबर ६२५/ब/१४ यासी एकूण क्षेत्र २४६ चौ. मी. त्या पैकी पूर्व बाजूची प्लॉट नं. १४ ब याचे क्षेत्र १२३.०० चौ. मी. हि घरजागा यांसी चतुर्सिमा : **पूर्वेस** - खुली जागा **पश्चिमेस** - सदर प्लॉट पैकी उर्वरित राहिलेली जागा **उत्तरेस** - रस्ता **दक्षिणेस** - प्लॉट नं. ३० ची जागा |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : २५/११/२०२४**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# महाराष्ट्रातील २८८ नूतन आमदार



१) अक्कलकुवा- आमश्या पाडवी (शिवसेना)
२) शहादा-राजेश पाडवी (भाजपा)
३) नंदुरबार-विजयकुमार गावीत (भाजपा)
४) नवापुर-शिरीषकुमार नाईक (काँग्रेस)
५) साक्री-मंजुळा गावीत (शिवसेना)
६) धुळे ग्रामीण-राघवेंद्र पाटील(भाजपा)
७) धुळे शहर-अनुप अग्रवाल (भाजपा)
८) सिंदखेडा-जयकुमार रावल (भाजपा)
९) शिरपूर-काशीराम पावरा (भाजपा)
१०) चोपडा-चंद्रकांत सोनावणे (शिवसेना)
११) रावेर-अमोल जावळे (भाजपा)
१२) भुसावळ-संजय सावकारे (भाजपा)
१३) जळगाव शहर-सुरेश भोळे (भाजपा)
१४) जळगाव ग्रामीण-गुलाबराव पाटील (शिवसेना)
१५) अमळनेर-अनिल पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
१६) एरंडोल-अमोल पाटील (शिवसेना)
१७) चाळीसगाव- मंगेश चव्हाण (भाजपा)
१८) पाचोरा-किशोर पाटील (शिवसेना)
१९) जामनेर-गिरीश महाजन (भाजपा)
२०) मुक्ताईनगर- चंद्रकांत पाटील (शिवसेना)
२१) मलकापुर-चैनसुख संचेती (भाजपा)
२२) बुलढाणा-संजय गायकवाड (शिवसेना)
२३) चिखली-श्वेता महाले (भाजपा)
२४) सिंदखेडराजा-मनोज कायंदे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२५) मेहकर-सिद्धार्थ खरात (शिवसेना - यूबीटी)
२६ खामगाव-आकाश फुंडकर (भाजपा)
२७ जळगाव (जामोद)-संजय कुटे (भाजपा)
२८ अकोट-प्रकाश भारसाकळे (भाजपा)
२९ बाळापूर-नितीन देशमुख (शिवसेना- यूबीटी)
३० अकोला पश्चिम-साजिद खान पठाण (काँग्रेस)
३१ अकोला पूर्व-रणधीर सावरकर (भाजपा)
३२ मूर्तिझापूर-हरिश पिंपळे (भाजपा)
३३ रिसोड-अमित झनक (काँग्रेस)
३४ वाशिम-श्याम खोडे (भाजपा)
३५ कारंजा-सई डहाके (भाजपा)
३६ धामणगाव रेल्वे-प्रताप अडसड (भाजपा)
३७ बडनेरा-रवी राणा (महायुती)
३८ अमरावती-सुलभा खोडके (राष्ट्रवादी काँग्रेस)
३९ तिवसा-राजेश वानखेडे (भाजपा)
४० दर्यापूर-गजानन लवटे (शिवसेना - यूबीटी)
४१ मेळघाट-केवलराम काळे (भाजपा)
४२ अचलपूर-प्रवीण तायडे (भाजपा)
४३ मोर्शी-उमेश यावलकर (भाजपा)
४४ आर्वी-सुमित वानखेडे (भाजपा)
४५ देवळी-राजेश बकाने (भाजपा)
४६ हिंगणघाट-समीर कुणावार (भाजपा)
४७ वर्धा- पंकज भोयर (भाजपा)
४८ काटोल-चरनसिंग ठाकूर (भाजपा)
४९ सावनेर-आशीष देशमुख (भाजपा)
५० हिंगणा-समीर मेघे (भाजपा)
५१ उमरेड-संजय मेश्राम (काँग्रेस)
५२ नागपूर दक्षिण पश्चिम- देवेंद्र फडणवीस (भाजपा)
५३ नागपूर दक्षिण-मोहन मते (भाजपा)
५४ नागपूर पूर्व- कृष्णा खोपडे (भाजपा)
५५ नागपूर मध्य-प्रवीण दटके (भाजपा)
५६ नागपूर पश्चिम-विकास ठाकरे (काँग्रेस)
५७ नागपूर उत्तर - नितीन राऊत (काँग्रेस)
५८ कामठी-चंद्रशेखर बावनकुळे (भाजपा)
५९ रामटेक-आशीष जैस्वाल (शिवसेना)
६० तुमसर-राजू कारेमोरे (राष्ट्रवादी काँग्रेस)
६१ भंडारा-नरेंद्र भोंडेकर (शिवसेना)
६२ साकोली-नानाभाऊ पटोले (काँग्रेस)
६३ अ. मोरगाव- राजकुमार बडोले (राष्ट्रवादी काँग्रेस)
६४ तिरोरा-विजय रहांगडाले (भाजपा)
६५ गोंदिया-विनोद अग्रवाल (भाजपा)
६६ आमगाव-संजय पुरम (भाजपा)
६७ आरमोरी-रामदास मेश्राम (काँग्रेस)
६८ गडचिरोली-मिलिंद नरोटे (भाजपा)
६९ अहेरी-धर्मरावबाबा आत्राम (राष्ट्रवादी काँग्रेस)
७० राजुरा-देवराव भोंगळे (भाजपा)
७१ चंद्रपूर-किशोर जोरगेवार (भाजपा)
७२ बल्लारपूर-सुधीर मुनगंटीवार (भाजपा)
७३ ब्रह्मपूरी-विजय वडेट्टीवार (काँग्रेस)
७४ चिमुर-बंटी भांगडिया (भाजपा)
७५ वरोरा-करण देवतळे (भाजपा)
७६ वणी-संजय दरेकर (शिवसेना - यूबीटी)
७७ राळेगाव-अशोक उइके (भाजपा)
७८ यवतमाळ-अनिल मंगूळकर (काँग्रेस)
७९ दिग्रस-संजय राठोड (शिवसेना)
८० आर्णी-राजू तोडसांब (भाजपा)
८१ पुसद-इंद्रनील नाईक (राष्ट्रवादी काँग्रेस)
८२ उमरखेड-किशन वानखेडे (भाजपा)
८३ किनवट-भीमराव केराम (भाजपा)
८४ हदगाव-संभाजी कोहळीकर (शिवसेना)
८५ भोकर-श्रीजया चव्हाण (भाजपा)
८६ नांदेड उत्तर-बालाजी कल्याणकर (शिवसेना)
८७ नांदेड दक्षिण - आनंद तिडके (शिवसेना)
८८ लोहा-प्रताप चिखलीकर (राष्ट्रवादी काँग्रेस)
८९ नायगाव-राजेश पवार (भाजपा)
९० देगलूर-जितेश अंतापूरकर (भाजपा)
९१ मुखेड-तुषार राठोड (भाजपा)
९२ बसमत-चंद्रकांत नवघरे (राष्ट्रवादी काँग्रेस)
९३ कळमनूरी-संतोष बांगर (शिवसेना)
९४ हिंगोली-तानाजी मुटकुळे (भाजपा)
९५ जिंतूर-मेघना बोर्डीकर (भाजपा)
९६ परभणी-राहुल पाटील (शिवसेना- यूबीटी)
९७ गंगाखेड-रत्नाकर गुट्टे (महायुती)
९८ पाथरी-राजेश विटेकर (राष्ट्रवादी काँग्रेस)
९९ परतूर-बबन लोणीकर (भाजपा)
१०० घनसावंगी-हिकमत उढाण (शिवसेना)
१०१ जालना-अर्जुन खोतकर (शिवसेना)
१०२ बदनापूर-नारायण कुचे (भाजपा)
१०३ भोकरदण-संतोष दानवे (भाजपा)
१०४ सिल्लोड-अब्दुल सत्तार (शिवसेना)
१०५ कन्नड-संजना जाधव (शिवसेना)
१०६ फुलंब्री-अनुराधा चव्हाण (भाजपा)
१०७ औरंगाबाद मध्य-प्रदीप जैस्वाल (शिवसेना)
१०८ औरंगाबाद पश्चिम-संजय शिरसाट (शिवसेना)
१०९ औरंगाबाद पूर्व-अतुल सावे (भाजपा)
११० पैठण-विलास भुमरे (शिवसेना)
१११ गंगापूर-प्रशांत बंब (भाजपा)
११२ वैजापूर-रमेश बोरनारे (शिवसेना)
११३ नांदगाव-सुहास कांदे (शिवसेना)
११४ मालेगाव मध्य-मौलाना मुफ्ती मो.इस्माईल (एमआयएम)
११५ मालेगाव बाह्य-दादाजी भुसे (शिवसेना)
११६ बागलाण-दिलीप बोरसे (भाजपा)
११७ कळवण-नितीन पवार (राष्ट्रवादी काँग्रेस)
११८ चांदवड-राहुल आहेर (भाजपा)
११९ येवला-छगन भुजबळ (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२० सिन्नर-माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२१ निफाड-दिलीप बनकर (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२२ दिंडोरी-नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२३ नाशिक पूर्व- राहुल ढिकाले (भाजपा)
१२४ नाशिक मध्य-देवयानी फरांदे (भाजपा)
१२५ नाशिक पश्चिम-सीमा हिरे (भाजपा)
१२६ देवळाली-सरोज अहिरे (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२७ इगतपुरी-हिरामण खोसकर (राष्ट्रवादी काँग्रेस)
१२८ डहाणू-विनोद निकोले (भारतीय कम्युनिस्ट पक्ष)
१२९ विक्रमगड-हरिश्चंद्र भोये (भाजपा)
१३० पालघर-राजेंद्र गावीत (शिवसेना)
१३१ बोईसर-विलास तरे (शिवसेना)
१३२ नालासोपारा- राजन नाईक (भाजपा)
१३३ वसई-स्नेहा दुबे (भाजपा)
१३४ भिवंडी ग्रामीण-शांताराम मोरे (शिवसेना)
१३५ शहापूर-दौलत दरोडा (राष्ट्रवादी काँग्रेस)
१३६ भिवंडी पश्चिम-महेश चौघुले (भाजपा)
१३७ भिवंडी पूर्व- रईस शेख (समाजवादी पक्ष)
१३८ कल्याण पश्चिम-विश्वनाथ भोईर (शिवसेना)
१३९ मुरबाड-किसन कथोरे (भाजपा)
१४० अंबरनाथ बालाजी किणीकर (शिवसेना)
१४१ उल्हासनगर कुमार आयलानी (भाजपा)
१४२ कल्याण पूर्व सुलभा गायकवाड (भाजपा)
१४३ डोंबिवली-रवींद्र चव्हाण (भाजपा)
१४४ कल्याण ग्रामीण-राजेश मोरे (शिवसेना)
१४५ मीरा भाईंदर - नरेंद्र मेहता (भाजपा)
१४६ ओवळा माजीवाडा-प्रताप सरनाईक (शिवसेना)
१४७ कोपरी पाचपाखडी-एकनाथ शिंदे (शिवसेना)
१४८ ठाणे-संजय केळकर (भाजपा)
१४९ मुंब्रा कळवा- जितेंद्र आव्हाड (राष्ट्रवादी-एसपी)
१५० ऐरोली-गणेश नाईक (भाजपा)
१५१ बेलापूर-मंदा म्हात्रे (भाजपा)
१५२ बोरिवली-संजय उपाध्याय (भाजपा)
१५३ दहिसर-मनीषा चौधरी (भाजपा)
१५४ मागाठाणे-प्रकाश सुर्वे (शिवसेना)
१५५ मुलुंड-मिहिर कोटेचा (भाजपा)
१५६ विक्रोळी- सुनील राऊत (शिवसेना- यूबीटी)
१५७ भांडुप पश्चिम- अशोक पाटील (शिवसेना)
१५८ जोगेश्वरी पूर्व- अनंत (बाळा) नर (शिवसेना- यूबीटी)
१५९ दिंडोशी- सुनील प्रभू (शिवसेना- यूबीटी)
१६० कांदिवली पूर्व- अतुल भातखळकर (भाजपा)
१६१ चारकोप- योगेश सागर (भाजपा)
१६२ मालाड पश्चिम- अस्लम शेख (काँग्रेस)
१६३ गोरेगाव- विद्या ठाकूर (भाजपा)
१६४ वर्सोवा- हरून खान (शिवसेना- यूबीटी)
१६५ अंधेरी पश्चिम- अमित साटम (भाजपा)
१६६ अंधेरी पूर्व- मुरजी पटेल (शिवसेना)
१६७ विर्ले पार्ले- पराग अळवणी (भाजपा)
१६८ चांदिवली- दिलीप लांडे (शिवसेना)
१६९ घाटकोपर प.-राम कदम (भाजपा)
१७० घाटकोपर पूर्व- पराग शाह (भाजपा)
१७१ मानखुर्द शिवाजी नगर- अबू आझमी (समाजवादी पक्ष)
१७२ अणुशक्ती नगर- सना मलिक (राष्ट्रवादी काँग्रेस)
१७३ चेंबूर- तुकाराम काते (शिवसेना)
१७४ कुर्ला- मंगेश कुडाळकर (शिवसेना)
१७५ कलिना- संजय पोतनीस (शिवसेना- यूबीटी)
१७६ वांद्रे पूर्व- वरुण सरदेसाई (शिवसेना- यूबीटी)
१७७ वांद्रे पश्चिम आशीष शेलार (भाजपा)
१७८ धारावी- ज्योति गायकवाड (काँग्रेस)
१७९ सायन कोळीवाडा- कॅप्टन तामीळ सेल्वन (भाजपा)
१८० वडाळा- कालिदास कोळंबकर (भाजपा)
१८१ माहीम- महेश सावंत (शिवसेना- यूबीटी)
१८२ वरळी- आदित्य ठाकरे (शिवसेना- यूबीटी)
१८३ शिवडी- अजय चौधरी (शिवसेना- यूबीटी)
१८४ भायखळा- मनोज जामसुतकर (शिवसेना- यूबीटी)
१८५ मलबार हिल-मंगलप्रभात लोढा (भाजपा)
१८६ मुंबादेवी- अमिन पटेल (काँग्रेस)
१८७ कुलाबा- राहुल नार्वेकर (भाजपा)
१८८ पनवेल- प्रशांत ठाकूर (भाजपा)
१८९ कर्जत- महेंद्र थोरवे (शिवसेना)
१९० उरण- महेश बालदी (भाजपा)
१९१ पेण-रवींद्र पाटील (भाजपा)
१९२ अलिबाग-महेंद्र दळवी (शिवसेना)
१९३ श्रीवर्धन- अदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस)
१९४ महाड- भरत गोगावले (शिवसेना)
१९५ जुन्नर- शरद सोनवणे (अपक्ष)
१९६ आंबेगाव- दिलीप वळसे पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
१९७ खेड आळंदी- बाबाजी काळे (शिवसेना- यूबीटी)
१९८ शिरूर- ज्ञानेश्वर कटके (राष्ट्रवादी काँग्रेस)
१९९ दौंड- राहुल कुल (भाजपा)
२०० इंदापूर- दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२०१ बारामती- अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस)
२०२ पुरंदर- विजय शिवतरे (शिवसेना)
२०३ भोर- शंकर मांडेकर (राष्ट्रवादी काँग्रेस)
२०४ मावळ- सुनील शेळके (राष्ट्रवादी काँग्रेस)
२०५ चिंचवड- शंकर जगताप (भाजपा)
२०६ पिंपरी- अण्णा बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२०७ भोसरी- महेश लांडगे (भाजपा)
२०८ वडगाव शेरी- बापूसाहेब पठारे (राष्ट्रवादी - एसपी)
२०९ शिवाजी नगर- सिद्धार्थ शिरोळे (भाजपा)
२१० कोथरूड- चंद्रकांत पाटील (भाजपा)
२११ खडकवासला-भीमराव तापकिर (भाजपा)
२१२ पर्वती- माधुरी मिसाळ (भाजपा)
२१३ हडपसर- चेतन तुपे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२१४ पुणे कँटोनमेंट- सुनील कांबळे (भाजपा)
२१५ कसबा पेठ- हेमंत रासने (भाजपा)
२१६ अकोले- किरण लहामटे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२१७ संगमनेर- अमोल खताळ (शिवसेना)
२१८ शिर्डी- राधाकृष्ण विखे पाटील (भाजपा)
२१९ कोपरगाव- आशुतोष काळे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२२० श्रीरामपूर- हेमंत ओगळे (काँग्रेस)
२२१ नेवासा- विठ्ठल लंघे (शिवसेना)
२२२ शेवगाव- मोनिका राजळे (भाजपा)
२२३ राहुरी- शिवाजी भानुदास कर्डिले (भाजपा)
२२४ पारनेर- काशिनाथ दाते (राष्ट्रवादी काँग्रेस)
२२५ अहमदनगर शहर- संग्राम जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस)
२२६ श्रीगोंदा- बबनराव पाचपुते, (भाजपा)
२२७ कर्जत जामखेड- रोहित पवार (राष्ट्रवादी - एसपी)
२२८ गेवराई- विजयसिंह पंडित (राष्ट्रवादी काँग्रेस)
२२९ माजलगाव- प्रकाश सोळंके (राष्ट्रवादी काँग्रेस)
२३० बीड- संदीप क्षीरसागर (राष्ट्रवादी - एसपी)
२३१ आष्टी- सुरेश धस (भाजपा)
२३२ केज- नमिता मुंदडा (भाजपा)
२३३ परळी- धनंजय मुंडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२३४ लातूर ग्रामीण- रमेश कराड (भाजपा)
२३५ लातूर शहर- अमित देशमुख (काँग्रेस)
२३६ अहमदपूर- बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
२३७ उदगीर- संजय बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
२३८ निलंगा- संभाजी पाटील निलंगेकर (भाजपा)
२३९ औसा- अभिमन्यू पवार (भाजपा)
२४० उमरगा- प्रवीण वीरभद्रय्या स्वामी (शिवसेना- यूबीटी)
२४१ तुळजापूर- राणाजगजितसिंह पाटील (भाजपा)
२४२ उस्मानाबाद कैलास पाटील (शिवसेना- यूबीटी)
२४३ परांडा- तानाजी सावंत (शिवसेना)
२४४ करमाळा- नारायण पाटील (राष्ट्रवादी - एसपी)
२४५ माढा- अभिजीत पाटील (राष्ट्रवादी - एसपी)
२४६ बार्शी- दिलीप सोपल (शिवसेना- यूबीटी)
२४७ मोहोळ- राजू खरे (राष्ट्रवादी - एसपी)
२४८ सोलापूर शहर उत्तर- विजय देशमुख (भाजपा)
२४९ सोलापूर शहर म.-देवेंद्र कोठे (भाजपा)
२५० अक्कलकोट -सचिन कल्याणशेट्टी (भाजपा)
२५१ सोलापूर दक्षिण- सुभाष देशमुख (भाजपा)
२५२ पंढरपूर- औताडे समाधान महादेव (भाजपा)
२५३ सांगोले- बाबासाहेब देशमुख (अपक्ष)
२५४ माळशिरस-उत्तम जानकर (राष्ट्रवादी - एसपी)
२५५ फलटण- सचिन पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
२५६ वाई- मकरंद जाधव(राष्ट्रवादी काँग्रेस)
२५७ कोरेगाव- महेश शिंदे (शिवसेना)
२५८ माण- जयकुमार गोरे (भाजपा)
२५९ कराड उत्तर- मनोज घोरपडे (भाजपा)
२६० कराड दक्षिण-अतुल भोसले (भाजपा)
२६१ पाटण- शंभुराज देसाई (शिवसेना)
२६२ सातारा- शिवेंद्रराजे भोसले (भाजपा)
२६३ दापोली- योगेश कदम (शिवसेना)
२६४ गुहागर- भास्कर जाधव (शिवसेना- यूबीटी)
२६५ चिपळूण- शेखर निकम (राष्ट्रवादी काँग्रेस)
२६६ रत्नागिरी- उदय सामंत (शिवसेना)
२६७ राजापूर- किरण सामंत (शिवसेना)
२६८ कणकवली- नीतेश राणे (भाजपा)
२६९ कुडाळ- निलेश राणे (शिवसेना)
२७० सावंतवाडी- दीपक केसरकर (शिवसेना)
२७१ चंदगड- शिवाजी पाटील (अपक्ष)
२७२ राधानगरी- प्रकाश आबिटकर (शिवसेना)
२७३ कागल- हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी काँग्रेस)
२७४ कोल्हापूर दक्षिण- अमल महाडीक (भाजपा)
२७५ करवीर- चंद्रदीप नरके (शिवसेना)
२७६ कोल्हापूर उत्तर- राजेश क्षीरसागर (शिवसेना)
२७७ शाहूवाडी- विनय कोरे (जनसुराज्य)
२७८ हातकणंगले- अशोकराव माने (शिवसेना)
२७९ इचलकरंजी- राहुल प्रकाश अवाडे (भाजपा)
२८० शिरोळ- राजेंद्र पाटील (राजर्षी शाहू विकास आघाडी)
२८१ मिरज- सुरेश खाडे (भाजपा)
२८२ सांगली- सुधीर गाडगीळ (भाजपा)
२८३ इस्लामपूर- जयंत पाटील (राष्ट्रवादी - एसपी)
२८४ शिराळा- सत्यजीत देशमुख (भाजपा)
२८५ पलूस कडेगाव- विश्वजित कदम (काँग्रेस)
२८६ खानापूर- सुहास बाबर (शिवसेना)
२८७ तासगाव- रोहित पाटील (राष्ट्रवादी - एसपी)
२८८ जत- गोपीचंद पडळकर (भाजपा)



# सोलापूर रेल्वे विभागाने दिव्यांग सवलत कार्ड प्रक्रिया केली ऑनलाईन

**▸ सीनियर डीसीएम योगेश पाटील;एका क्लिकवर मिळणार कार्ड**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर,**

रेल्वे प्रवाश्यांच्या सेवा पूर्ततेसाठी रेल्वे विभाग नेहमीच सज्ज असतो. सेवांच्या पूर्ततेत भर घालत असताना सोलापूर रेल्वे विभागाने दिव्यांगांचे सवलत कार्ड ऑनलाईन स्वरूपात काढले आहे. त्याचाचा एक भाग म्हणून सोलापूर रेल्वे विभागाने २६ नोव्हेंबर रोजी पहिले ऑनलाईन दिव्यांग सवलतीचे कार्ड तयार केले आहे.

पूर्वी हे ओळखपत्र काढायचे असल्यास स्वतः त्या व्यक्तीला आपल्या नजीकच्या रेल्वे स्थानकावरील तिकीट बुकिंग कार्यालयात येऊन आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे बंधनकारक होते. आता घरबसल्या दिव्यांगांना त्यांची माहिती व कागदपत्रे वेबसाईट वर अपलोड करता येतील. दिव्यांगजन कार्ड ऑनलाईन प्रणाली मुळे होणारे फायदे: रेल्वे कार्यालयांना किंवा स्थानकांवर प्रत्यक्ष जाण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे त्यांचा वेळ आणि खर्च वाचेल. सवलत कार्डांचे नूतनीकरण अधिक सोपे व जलद होईल. गैरवापर आणि फसवणूक टाळली जाईल. सवलत कार्डांचा स्थिती ऑनलाईन ट्रॅक करता येईल. रेल्वे प्रक्रियेतील पारदर्शकता वाढेल. डिजिटल कार्ड थेट प्रणालीशी ही प्रक्रिया जोडली गेल्यामुळे आरक्षण प्रक्रिया अधिक जलद व सोपी होईल. आयआरसीटीसी (वेब व अँप ) वर ऑनलाईन तिकीट बुक करता येईल. कागदाचा वापर टाळला जाईल, ज्यामुळे हा उपक्रम पर्यावरणपूरक ठरेल. प्रिंटिंग व स्टेशनरीवर होणारा अतिरिक्त खर्च कमी होणार आहे. दिव्यांगजन कार्ड एप्लीकेशन सुविधेचा सर्व दिव्यांजन बांधवांनी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा असे, आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे सीनियर डीसीएम योगेश पाटील यांनी आवाहन केले आहे.




# सोलापूर विद्यापीठास लॉन टेनिस स्पर्धेत उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

पाटण गुजरात येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेत महिला गटात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने उपविजेतेपद प्राप्त केले.

या कामगिरीवर विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या स्पर्धा २५ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत होत आहेत. संघास डॉ. समर्थ मनुकर व प्रा. मकरंद भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभत आहे. या कामगिरीवर त्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, क्रीडा संचालक अतुल लकडे यांनी अभिनंदन केले.

**उपविजयी संघ :** ज्योत्स्ना मदने (संघनायक), कांचन चौगुले, शर्वरी वाघमोडे, गौरी गुंड.

# आयएमएसच्या रिया जाधवला राज्य बॉक्सिंग स्पर्धेत रौप्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. २७ नोव्हेंबर-**

अकोला येथे झालेल्या राज्य बॉक्सिंग स्पर्धेत इंडियन स्कूल सीबीएसईच्या रिया जाधव हीने रौप्य पदक पटकाविले.

रियाने १७ वर्षाखालील मुलींच्या ५० ते ५२ किलो वजनी गटात ही कामगिरी केली. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे संस्थापक



अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठान च्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, सौ.ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# आजपासून नाशिकला राज्य टेनिस क्रिकेट निवड चाचणी

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या सयुक्त विद्यमाने १९ वर्षाखालील मुले व मूली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचा थरार नाशिक शहरातील म्हसरूळच्या क्रीडांगणावर २८ नोव्हेंबर ते १ डीसेंबर २०२४ या कालावधील पहायला मिळणार आहे.

स्पर्धेत एकूण मुलांच्या गटात ३० जिल्हा संघांनी सहभाग नोंदवलार आहे तर मुलीच्या गटात ८ संघ सहभागी झालेत. अखिल भारतीय टेनिस क्रीकेट असोसिएशन व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्रच्या सचिव मिनाक्षी गिरी मॅडमच्या देखरेखी खाली पार पडत आहेत. सदर सपर्धेला संपूर्ण महाराष्ट्रातून पंच मंडळ उपस्थित राहणार आहे. सदर स्पर्धेचा थरार अनुभवण्यासाठी आपण ही स्पर्धा यूट्यूबच्या माध्यमातून भारताच्या काना कोपऱ्यात पोहचवली जाणार आहे.

# महाराष्ट्राची घोडदौड, दोन्ही संघाचा बाद फेरीत प्रवेश

**कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा**



महाराष्ट्र विरुद्ध उत्तरप्रदेश या मुलींच्या सामन्यातील टिपलेला क्षण.

**तभा वृत्तसेवा,**
**अलिगड, दि. २७ नोव्हेंबर-**

कुमार व मुली गटाच्या ४३व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुले व मुलींच्या संघाने बाद फेरीत प्रवेश केला आहे. बाद फेरीत महाराष्ट्राच्या मुली छत्तीसगडबरोबर तर मुले कोल्हापूरबरोबर लढतील.

अलिगड (उत्तरप्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत शेवटच्या साखळी सामन्यात भरतसिंग वसावेने (२.१० मि. ४ गुण) व आशिश गौतम (२.४०, १.४० मिनिटे व ४ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीमुळे महाराष्ट्राच्या मुलांनी पुद्देचरीवर ३९-२४ असा एक डाव राखून १५ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. जितेंद्र वसावे व सोत्या वळवी यांनी आपल्या धारदार आक्रमणात प्रत्येकी ८ गडी बाद करीत त्यांना साथ दिली. पुद्देचरीकडून स्टेफनन ६ गडी बाद केले.महाराष्ट्राच्या मुलींच्या शेवटच्या साखळी सामन्यात यजमान उत्तरप्रदेशचा २८-५ असा एक डाव २३ गुणांनी धुव्वा उडविला. स्नेहा लामकाने (३.४० मिनिटे नाबाद संरक्षण), प्रतीक्षा बिराजदार (३.१० मि. व ६ गुण) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. उत्तरप्रदेशच्या मनसीने (१.३० मिनिटे व २ गुण) अष्टपैलू खेळी करीत लढत दिली.

**कोल्हापूर, विदर्भही बाद फेरीत**

कोल्हापूरच्या मुले व मुली आणि विदर्भच्या मुले व मुलींच्या संघानेही बाद फेरी गाठली आहे. मुलीमध्ये कोल्हापूर विरुद्ध विदर्भ आणि मुलांमध्ये कोल्हापूर विरुद्ध महाराष्ट्र आणि विदर्भ विरुद्ध ओडीसा असे बाद फेरीचे सामने होतील.

# वागदरी, चपळगाव गटात भाजपाला ८ हजार मताधिक्य

## आनंद तानवडे, आ. कल्याणशेट्टी कुटुंबियांचे वर्चस्व कायम; फक्त बऱ्हाणपूर, नन्हेगावमध्ये काँग्रेस आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ नोव्हेंबर-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या चपळगाव जिल्हा परिषद गट व वागदरी जिल्हा परिषद दोन्ही गट मिळून भाजपला ८०११ मतांचे मताधिक्य मिळालेले आहे.

वागदरीत जिल्हा परिषद गटात माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे व चपळगाव गटात कल्याणशेट्टी कुटुंबाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपला चपळगाव जिल्हा परिषद गटात यश मिळाले नव्हते. भाजपने विधानसभा निवडणुकीत पुन्हा जोमाने काम करून चपळगाव गटातील चपळगाव २६७, हन्नूर १,००८, किणी ७७०, चपळगाववाडी २७३, कुरनूर ३८३, अरळी २३७, डोंबरजकळगे १७९, किणीवाडी १९०, दर्शनाळ ७०, पितापूर ३१, बोरेगाव २६७, चुंगी ३३ असे ३ हजार ८७० मताधिक्य मिळालेले असून, बऱ्हाणपूरमध्ये काँग्रेसला २१२, नन्हेगावला ६२ असे केवळ दोन गावांत काँग्रेस पक्षाला मताधिक्य मिळाले आहे.



चपळगाव गटात ज्या ज्यावेळी कल्याणशेट्टी कुटुंबातील व्यक्ती निवडणूक रिंगणात असते, त्या त्यावेळी त्यांना मतदारांनी साथ दिली आहे. हे या निवडणुकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. चपळगाव गटात लोकसभा निवडणुकीत अडीच हजारांचे काँग्रेस पक्षाला लीड गेले होते. याच गटात यदा ३,८७० मताचे भाजपला लीड मिळाले आहे. तसेच वागदरी गटात लोकसभेला भाजप लीड होते. यंदा ४,१४१ मताचे लीड भाजपला मिळाले आहे. वागदरी जिल्हा परिषद गटात बादोले २६०, पालापूर १८७ घोळसगावात २३५, किरनळ्ळी १३२, बोरगाव १८३, साफळे १५३, सांगवी बु ३७०, सांगवी खु, ६५, शिरवळ ४१४, सदलापूर १२६ बणजगोळ २९, ममनाबाद ९६, शिरवळवाडी १८२, वागदरी १,०७९, भुरीकवठे २३६, खैराट ५, गोगाव २०९ असे वागदरी गटात तब्बल ४,१४१ इतके भाजपला मताधिक्य मिळाले आहे.

चप्पळगाव मतदारसंघात भाजपसाठी सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी, अमर पाटील, विनोद मोरे, राहुल काळे, कय्युम पिरजादे, विश्वनाथ दोड्याळे, गौरीशंकर दोड्याळे, उमाकांत गाढवे, गौरीशंकर स्वामी, धोंडप्पा बिराजदार, डॉ. शरणू काळे, अजय सकट, चंद्रकांत चटमुटगे, रवि शिरपूर आदींनी परिश्रम घेतले तर वागदरीत जिल्हा परिषद गटात माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, बसवराज शेळके, प्रदीप जगताप, कमलाकर सोनकांबळे, मधुकर सुरवसे, अप्पू बिराजदार, राजेंद्र बंदीछोडे, महादेव पोमाजी, वीरभद्र मंगाणे, धोंडप्पा यामाजी, सिद्धाराम कलबुर्गी, शरणप्पा मंगाणे, लक्ष्मण भैरामडगी, प्रदीप पाटील, सुनील सावंत, संतोष पोमाजी, रवि पोमाजी, शाम बाबर, मुत्तण्णा दुधगी, शिवा नंजुंडे, काशप्पा मड्डे, प्रकाश पोमाजी, राजू मंगाणे, बसवराज पाटील, महादेव सोनकावडे, वीरभद्र पुरंत, शिवशरण यमाजी, शिवाजी सावंत, परमेश्वर सावंत, राजू हुग्गे, शरद पोतदार, बसवराज उंबराणे, जयश्री बटगेरी, शारदाबाई रोट्टे, लक्ष्मीबाई पोमाजी, राजू पोमाजी, मडेप्पा उंबराणे, सिद्धाराम धड्डे, राजू शिंदे, सौरभ उंबरे, रोहित शिंदे,, रवि भीमपुरे, सचिन ठोंबरे, संजय चौगुले, दयानंद बुऱ्हाणपुरे, दैलप्पा सरसंबी, रवि बंदिछोडे, आकाश व्हनकोरे, जगदेवी मुरळी, परमेश्वर खसगी, छबा भटारे, अविरत पात्रे, राम चितली, मल्लिनाथ पुलारी, प्रदीप पाटील, श्रीमंत कुंटोजी, वैजीनाथ वर्दे, सिद्धय्या मठपती, विठ्ठल कत्ते, कल्याणराव बिराजदार, मल्लिनाथ उणदे, शंकर गुमते, किरण पांढरे, सतीश कणमुसे, श्रीमंत कुंठोजी, मल्लिनाथ शिदोरे, स्वामीनाथ शिदोरे, सिद्धाराम मठपती, सचिन घुगरे, महेश दिवटे, राज शहाणे, हणमंत गोदे, अप्पाशा किवडे, राजू किवडे, त्रिगुळे, वैजनाथ वर्दे, स्वामी मेजर, सिद्धाराम किवडे, मल्लिनाथ फुलारी, वीरभद्र स्वामी, सोमनाथ पाटील, शिवानंद पटणे, धोंडप्पा मुलगे, बाबासाहेब भोसले, रवि बंदिछोडे आदींनी परिश्रम घेतले.

> गोगांवमध्ये आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनखाली मी व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप या सर्वांनी मिळून गावाच्या विकासासाठी काम करत आहोत. आमच्यावर विश्वास ठेऊन गावात २०९ भाजपाला लीड दिल्याबद्दल सर्वांचे आभारी आहे.
>
> **- वनिता सुरवसे, सरपंच, गोगांव**

## संक्षिप्त वृत्त



### अनंत चैतन्य महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

**अक्कलकोट दि २७ नोव्हेबर**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान प्रास्ताविक फलकाचे पुजन करण्यात आले. यानंतर इ. १० वी ची विद्यार्थिनी लक्ष्मी हलकंबे हिच्या समवेत सर्व विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकाचे वाचन केले. यावेळी शहाजी माने यांनी संविधान दिनाविषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक स्वप्नाली जमदाडे यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, शशी अंकलगे, सुरेश जाधव, अब्दुल अझीझ मुल्ला, सरदार मत्तेखाने, प्रा. रविंद्र कालीबत्ते, काशीनाथ पाटील, रमेश शिंदे, राजेंद्र यंदे, शिक्षिका. मृदुलादेवी स्वामी, मल्लम्मा चप्पळगाव, उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष व पुर्ननिर्वाचित आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, पुनम कोकळगी यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.



### बोंडले येथे ६४ जणांचे रक्तदान

**श्रीपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जनहित विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने बोंडले (ता. माळशिरस) येथे संविधान व शहीद दिनानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास उत्फस्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. उद्‌घाटन पोलीस स्टेशनचे पोलीस कॉस्टेबल टी. एच. पांढरे, पोलीस पाटील पोपटराव वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच विजय माने-देशमुख, ग्रामपंचायत सदस्या साधना पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड, माजी उपसरपंच लालासो जाधव, पत्रकार विजयकुमार देशमुख, ज्ञानेश्वर बिले, सचिन अवताडे, जब्बार आतार, अक्षय ब्लड बँक सोलापूरचे समन्वयक समाधान माने-देशमुख, सोनू जाधव, नलावडे, मोहन जगताप उपस्थित होते. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी केले तर निलेश जाधव यांनी आभार मानले.



### गोगाव येथे संविधान दिन साजरा

**अक्कलकोट, दि.२७ नोव्हेंबर-**

तालुक्यातील गोगांव येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षस्थानी संविधान दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी प्रतिमा पूजन कल्लपा बनसोडे व लक्ष्मण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आकाश गायकवाड, प्रदीप जगताप, नितीन गायकवाड, शांतकुमार बनसोडे, विशाल बनसोडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप, सूर्यकांत जिरगे, पुंडलिक वाघमारे, ज्योती आलुरे, किरण गायकवाड, परमेश्वर गायकवाड उपस्थित होते. यावेळी संविधान प्रास्ताविक वाचण्यात आले.

### ट्रक, ट्रॅक्टरच्या धडकेत एक ठार

**अक्कलकोट, दि. २७ नोव्हेंबर-**

वागदरी ते आळंद रोडवर ट्रक व ट्रॅकरच्या धडकेत ट्रॅक्टर चालक मयत झाला. सोनेराव गंगाराम बनसोडे (वय २९, रा. बणजगोळ) असे या अपघातात मयत ट्रॅक्टर चालकाचे नाव आहे. ट्रक (क्र. एम. एच. १२/ एस. एक्स. १२५९) चा अज्ञात चालका विरोधात अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला. फिर्याद स्वप्निल देविदास बनसोडे यांनी दिली. ट्रक (क्र. एम. एच. १२/ एस. एक्स. १२५९) अज्ञात चालकाने ट्रक हयगईन चालवून ट्रॅक्टर (क्र. एम. एच. १३/ डी. टी. ५५३०) या ट्रॅक्टरला समोरून येऊन जोराची धडक देऊन ट्रॅक्टरवरील चालक सोनेराव गंगाराम बनसोडे (वय २९) याच्या मृत्यूस, स्वतः जखमी होण्यास कारणीभूत झाला. घटनास्थळी सपोनि निलेश बागाव यांनी भेट दिली. अधिक तपास पोलीस हवालदार संजय पांढरे करीत आहेत.






# अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; १७ होड्या नष्ट, एक ट्रॅक्टर जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ नोव्हेंबर-**

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे पंढरपूर येथील भीमा नदीपात्रात वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या १७ लाकडी होड्या कटरच्या साह्याने नष्ट केल्या तर अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी पंढरपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणारा ट्रॅक्टरवर कारवाई केली असून, सदर ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला आहे. या बरोबरच २७ नोव्हेंबर २०२४ रोजी पंढरपूर, इसबावी, शिरढोण, चिंचोली भोसे दरम्यान असणाऱ्या भीमा नदी पात्रात वाळू चोरी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या एकूण १२ लाकडी होड्या कटरच्या साह्याने कापून नादुरुस्त करून नष्ट करण्यात आल्या आहेत, तसेच चळे येथे वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या ०५ लाकडी होड्या जेसीबीच्या साह्याने नष्ट करण्यात आल्या आहेत. या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, प्रमोद खंडागळे , महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे व पंढरपूर शहरचे पोलीस कर्मचारी सहभागी होते.



### हुन्नूरच्या आश्रमशाळेस कृती समितीचा कृतिशील शाळा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या माध्यमातून दिला जाणारा कृतिशील शाळा पुरस्कार श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळ हुन्नूर संचलित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेला जाहीर झाला आहे.

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे प्रदेश सचिव दत्तात्रय सावंत यांनी यंदा प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात सहभागी झाल्याने निवड झाल्याचे पत्र प्रशालेस दिले आहे. श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रशांत साळे व संस्थेच्या मार्गदर्शिका पूर्वी साळे यांनी शाळा कृती समिती व माजी आमदार दत्तात्रय सावंत यांचे आभार मानले. सदर पुरस्काराचे वितरण रविवारी १ डिसेंबर २०२४ रोजी सिंहगड कॉलेज कोर्टी येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे. पुरस्कार मिळाल्याने सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# यशवंतराव हे राजकारणातील दीपस्तंभ : बाबासाहेब निंबाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ नोव्हेंबर-**

स्वतंत्र महाराष्ट्राच्या लढ्यापासून ते आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघाडणीपर्यंत महाराष्ट्रासह देशाच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांचे अमूल्य योगदान असून साहित्य, संस्कृती, स्वाभिमान, विकासात्मक राजकारण याबाबतीत यशवंतराव हे प्रत्येक राजकारणी व्यक्तीसाठी दिपस्तंभ आहेत असे मत जेष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त अक्कलकोट येथील सर्जेराव जाधव सभागृहात यशवंत-शरद विचारमंच च्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ गांधींवादी नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी हे होते. यशवंत-शरद विचार मंचचे संस्थापक प्रा. प्रकाश सुरवसे यांनी प्रास्तविक केले.

यावेळी बोलताना निंबाळकर म्हणाले, यशवंतराव चव्हाण यांनी नीतिमत्ता शाबूत ठेवून स्वाभिमानी बाण्याने राजकारण व समाजकारण केले. हिमालयाच्या मदतीला धावून जाणारा हा सह्याद्री आजही प्रत्येकाला प्रेरणादायी आहे. आजच्या राजकारणी मंडळींनी यशवंतराव यांचा आदर्श घेतल्यास राजकारणाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक होईल. जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी यांनी यशवंतराव यांच्या आयुष्यातील प्रसंग सांगत आठवणीना उजाळा दिला. यावेळी फत्तेसिंह संस्थेचे संचालक सुधाकर गोंडाळ, मुख्याध्यापक शंकर व्हनमाने, प्रशांत भगरे, प्रा. मनोज जगताप, फरीद जमादार शुक्रचार्य चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन माणिक बिराजदार यांनी केले.

# टेंभुर्णी एमआयडीसीतील प्रदूषणाची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

टेंभुर्णी (ता.माढा) येथील एम आयडीसीतील कारखान्यांमधून होणाऱ्या हवेच्या प्रदूषणामुळे परिसरातील शेतकरी वैतागले आहेत. या कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या धुराच्या प्रचंड लोटामुळे पिकांच्या उत्पादन वाढीबरोबरच आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याने शेतकऱ्यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे (एनजीटी) तक्रार केली आहे.

टेंभुर्णी (ता. माढा) येथे एमआयडीसी कार्यान्वित आहे. त्यामध्ये आचिएव्ह पेपर मिल, तुळजाभवानी पेपर मिल, मिलियन बोर्ड यासह अनेक कारखाने सुरू आहेत. या एमआयडीसीच्या परिसरात शेती व नागरी वस्ती देखील आहे. गेली काही वर्षांपासून या एमआयडीसीतील कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होतू आहे. काळ्या धुराचे लोटच्या लोट सातत्याने कारखान्यांच्या धुराड्यांमधून बाहेर पडत आहेत. त्याचा शेतकरी व नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. धूर नियंत्रणावर येथील कारखाने दुर्लक्ष करत आहेत.

या कारखान्यातील धुराचा (काजळी) विपरीत परिणाम परिसरातील शेती व्यवसायावर व नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. धुराड्यांमधून बाहेर पडणाऱ्या धुरात अनेक दूषित कण आहेत. काळ्या धुरामुळे पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत असल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दिवसेंदिवस घट होत आहे. शेतात कामे करतानाही शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. तसेच परिसरात राहणाऱ्या नागरिकांना डोळे व श्वसनाच्या गंभीर स्वरूपाच्या आजारांचा सामना करावा लागत आहे.

या कारखान्यांकडे प्रदूषण नियंत्रणासाठी कोणतीही सुविधा असल्याचे दिसून येत नाही. येथील शेतकऱ्यांनी राष्ट्रीय हरित लवादासह महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूरचे जिल्हाधिकारी, माढ्याचे प्रांताधिकारी व तहसीलदार यांचेकडे लेखी तक्रार केली आहे. टेंभुर्णी एमआयडीसीतील उद्योगांतून होणाऱ्या प्रदूषणाची तत्काळ तपासणी करून त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई करावी. तसेच हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी येथील कारखान्यांना निरोधक यंत्रणा (अरेस्टर) व गाळणी यंत्र (फिल्टर) बसविण्याची सक्ती करून परिसरातील शेतकरी व नागरिकांची प्रदूषणापासून होणाऱ्या त्रासातून त्वरित सुटका करण्याची मागणी तक्रारीत केली आहे.

यावेळी मधुकर कुटे, सतिश कुटे, महेश शिंदे, सचिन कदम, भारत थोरात, रविकिरण मिटकल, विपूल देशमुख, सोपान जगताप, मारुती खडके, राजेंद्र खडके यांच्यासह २२ जणांच्या सहीनिशी तक्रार करण्यात आली आहे.

Bank of India
Relationship beyond banking
विशेष मालमत्ता पुनर्प्राप्ती व्यवस्थापन शाखा
Mezzanine Floor, 70/80 M.G.Road, Fort, Mumbai 400 001. Tel: 022-22673549 E-mail: SRM.MumbaiSouthbankofindia.co.in

**जंगम/अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव**

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. भारताची, डठच् शाखा, जसे आहे तिथे, जसे आहे तसे आणि जे काही आहे या आधारावर विकले जाईल ३१.१२.२०२४, संबंधित कर्जदाराकडून बँक ऑफ इंडियाकडे देय असलेली संबंधित देय रक्कम तसेच व्याज आणि अद्ययावत शुल्क वसूल करण्यासाठी. राखीव किंमत आणि बयाणा ठेव रक्कम टेबलमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे असेल. वेबपोर्टलवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली स्वाक्षरीद्वारे विक्री केली जाईल.

| अ. क्र. | कर्जदार/ हमीदाराचे नाव आणि थकबाकीची रक्कम | गुणधर्मांचे वर्णन | राखीव किंमत (लाखांमध्ये) / मालमत्तेचा ईएमडी (रु. लाखांमध्ये) | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | मे. पीआरबी ग्रो अँड फूड्स प्रायव्हेट लिमिटेड. कर्जदार/जामीनदार - १. पूजा आर भन्साळी २. राज आर भन्साळी अमित O/s- ८८३.८१ लाख + व्याज + शुल्क | प्लांट आणि मशिनरी आणि प्लॉट क्र. L1, L2 आणि L3, PRB gro and Foods Private Limited, चिंचोली औद्योगिक क्षेत्र, गाव: चिंचोलीकाटी, ता: मोहोळ, जिल्हा: सोलापूर (प्रतिकात्मक ताबा) | ४५८.०० / ४५.८० | ९८१९४०३५४९/ ०२२-२२६७३५४९ |

**ई-लिलावाच्या अटी आणि नियम खालीलप्रमाणे आहेत**

१. विक्री जशी आहे तशी, जशी आहे तशी आणि जे काही आहे या आधारावर केली जाईल आणि ऑनलाइन केली जाईल.
२. ई लिलावात नोंदणी आणि सहभागासाठी बोलीदाराला PSB अलायन्स (https://ebkray.in) ला भेट द्यावी लागेल. EMD कटऑफ तारीख आणि वेळ ३१.१२.२०२४ दुपारी ०३:०० पर्यंत असेल. बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी सर्व नोंदणी आणि ईएमडी संबंधित औपचारिकता दिलेल्या मुदतीत पूर्ण कराव्यात.
३. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार नाही. तथापि, इच्छूक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे शीर्षक/मालमत्तेचे आणि दावे/हक्क/देय/प्रभावित मालमत्तेची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात कोणत्याही बांधिलकी किंवा बँकेचे कोणतेही प्रतिनिधित्व तयार करत नाही आणि मानली जाणार नाही. बँकेला ज्ञात असो वा अज्ञात असो सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/हक्क/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. नाही
विक्रीसाठी ठेवलेल्या मालमत्तेबाबत ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर कोणत्याही स्वरूपाचा दावा स्वीकारला जाईल.
४. अनुक्रमांक वर सूचीबद्ध केलेल्या मालमत्तेसाठी ऑनलाइन ई-लिलावाची तारीख. १ ते १० ३१.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० दरम्यान असेल.
५. अनुक्रमांक ६ वर सूचीबद्ध केलेल्या मालमत्तेची तपासणीची तारीख १९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२:०० ते ०४:०० दरम्यान असेल.
६. तपासणी अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी, इच्छुक खरेदीदारांनm sarm.mumbaisouthbankofindia.co.in वर ई-मेलद्वारे आणि/किंवा वर नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांद्वारे आणि/किंवा बँक ऑफ मार्फत शाखेला सूचित करण्याची विनंती केली जाते.
भारत, SRM शाखा संपर्क क्र. ०२२-२२६७३५४९, तपासणी अधिक चांगली करण्यासाठी.
७. बोली केवळ ऑनलाइन प्रक्रियेद्वारे सादर केली जाईल.
८. सादर करण्याची बोली किंमत राखीव किंमतीपेक्षा कमीत कमी एक वाढ आणि त्याहून अधिक असेल आणि बोलीदारांनी त्यांची ऑफर रु.च्या पटीत सुधारावी. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) अनुक्रमांक वर सूचीबद्ध केलेल्या मालमत्तेसाठी. १.
९. बोलीदारांना त्यांच्या बोली सबमिट करण्यापूर्वी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी वेबसाइटवर जाण्याचा सल्ला दिला जातो.
१०. बोलीदारांनी विक्रीच्या अटी व शर्ती वाचल्या आणि समजून घेतल्या आणि ते त्यांना बांधील असे मानले जाईल.
११. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची तपासणी करणे आणि त्यांचे समाधान करणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी असेल.
१२. यशस्वी बिडरची बयाणा रक्कम ठेव (EMD) अंश विक्री विचारात ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची EMD परत केली जाईल.
१३. बयाणा ठेवीवर कोणतेही व्याज असणार नाही. यशस्वी बोली लावणाऱ्याला अधिकृत अधिकाऱ्याकडून बोलीची किंमत स्वीकारल्याच्या पुढील दिवसाच्या आत आणि विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी विक्री किमतीची शिल्लक रक्कम आधीच भरलेल्या ईएमडीसह विक्री किमतीच्या २५% जमा करावी लागेल. लिलाव विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे. यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा न केल्यास संपूर्ण रक्कम जप्त केली जाईल, आधीच जमा केलेली मालमत्ता पुन्हा लिलावात टाकली जाईल आणि चूक करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्तेवर/रक्कम संदर्भात कोणताही दावा/हक्क असणार नाही.
१४. अधिकृत अधिकारी/बँक किंवा ई-लिलाव सेवा प्रदाता कोणत्याही इंटरनेट नेटवर्क समस्या/पॉवर फेल्युअर/इतर तांत्रिक त्रुटी/अपयश इ.साठी जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती केली जाते की ते तांत्रिकदृष्ट्या पुरेसे पॉवर बॅक-अप इत्यादीसह सुसज्ज आहेत. ई-लिलाव कार्यक्रमात यशस्वीरित्या सहभागी झाल्याबद्दल.
१५. खरेदीदार लागू मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्क/इतर शुल्क इ. सहन करेल. आणि सर्व वैधानिक/गैर-वैधानिक देय, कर, मूल्यांकन शुल्क इ. कोणाचेही ऋणी.
१६. अधिकृत अधिकारी/बँक सर्वोच्च ऑफर स्वीकारण्यास बांधील नाही आणि कोणतीही किंवा सर्व ऑफर (ने) स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा ई-लिलाव पुढे ढकलण्याचा/ पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा किंवा कोणतीही मालमत्ता किंवा त्याचा भाग काढून घेण्याचा पूर्ण अधिकार आणि विवेकबुद्धी आहे. कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर लिलाव प्रक्रियेतून.
१७. विक्री प्रमाणपत्र केवळ खरेदीदार/अर्जदारांच्या नावाने जारी केले जाईल आणि इतर कोणत्याही नावाने जारी केले जाणार नाही.
१८. विक्री आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत विहित नियम/शर्तींच्या अधीन असेल. विक्रीच्या अटी व शर्तींवर काही असल्यास पुढील तपशील/चौकशी संबंधित शाखांमधून मिळू शकतात. दिलेले संपर्क क्रमांक.

**कर्जदार/ जामीनदारांना विक्री सूचना**

बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरी करणाऱ्याला ही नोटीस जारी करण्याचे पूर्ण अधिकार आहेत आणि आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, २००२ आणि तेथे तयार केलेल्या नियमांच्या अंतर्गत विक्रीचे सर्व अधिकार वापरण्याचे आहेत. वर नमूद केलेल्या बँकेने दिलेल्या अग्रिमांच्या संदर्भात मासिक विश्रांती, खर्च आणि शुल्क इत्यादींसह थकबाकी आणि व्याज भरण्यात तुम्ही डिफॉल्ट केले आहे. म्हणून, बँकेने तुम्हाला कलम १३(२) अंतर्गत वरील नमूद रक्कम ६० दिवसांच्या आत भरण्यासाठी मागणी नोटीस जारी केली आहे. ६० दिवसांची मुदत संपल्यानंतरही तुम्ही रक्कम भरण्यात अयशस्वी झाला आहात. म्हणून, कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकृत अधिकाऱ्याने, वर नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला. तुम्हाला याद्वारे नोटीस देण्यात आली आहे की विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी वर नमूद केल्याप्रमाणे पैसे भरावेत, असे न केल्यास मालमत्ता विकली जाईल आणि शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि किमतीसह वसूल केले जाईल. कृपया लक्षात घ्या की डिमांड नोटिस, ताब्यात घेणे, मूल्यांकन आणि मालमत्तेची विक्री इत्यादींशी संबंधित सर्व खर्च प्रथम विक्रीच्या रकमेतून वजा केले जातील जे अधोस्वाक्षरीद्वारे वसूल केले जातील आणि वरीलप्रमाणे विक्रीच्या रकमेची शिल्लक तुमच्या दायित्वासाठी विनियुक्त केली जाईल. . बयाणा रक्कम जमा करण्यासह त्यातील अटी व शर्तींवर होणाऱ्या लिलावात सहभागी होण्यासाठी तुम्हाला स्वातंत्र्य आहे.

तारीख: २६.११.२०२४
ठिकाण: मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

## क्राईम वृत्त

### सायकलस्वार वृध्दाच्या मृत्यूप्रकरणी दुचाकीस्वाराविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

शहरातील बस स्टॅन्ड जवळील भाईश्री एलपीजी गॅस पंपासमोर दुचाकीने दिलेल्या धडकेत झालेल्या अपघातात मरण पावलेल्या वृध्द सायकलस्वाराच्या मृत्यूप्रकरणी दुचाकीचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक बसवंत पाटील (वय ६३, रा. अवंती नगर, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव असून याबाबत अनिल अशोक पाटील (वय ३१, रा. गोल्डन गेट, अवंती नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संदेश पंडीत जोगे (वय २५, रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास अशोक पाटील हे सायकलवरून घराकडे जात होते. त्यावेळी भाईश्री एलपीजी गॅस पंपासमोर संदेश जोगे याने त्याच्या ताब्यातील दुचाकी वाहन क्र. एमएच १३ सीएफ २७६४ हे निष्काळजीपणे चालवून अशोक पाटील यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात सायलवरील पाटील यांच्या डोक्यास जबर मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी मुलगी अश्विनी बिराजदार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता पाटील यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. आकाश माने यांनी घोषित केले. त्यामुळे अशोक पाटील यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी जोगे याच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह पाचजणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रोहिणी मल्लिकार्जुन मगरुमखाने (वय २१, रा. निराळे वस्ती, महादेव गल्ली, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती मल्लिकार्जुन, सासरे चंद्रकांत मगरुमखाने, सासू संगिता मगरूमखान, दीर सागर (सर्व रा. महादेव गल्ली, निराळे वस्ती, सोलापूर), नणंद तेजस्विनी (रा. विजापूर, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



२९ डिसेंबर २०२२ ते ३० जून २०२४ या कालावधीत रोहिणी या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती, सासू, सासऱ्यांनी रोहिणी हिस तुझ्या पोटात वाढलेले मुल कोणाचे आहे, तु काळी आहेस, तु आमच्या घरात आल्यापासून आमच्यात भांडणे सुरु झाली आहे, मला चप्पल विक्रिकरीता भांडवलाची गरज आहे, तु तुझ्या आई व भावाकडून २ लाख रुपये घेऊन येण्यास सांगितले, परंतु तु आमचे ऐकले नाहीस, तु आमच्या सांगितल्याप्रमाणे ऐकत नाही, तुला माहेरून २ लाख रुपये घे ये म्हणून सांगितले होते, तु आमच्याकडे नांदण्याच्या लायकीची नाही, तु माहेरीच रहा, तुला आम्ही नांदविण्यास सासरी आणणार नाही असे म्हणून मानसिक व शारीरीक त्रास देऊन जाचहाट केला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.

# रस्त्यावरील टपरी, भंगार, वाहने तत्काळ हटवा

- **अन्यथा जप्त करून विल्हेवाट लावणार**
- **महापालिकेतर्फे २ ते १२ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

महापालिकेच्या वतीने दि. २ ते १२ डिसेंबर २०२४ दरम्यान शहर व हद्दवाढ भागात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे रस्त्यावर ठेवण्यात आलेली टपरी, बेवारस भंगार, वाहने आणि इतर साहित्य जप्त करण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. संबंधितांनी तत्काळ ते हटवून स्वतःच्या जागेवर ठेवावे अन्यथा ते जप्त करण्यात येईल, असा इशारा महापालिका प्रशासनाच्या प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडून दि. २ ते १२ डिसेंबर २०२४ दरम्यान शहर व हद्दवाढ भागात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. रस्त्याच्या जागेत ठेवलेले मालकीचे वाहन, टपरी, बेवारस भंगार, बंद असलेल्या स्थितीत रस्त्याच्या जागेत ठेवलेले साहित्य असल्यास संबंधित नागरिकांनी ते तात्काळ उचलून स्व मालकीच्या जागेत ठेवावे अन्यथा मोहिमेत अशा प्रकारचे वाहने/टपरी महापालिकेकडून जप्त



करण्यात येऊन त्याची विल्हेवाट लावली जाईल. नंतर या बाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

तसेच महापालिकेच्या वतीने दि २ ते १२ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम शहर व हद्धवाढ भागात राबविणेत येणार असून या मोहीमेमध्ये शहरातील नागरिकांना, सामाजिक संस्था (एनजीओ), पत्रकार यांना स्वखुशीने मोहिमेत सामील व्हायचे असल्यास त्यांनी कोणत्याही विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# विवाहितेचा पैशासाठी छळ करणाऱ्या पतीसह दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

विवाहितेचा पैशासाठी छळ करणाऱ्या पतीसह दोघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सारिका महादेव भांडेकर (वय २५, रा. आडवा नळ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती महादेव भांडेकर, सासू श्रीदेवी भांडेकर (रा. भंगे गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१७ फेब्रुवारी २०२४ ते २ जून २०२४ या कालावधीत सारिका या सासरी नांदण्यास होत्या. पती महादेव व सासू श्रीदेवी यांनी सारिका हिस तु काळी आहेस, तु आमच्या घरामध्ये शोभत नाही, तुझ्या आई वडीलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही, आम्ही दुसरीकडे लग्न केले असते तर आम्हांला चांगला हुंडा पैसे सोन्याचे दागिने मिळाले असते, तु तुझ्या आई वडीलांकडून दोन लाख रुपये घेऊन ये, तरच नांदण्यास ठेऊ, असे म्हणून सारिकाला उपाशी पोटी ठेऊन उष्टे खाण्यास दिले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जैन समाजातील १०० मुलांवर मुंज संस्कार

**● श्री मजिंनेंद्र १००८ आदिनाथ जिनेबिंब पंचकल्याक महामहोत्सव**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जैन धर्मातील श्री मजिंनेंद्र १००८ आदिनाथ जिनेबिंब पंचकल्याक महामहोत्सवातील तिसरा दिवस तपकल्याणक विधी झाला. बुधवारी सकाळी सहा वाजता जाप आणि अनुष्ठान, श्री जिनाभिषेक, शांतीधारा आणि जन्म कल्याण पूजन विधी पार पडला. त्यानंतर साडेसात वाजता सर्व मुनी राजांच्या आणि बालब्रह्मचारी पियुष भैयाजी यांच्या संस्कार मंत्राद्वारे ६० मुले आणि ४० मुली अशा १०० मुलांवर उपनयन म्हणजेच मुंज संस्कार करण्यात आले.



साडेआठ वाजता १०८ मुनी श्री सौम्य सागर महाराज, १०८ मुनीश्री शुद्धपयोग सागर महाराज यांचे मंगल प्रवचन झाले. त्यानंतर दुपारी बारा वाजता राज दरबार, ३२ मुकुटबद्ध राजांकडून भेट झाली. त्याआधी कुमारजी यांचा राज्याभिषेक, नीलांजना नृत्य, वैराग्य दृश्य, लोकांकिक देव आगमन आणि तपकल्याणक विविध क्रिया पार पडल्या. दुपारी एक वाजता पिंछी परिवर्तन विधी संपन्न झाला. यामध्ये धर्मानुरागी वृत्ती आणि त्यागी प्रतिमाधारी यांना पिंछीचा मान मिळाला. दुपारी साडेतीन वाजता मुनी श्रींचे मंगल प्रवचन झाले. त्यानंतर सायंकाळी सात वाजता महा आरती आणि सांस्कृतिक संध्यामध्ये तपकल्याणक याविषयी नाटिका सचित्र देखाव्यासह सादरीकरण केलेला पाहण्याचा लाभ श्रावकांना मिळाला.

रक्षिता मंजुनाथ किरणगी हिने पंच कल्याणाच्या भव्य व्यासपीठावर भरतनाट्यम सादर करून श्रावकांची मने जिंकून घेतलीमूर्ती प्रदाता विधीनायक अरहम मेहता, भगवान मल्लिनाथ प्रफुल्ल मेहता, भगवान वासूपूज्य विजयकुमार शहा, नितीन शहा, ईशान गांधी, ईशान शहा, भगवान नेमिनाथ पद्म कुमार व प्रदीप मेहता, भगवान पारसनाथ शशांक शहा, भगवान महावीर अमित जैन यांनी मूर्तीपदाता यासाठी योगदान दिले.




# रक्तदान करण्यासाठी व्यापक जनजागृती गरजेची

**पो.अधिक्षक अतुल कुलकर्णी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

रक्तदान म्हणजे जीवनदान आहे, गरजुंनावेळेत रक्त न मिळाल्यास त्याचे प्राण जावू शकतात, हे माहिती असूनही आपल्याकडे आवश्यकतेप्रमाणे रक्तसंकलन होत नाही त्यासाठी व्यापक जनजागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक अतुल कुलकणी यांनी केले.



डॉ. हेडगेवार रक्तपेढी आणि सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस विभागाच्यावतीने २६ नोव्हेंबर शहिद दिन व संविधान दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपअधीक्षक विजयालक्ष्मी कुर्री, राहुल मडावी, रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरुपे, सचिव सत्यनारायण गुंडला, कोषाध्यक्ष सुहास जोशी व्यासपीठावर होते. यावेळी ५२ पोलीसांनी रक्तदान करुन आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले.

सर्वप्रथम रक्तदान शिबिराचे उद्घाटन पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांच्याहस्ते फित कापून करण्यात आले. पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे आणि रक्तपेढीच्या जनसंपर्क अधिकारी संगीता मेंथे-कोरे यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी तर सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक अतुल मोहिते यांनी केले. यावेळी पोलीस निरीक्षक निंबाळकर, नामदेव शिंदे, कुंदन गायकवाड, राखीव पोलीस निरीक्षक प्रकाश शिंदे, रक्तपेढीचे सुनील हरहरे, दिलीप बनसोडे, रवि कोटा, डॉ. आनंद वैद्य आदी उपस्थित होते.

### वृध्दाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

शहरातील शेळगी परिसरातील शिवगंगा नगरात राहणाऱ्या वृध्दाने घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी उघडकीस आली.

प्रकाश भिमाशंकर उपरे (वय ७६, रा. शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या वृध्दाचे नाव आहे.



२६ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहाच्या पूर्वी प्रकाश उपरे यांनी घरातील दुकानाच्या लोखंडी अँगलला अज्ञात कारणाने दोरीने गळफास घेतला.

ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी प्रकाश उपरे यांना खाली उतरवून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील हवालदार एस व्ही जगताप यांनी बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी उपरे यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोद करण्यात आली आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५७

**आणिक स्तुति नाठवे । आणि निवांतही नसवें ।**
**नेणें कैसा प्रेमभावें । गाजोंचि लागे ।।**

अर्जुन फार भाग्यवंत आहे. तो आपल्यासमोरील कौरवसेना पाहून हे माझे आप्तेष्ट आहेत म्हणून त्यांच्या मोहात पडला आहे. आपला सखा, भक्त शत्रूच्या मोहात अडकल्याचे पाहून त्याला त्यातून बाहेर काढण्यासाठी भगवंत स्वत: अर्जुनाच्या मोहात पडले आहेत. येथे भगवंताच्या प्रेमाचे कौतुक करण्यासारखे आहे. अर्जुनाची प्रचंड पुण्याई असली पाहिजे की ज्या पुण्याईचे, सत्कार्याचे फळ म्हणून श्रीकृष्ण भगवंत त्याला सखा म्हणून लाभले आहेत. आई आपल्या बाळाचे लाड पुरविण्यासाठी एखाद्यावेळेस कमी पडू शकेल, पण भगवंत अर्जुनाचे लाड पुरविण्यात कमी पडत नाहीत. अर्जुन त्यांच्यावर अनेकदा चिडला, रागावला, रुसला तरी हसत-हसत त्या सर्व बाबीचा स्वीकार करुन भगवंत त्याचे लाड पुरवित आहेत. अर्जुनासाठी भगवंत स्वत:चे अस्तित्व विसरुन गेले आहेत. स्वत:च्या पत्नीला, सेवकाला जे विश्वरुप दाखविले नाही ते विश्वरुप अर्जुनाला अर्जुन मनात ईच्छा आणताच दाखवित आहेत. अर्जुनाच्या मनात विश्वरुप पाहण्याची इच्छा निर्माण करण्याचे कामही भगवंतांनीच केले आहे, असे माऊली म्हणतात.

भगवंताचे विश्वरुप हे श्रीकृष्णाच्या रुपाप्रमाणे गोड असेल ही अर्जुनाची कल्पना फोल ठरली आहे. या विश्वरुपात चांगली वाईट, सुरुप-कुरुप, मोठे-लहान, उंच-बुटकी, गोरी-काळी, पशु-पक्षी, मानव-राक्षस अशी सर्व रुपे आहेत. या विश्वरुपापासून अर्जुनाच्या लक्षात आले की, भगवंत म्हणजे या विश्वातील सर्व जिवांचे एकत्रीकरण होय. भगवंताचा अंश नाही असा जीव नाही. सर्व प्राणीमात्रांशी आपुलकी ठेवणे म्हणजे ईश्वराशी आपुलकी ठेवल्यासारखे असल्याचा निष्कर्ष अर्जुनाने काढला आहे. त्याचा हा निष्कर्ष तुमच्या आमच्यासाठी अत्यंत महत्वाचा व आवश्यक आहे. विश्वरुपात सर्व सृष्टी, जड, जीव पाहून या विश्वरुपाचे कौतुक करण्यासाठी अर्जुनाने आठवतील तेवढे शब्द वापरले आहेत. तुझे हे विश्वरुप असे आहे, तसे आहे, असे म्हणून अर्जुन शब्द साठा संपल्याने आता थांबला आहे. शेवटी शब्दच शिल्लक नसल्याने तो म्हणतो आहे, आणिक स्तुति नाठवे । आणि निवांतही नसवें । नेणें कैसा प्रेमभावें । गाजोंचि लागे।।. अर्थात, आता तुझी स्तुती करण्यासारखे माझ्याकडे शब्दच शिल्लक नसल्याने व स्तुती न करता राहावत नसल्याने मी आता फक्त नमस्ते, नमस्ते, नमस्ते प्रभो एवढेच म्हणू शकतो असे अर्जुन म्हणाला. खरेच आहे, आपणही आपल्या जीवनात एखाद्यावर जेव्हा जिवापाड प्रेम करतो, तेव्हा त्याच्या प्रेमाची तुलना इतर कोणाशी करीत नाही. कारण आपले प्रेम तुलनेची रेषा कधीच ओलांडून गेलेले असते. प्रेमाची तुलना कोणाशीतरी करणे म्हणजे आपल्या प्रेमाला सिमित करणे होय. म्हणून आपले प्रेम तुलनेला कधीच पार करुन गेले असल्याने आपण आपले प्रेम आपल्या प्रेमासारखेच आहे असे म्हणतो. असे अतुलनिय प्रेम आपल्याकडून सर्व जीवमात्रावर व्हावे अशी माऊली चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी ।



ज्ञानेश्वर महाराज

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक केल्याप्रकरणी सिताराम महंकाळ दोषमुक्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**

येथील सिताराम नारायण महंकाळ (वय ५५ वर्षे, धंदा-व्यापार, रा. १६६०, कुचन नगर, सोलापूर) यांनी लता अंजन गंगीशेट्टी यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने बनावट भाडे करारपत्र दस्त तयार केला व गंगीशेट्टी यांची फसवणूक केल्याप्रकरणीच्या गून्ह्यात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी विनायक एम. रेडकर यांनी सिताराम महंकाळ यांस दोष मुक्त करण्याचा आदेश दिला.

फिर्यादी लता अंजन गंगीशेट्टी व तिचे पती यांचे मालकीचे सोलापुरातील भद्रावती पेठ येथे हॉटेल प्रशांत असून सदर हॉटेल हे त्यांनी काही कालावधीकरिता सिताराम महंकाळ यास भाड्याने दिले होते. भाड्याचे कालावधीची मुदत संपल्यावर महंकाळ यांनी गंगीशेट्टी यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने बनावट वाढीव कालावधीचा भाडे करारपत्र दस्त नोटरीसमक्ष नोंदवला. त्यामध्ये लता गंगीशेट्टी व त्यांच्या पतीचे बनावट सह्या केल्या. सदर बनावट दस्ताचे आधारे महंकाळने गंगीशेट्टीविरुद्ध दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला.



दाव्याकामी गंगीशेट्टी न्यायालयात हजर झालेनंतर त्यांची फसगत झाल्याचे समजल्यानंतर गंगीशेट्टी यांनी महंकाळविरुद्ध जेलरोड पोलिसात गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याच्या सुनावणीवेळी आरोपीने कोणतेही बनावट कागदपत्रे तयार केले.

नाहीत, सदरील कागदपत्रे बनावट आहेत असा कोणताही निकाल न्यायालयाने दिला नाही, सबंध दोषारोप पत्राचे अवलोकन केले असता आरोपीविरुद्ध दोष निश्चिती करून खटला चालवण्या इतपत पुरावा नाही असा युक्तीवाद आरोपींच्या वकिलांनी केला. तो युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सिताराम महंकाळ यास खटल्यातून दोषमुक्त केले. यात सरकार तर्फे ॲड. कोकणी यांनी तर आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड.सिद्धाराम पाटील यांनी काम पाहिले.



## संविधान दिनानिमित्त संविधान गौरव परीक्षा

**सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांचा संयुक्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

२६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली संविधान गौरव शिष्यवृत्ती परीक्षा रविवार दि. २४ नोव्हेंबर रोजी झाली.

सोलापूर शहरातील जैन गुरुकुल प्रशाला आणि माढा तालुक्यातील मातोश्री माध्यमिक विद्यालय म्हैसगाव या दोन केंद्रावर ही परीक्षा संपन्न झाली. सोलापूर शहरसह सांगोला, पंढरपूर, माळशिरस, अक्कलकोट तालुक्यातील शेकडो विद्यार्थ्यांनी या परीक्षेत आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संविधानाबद्दल जनजागृती करण्यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. एकूण २० हजार रुपयांची शिष्यवृत्ती पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

## अशोक कामटे विचारमंचच्या शिबिरात १६८ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

शहीद अशोक कामटे विचारमंचच्या वतीने २६/११ संविधान दिनाचे औचित्य साधून मुंबई येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांच्या स्मरणार्थ तसेच सोलापूरचे तत्कालीन लोकप्रिय पोलीस आयुक्त स्व.अशोक कामटे यांच्या पुतण्यतिथीनिमित्त सोलापूरात स्थळ शिवस्मारक सभागृह, नवी पेठेत आणि स्थळ रेल्वे स्टेशन रोड, विटा बँके समोर, सांगोला या ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन तसेच मोफत नेत्ररोग तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे उद्घाटन महिला पोलिस मिनाक्षी नामदे व प्रियंका सौदागरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शहीद अशोक कामटे विचार मंचचे अध्यक्ष योगेश कुंदूर, सल्लागार राजू हौशेट्टी, नगरसेवक विनायक विटकर, वैशाली गुंड, काशिनाथ भतगुणकी, आनंद तालीकोटी, रूपेश करपेकर, मतीन बागवान, मयुर गवते, विजय जाधव, प्रभाकर निर्गुनकर . प्रसाद बघूरकर . राजू पालकर, विकास कुंदूर, गणेश बहदूरकर, दिपक उपळकर, नितीन कोनकर गिरीष विजापूरे, अश्विन पाथरूटकर, नागेश मंजेली . राजेश वर्देकर. विराज संतोष विजापूरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संविधान दिनानिमित संविधान वाचन वैशाली गुंड यांनी केले.



## ऑर्किड स्कूलमध्ये सैनिक छात्रशक्ती प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये सैनिक छात्रशक्ती महाराष्ट्र व नागेश करजगी ऑर्किड स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी सैनिक छात्रशक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

तीन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरात इ. ६ व ७ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना लाठीकाठी, रायफल, पिस्तूल शूटिंग, आर्चरी, ड्रिल, मार्शल आर्ट, फायर जंप, दांडपट्टा, ढाल तलवार याचे प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाचा समारोप सोहळा शाळेच्या आवारात संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, शाळेचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, सी. सी. एफ. प्रमुख संकेत कदम, प्राचार्या रुपाली हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




याप्रसंगी संकेत कदम यांनी आपल्या मनोगतात या प्रशिक्षण शिबिराचा फायदा विदयार्थ्यांना भविष्यात कशाप्रकारे होईल हे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावर शिबिरातून मिळालेल्या प्रशिक्षणातून आपले कौशल्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्या रुपाली हजारे यांनी मनोगतात सांगितले की सदर प्रशिक्षण शिबिरामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, समायोजन, लवचिकता व सामाजिक कौशल्ये इ. गुणांचा विकास होतो तसेच या प्रशिक्षणामुळे विद्यार्थी स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम बनतील. अशा नवोपक्रमाचे आयोजन करण्यास परवानगी दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन अनुजा सुसलादी यांनी केले.




## एनएबी निवासी अंधकार्यशाळेत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यशाळेचे अधीक्षक रामचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दयानंद चौगुले यांनी संविधानाचे वाचन केले.

नवनाथ कांबळे व शिवशरण गडदुरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत गायिले. तसेच हर्षद पुंडगे व दीपांजली केसकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रामचंद्र कुलकर्णी सरांनी भारताचे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कशी लिहिली व संविधानाचे महत्त्व याविषयी माहिती सांगितली. रियाज मुल्ला व आकांक्षा भंडारे मॅडम यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील यांनी केले तर आभार शिवशरण गडदुरे यांनी मानले. कार्यक्रमास शुभम वांझरे, श्रीनिवास समदूर्ले यांचे सहकार्य लाभले.

## सगळ्यांनी जवळ केलं म्हणून घडत गेलो

**सुधीर गाडगीळ यांची कृतज्ञतेची भावना**

**पुणे, दि. २६ नोव्हेंबर-**

माझी पत्नी शैला हिने जो कृतितून पाठिंबा दिला आणि मला जे करायचं ते करू दिलं त्यामुळंच गेली ५५ वर्षे मी निवेदनाच्या क्षेत्रात कार्यरत राहू शकलो. पंडित भीमसेन जोशींपासून ते लता मंगेशकरांपर्यंत आणि अमिताभ बच्चनपासून ते अब्दुल कलामापर्यंत सगळ्यांच्या मुलाखतीमध्ये मला जाणवलेली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी वयानं, ज्ञानानं, अनुभवानं, कर्तृत्वानं लहान असतानासुद्धा या सगळ्यांनी मला इतक्या सहजतेनं जवळ केलं मी त्यातून घडत गेलो, अशी कृतज्ञतेची भावना सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केली.




गाडगीळांच्या अमृतमहोत्सवानिमित्त चपराक प्रकाशनने आयोजित केलेल्या कार्य्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते उल्हास पवार, मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर, सरहदचे अध्यक्ष संजय नहार, प्रकाशक घनश्याम पाटील उपस्थित होते.

लेखणी आणि वाणी ही शब्दशक्तिची दोन्ही रुपे सुधीर गाडगीळ यांच्यावर प्रसन्न आहेत. निवेदन या कलेचा इतिहास लिहिला गेला तर त्यात गाडगीळ यांच्यासाठी मानाचे पहिले पान असेल. निवेदन या कलेला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे सुधीर गाडगीळ हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले. प्रा. जोशी म्हणाले, निवेदन हा वक्तृत्वाचा छोटा आविष्कार असला तरी उत्तम वक्तृत्वाचे सर्व गुण त्यासाठी आवश्यक आहेत. शब्दसामर्थ्य, व्यासंग, समयसूचकता, हजरजबाबीपणा आणि श्रोत्यांची नस पकडण्याचे कौशल्य यातून गाडगीळ यांनी आपल्या निवेदनाचा ठसा उमटविला. पन्नास वर्षापूर्वी गाडगीळ यांनी जी अनोखी वाट निवडली तिचा आज हमरस्ता झाला आहे. अनेकांना सूत्रसंचालक म्हणून आपले करियर घडवावे असे वाटते त्याचे श्रेय सुधीर गाडगीळ यांना आहे. चपराकचे प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रास्ताविक केले. युवराज शहा यांनी गाडगीळांचे मिष्किल अनुभव सांगितले.

## उफाळून येणाऱ्या भावनांना तिथे वाट सापडेल

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

- **आजचे नाटक :** एक्सपायरी डेट
- **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक :** चैत्यन्य सरदेशपांडे
- **दिग्दर्शक :** सागर देवकुळे

ही कहाणी आहे अनेक प्रश्न पडलेल्या अनेक पात्रांच्या एका घराची. उत्तर मिळतं का नाही यासाठी तरी हा प्रयोग पहायला हवा.

पडदा उघडताच सुंदर, रसिकतेने सजवलेला फ्लॅट दृष्टीस पडतो आणि नाटकातील एक प्रौढ स्त्री नीता आणि तिची मतिमंद मुलगी विशू (विशाखा) तिला सांभाळताना आणि घराकडे लक्ष देताना नीताची होणारी शारीरिक, मानसिक ओढाताण. बँकेत काम करणारा घरचा कर्ता पुरुष योगेश आणि बाहेर गावी नोकरी करणारी तरूण मोठी मुलगी तेजू आणि घरातला असल्यासारखा नोकर सिद्धू आणि पानसेकाकू एवढ्या मोजक्या पात्रांचे हे नाटक.



विशू पानसे काकूंच्या मुलाला चावते आणि पानसे काकू तणतणत नीताच्या घरी विशूच्या वागण्याची तक्रार घेऊन येतात इथून नाटक सुरू होते आणि विशू मतिमंद असल्याने अशी वागते अशी काकूंची समजूत घालत नीता त्यांना घालवून देते. सिद्धू हा नोकर खरा पण तो अगदी घरचाच असल्या सारखा म्हणून नीताचा त्यांच्यावर विश्वास. तोही विशूशी मोकळेपणाने वागतो आणि कोणी पहात नाही अशा क्षणी विशूला वासनेने लगट करतो. अशा भावनेला अनभिज्ञ अशा विशूला ती गोष्ट हवीही असते पण एका अनामिक आंतरिक भीतीने ती बेभान होऊन सिद्दूवर आक्रमक होऊन हल्ला करते. योगेश,नीता तिला आवरतात पण खरा प्रश्न सुरू होतो. योगेशची मोठ्या पोस्टवर होणारी बदली, परगावी असणारी नोकरी करणारी तरूण मुलगी तेजू. हे तिघेही आपापल्यापरीने उपाय शोधतात. त्याल योगेश प्रेमळ पण भडक डोक्याचा आणि तेजू परिस्थितीचा डोळसपणे विचार करणारी. विशूच्या या अवस्थेमुळे सारासार विचार हरवलेली नीता. अशा मतिमंद मुलांच्या संस्थेचा आणि तिथे विशूला ठेवण्याचा तेजूनं मांडलेला विचार प्रथम नीताला पटत नाही पण अशाच नारकांच्या मतिमंद अशा मुलांचे उदाहरण देते.

नीताला तिचे म्हणणे पटते तेव्हा ती विशूला नारकांच्या घरी सोडून येते. कारण नैसर्गिक रीत्या उफाळून येणाऱ्या भावनांना तिथे वाट सापडेल हा विचार नीताला पटतो. इथे नाटक संपते. बऱ्याच ठिकाणी मतिमंदांच्या समस्या आढळून येतात आणि त्यावर अनेक पद्धतींनी विचार होतो आहे. त्यातलाच हा एक विचार. फार नसला तरी विषय आणि त्यावरचे उत्तर हा थोडा वेगळा विषय. कौटुंबिक समस्या प्रधान तेजू - लेखकाने निर्माण केलेले शब्दबंबाळ पात्र.कलाकार गौरी गोरे नवीन पण समजून काम करण्याचा प्रयत्न दिसून येत होता.




पानसे काकूंचा आक्रस्ताळेपणा जाणवून गेला. सिद्दूचे काम करणाऱ्या शिवप्रसाद चिक्काने सहज, सुंदर अभिनयाचे दर्शन घडविले. करून सवरून आक्रस्ताळेपणा करत पुरुषी संधीसाधू वृत्तीचे छान काम करून हम भी कुछ कम नहीं हे स्पष्ट केले. पडदा उघडताच सुखवस्तू फ्लॅट जाणवला.२ लहज्ञ सुंदर सजवलेला. पण प्रत्येक भिंत सजली पाहिजे हा अट्टाहास खटकत होता. फिनिक्स पक्षी दाखविला असता तरी छान समजलं असतं. फ्लॅटला दरवाजा नव्हता म्हणून योगेशने दरवाजा उघडण्याची केलेली ॲक्शन हास्यास्पद वाटली. पात्रांना फ्लॅट भर गरगर फिरवण्या ऐवजी हालचाली सीमित करण्याकडे दिग्दर्शकाने लक्ष द्यावयास हवे होते.

प्रकाश योजनाकार- जयप्रकाश कुलकर्णी नी संपूर्ण रंगमंच आवाक्यात घेतला होता. पण पात्र स्पॉट सोडत होती. रात्रीचा निळसर हिरवट प्रकाश छान होता पण बाथरूम वर टाकलेला रेड लाइट खटकत होता. रमेश श्रावण आणि विजयालक्ष्मी कोकणे यांची रंगभूषा आणि वेशभूषा पात्रांना साजेशी होती. कुशल कुलकर्णी यांनी संगीतात प्रसंगानुरूप बासरी,सारंगी, व्हायोलिन आणि शेवटी केलेले फ्यूजन त्यातील जलतरंग यात अभ्यासपूर्णता दिसून येत होती. नाटकाची अतिशय संथगती होती. तरी, नेपथ्य, प्रकाश योजना आणि संगीत आणि विषयाचा थोडा वेगळेपणा या घटकांनी नाटक तोलून धरून, रंगत आणली.



## एस.बी.आय वित्तीय संस्थांमधून ग्राहकांची लूट

**फसवणूक रोखण्यासाठी भारतीय मित्र समूह नागरिक संस्थेचे आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर -**

भारतीय स्टेट बँक आणि वित्तीय संस्थांकडून खातेदारांच्या शिल्लक रक्कम पाहून अधिक रक्कम असलेल्या खातेदारांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून,एसबीआय लाइफ इन्शुरन्स किंवा एसबीआय म्युचल फंड सारख्या, ज्याचा बँकेचे प्रत्यक्ष संबंध नसताना खाजगी योजनांमध्ये कमिशन मिळवण्यासाठी ग्राहकांचे आणि गुंतवणूकदारांचे पैसे वर्ग केले जातात. अशा खाजगी कंपन्यांमध्ये फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे.

अशा स्थितीत ग्राहकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. यासंबंधी ग्राहकांच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. भारतीय स्टेट बँकेच्या नावाखाली खाजगी कंपनीद्वारे आणि इन्शुरन्स कंपनीद्वारे ग्राहकांचे आणि गुंतवणूकदारांचे पैसे लागले जात आहेत. याला वाचा फोडण्यासाठी भारतीय मित्र समूह व नागरिक संस्थेच्या माध्यमातून जिल्हा परिषद समोर आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी गौतम गड्डम, श्यामसुंदर जक्का, गणेश येमुल, लक्ष्मण चंदनकेरी, अभिषेक अंकम, मनोज येमुल, लक्ष्मण गडगी, लक्ष्मण मिट्ठा, महादेव माशाळकर, विशाल दुलंगे आदींची उपस्थिती होती.

**तक्रार न घेतल्यामुळे आंदोलन**

ग्राहकांचे आणि गुंतवणूकदारांचे अशा फसव्या कंपन्यांकडून फसवणूक होऊ नये यासाठी आंदोलन करत आहोत. यासंबंधी आर्थिक गुन्हे शाखेची संपर्क करून तक्रार दाखल केली असता तक्रार नोंदवून घेतली जात नाही. त्यामुळे आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही.

**- विजयकुमार अंकम, आंदोलनकर्ते**

### सुप्रभात

#### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - महात्मा फुले पुण्यदिन, ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा |
| दि. २८ नोव्हेंबर २०२४ | |
| विक्रम संवत् २०८०-८१ | |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. त्रयोदशी (अहोरात्र) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (७.३५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (१६.००) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१९.३४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

#### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पंढरपुरात जुन्या इमारतींचा धोका

## नागरिकांची मागणी; केवळ यात्रेच्या अगोदरच नव्हे तर एका झटक्यात धोकादायक इमारतींचा प्रश्न सोडवावा





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ नोव्हेंबर-**

शहरातील धोकादायक इमारती म्हणून पालिकेच्या दप्तरी ११३ इमारतींची नोंद करण्यात आलेली आहे. पालिका केवळ आषाढी, कार्तिकी यात्रेच्या काळात शहरातील अशा धोकादायक इमारतींवर कारवाईचा फार्स करते. मात्र एरव्ही त्याकडे कानाडोळा केला जातो. त्यामुळे पालिकेने यात्रेच्या अगोदर अशा इमारतींवर कारवाईचा फार्स न करता एरव्हीदेखील या इमारत मालकांच्या पाठीमागे लावून या इमारतींचा धोकादायक भाग उतरुन ती इमरत राहण्यायोग्य करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त केले जात आहे.

पंढरपूर पालिकेकडून शहरातील धोकादायक इमारतींच्या घरमालकांना प्रत्येक वर्षी आषाढी यात्रेच्या अगोदर नोटिसा देण्यात येत असतात. वृत्तपत्रांमधून देखील याबाबतचे प्रसिध्दीकरण पालिकेच्या वतीने देण्यात येत असते. आषाढी, कार्तिकी यात्रेच्या काळात काळात राज्यातून, परराज्यातून येणारे बहुसंख्या वारकरी हे शहरातील (गावभागातील) जुन्या घरांमधून, मंदिर परिसरातील मोठ्या वाड्यांमधून तसेच मठ, धर्मशाळांमधून वास्तव्य करीत असतात. शहरातील सुमारे ११३ इमारती ह्या पालिकेने सध्या धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. यात्रेच्या काळात चार पैसे मिळविण्याच्या नादात गावभागातील नागरिक आपली घरे धोकादायक जरी असली तरी ती वारकऱ्यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन देत असतात. येथील यजमानकृत्य करणाऱ्या मंडळींचा तर हा पिढीजात व्यवसायच आहे. त्यामुळे पिढ्यान्पिढ्या पासूनच संबंध आणि चार पैशांची बचत होत असल्यामुळे वारकरी देखील अशा मंडळींच्या घरांमधून यात्रेच्यावेळी वास्तव्य करीत असतात. त्यामुळे कुवतीपेक्षा जादा संख्येने अशा धोकादायक झालेल्या इमारतींमधून वारकरी रहात असल्याचे दिसून येते.

ऐन आषाढी यात्रेच्या काळात पाऊसदेखील असतो. त्यामुळे अशा इमारतींची ऐन यात्रेच्या काळात पडझड होण्याच्या घटना घडतात. यामध्ये वारकरी तसेच इमारत मालकांच्या कुटुंबातील सदस्यांना देखील आपल्या प्राणास मुकावे लागते.

मागील दहा, बारा वर्षांत यात्रा काळात धोकादायक इमारती पडल्याच्या दोन, चार घटनादेखील घडलेल्या आहेत. यामध्ये घरमालकांच्या कुटुंबातील लोकांना तसेच काही वारकऱ्यांनादेखील आपले प्राण गमवावे लागले आहेत. या घटनांच्या आठवणी अद्यापदेखील ताज्या आहेत.

त्यामुळे पूर्वीच्या अशा घटनांचा बोध घेऊन पालिकेने शहरातील धोकादायक इमारतींवर केवळ यात्रेच्या अगोदरच कारवाईचा बडगा न उगारता एरव्ही देखील अशा धोकादायक इमारतींच्या घरमालकांच्या बैठका घेऊन त्यांना योग्य समुपदेशन करुन, आर्थिक समस्या असल्यास त्यासाठी बँकांच्या विविध कर्ज योजना, पंतप्रधान आवास योजना आदींची माहिती देऊन अशा इमारतींची दुरुस्ती करुन त्या राहण्या योग्य करण्यासाठी उचित पावले उचलावीत अशी मागणी शहरातील सुज्ञ नागरिकांमधून केली जात आहे.

### अर्धवट पाडलेल्या इमारती धोकादायक

पालिकेमार्फत ज्या घरांचे धोकादायक भाग पाडण्यात आलेले आहेत अशा इमारतींची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढलेली दिसत आहे. या अर्धवट पाडलेल्या इमारतींपैकी बऱ्याच इमारतींच्या मालकांनी आपल्या घरांचे व्यवस्थित बांधकाम करुन न घेतल्याने त्या अधिकच धोकादायक बनल्या आहेत.

### धोकायदायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात एकीकडे अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंग्जचा मुद्दा गाजत असतानाच दक्षिण काशी असलेल्या पंढरीत मात्र धोकादायक इमारतीचा प्रश्न कायमच यात्रांच्या अगोदर ऐरणीवर येत असतो. आषाढी, कार्तिकी यात्रेच्या अगोदर नगरपालिकेच्या बांधकाम विभागा कडून पंढरपूर शहरातील जुन्या इमारती, मठ, आणि धर्मशाळांची पाहणी केली जाते. त्या मध्ये यावर्षी शहरातील सुमारे ११३ इमारती या धोकादायक असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

### यात्रेपूर्वी केवळ नोटिसींचा फार्स; कारवाई मात्र शून्य

पालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी प्रत्येक वर्षी आषाढी, कार्तिकी सारख्या मोठ्या यात्रेच्या अगोदर शहरातील धोकादायक इमारतींवर नुसता धोकादायक इमारत असे फलक लिहून संबंधित घरमालकांना नोटिसा देऊन आपली जबाबदारी झिडकारतात. मात्र यात्रेच्या काळात अशा इमारतींमधून भाविक वास्तव्यास असतात. त्यामुळे इमारतीच्या क्षमतेपेक्षा जास्त लोकांच्या वास्तव्यामुळे ऐन यात्रेमध्ये धोकादायक इमारती कोसळण्याची भीती नाकारता येत नाही.

## संक्षिप्त वृत्त



### कुचन प्रशालेमध्ये संविधान स्वीकृती अमृतमहोत्सवी वर्ष साजरे

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागाकडून संविधान स्वीकृतीचा अमृत महोत्सवी कार्यक्रम पार पडला. २६ नोव्हेंबर १९५० रोजी स्वीकारले गेलेल्या संविधानास यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत याचे औचित्य साधून प्रशालेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेतील सहशिक्षिका पल्लवी ननवरे यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. सहशिक्षिका डॉ. रूपाली क्षीरसागर यांनी संविधानाचे महत्त्व सांगत संविधानाचा इतिहास उलगडून सांगितला.आजच्या युगात भारतीय संविधान आदर्श ठरत असल्याचे मत व्यक्त केले. प्रशालेतील मी ज्ञानवंत, गुणवंत, यशवंत या स्पर्धेतून 'अमृत महोत्सव संविधान स्वीकृतीचा' या अंतर्गत संविधानावरील प्रश्नमंजुषाची सुरुवात झाली. या प्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाळे, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे व सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### वागदरी जि. प. शाळेत संविधान दिन साजरा, शहिदांना अभिवादन

**अक्कलकोट, दि. २७ नोव्हेंबर-**

जि. प. प्राथमिक मराठी शाळा वागदरी (ता. अक्कलकोट जि. सोलापूर) या शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पूजन अनुसया कलशेट्टी यांनी केले तर शहीद ऑफिसर अशोक कामटे यांच्या फोटोचे पूजन कविता फड यांनी केले. अर्चना गिरी, मनिषा कुणाळे यांनी भारतीय संविधानाबाबत माहिती सांगत मार्गदर्शन केले. सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे म्हणाल्या, २६-११-२००८ हा भारतीयासाठी काळा दिवस ठरला. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याने देश हादरला. अशोक कामटे, विजय साळसकर, हेमंत करकरे इत्यादी कर्तव्यावर असलेले अधिकारी यांनी दहशतवादी हल्ला परतवून लावताना वीरमरण पत्करले अशा थोर शहिदांना विनम्र अभिवादन. वीरमरण आलेल्या शहिदांनी व विसरता येण्यासारखे बलिदान दिलेले आहे असे रेखा सोनकवडे म्हणाल्या. यावेळी विद्यार्थ्यांना २६/११ चे फोटो चित्र टीव्हीवर दाखवण्यात आले.



### कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये संविधान महोत्सव

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सव मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अतिथी म्हणून महेशकुमार बोरोटीकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संविधान विषय संवेदनशील आहे आणि संविधानाचे मूलभूत हक्क आणि कर्तव्य याची जाणीव करुन घ्या हेच शिक्षकाच्या दृष्टीने संविधान संवर्धनाची जबाबदारी आहे असे म्हणता येईल. प्रारंभी घटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन स्नेहा विरणक यांनी केले. या कार्यक्रमात विशाल बिराजदार, ललिता धिमधिमे, चेतन जाधव या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संविधान दिनानिमित्ताने महाविद्यालयात प्रश्नमंजूषा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दत्ता वाघमारे यांनी केले तर प्राध्यापक प्रतिनिधीचे मनोगत डॉ. विजयकुमार जोकारे यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहा विरनक यांनी केले तर आभार पूजा व्हनमाने यांनी मानले.



### पालिकेच्या सर्व विभागात संविधान उद्देशिकेचे वाचन

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथे आज संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले. यात्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी,सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, आरोग्य अधिकारी डॉ.रेखा माने, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल, कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, नागनाथ मेंडगुळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व विभागात संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

## डोळ्यात चटणी टाकून चार तोळे सोन्याचे दागिने चोरट्याने काढून नेले

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२७ नोव्हेंबर-**

मोडनिंब (ता.माढा) येथील बुलेटवरून घराकडे जाणाऱ्या व्यावसायिकाच्या डोळ्यात चटणी टाकून चार तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. ही घटना मोडनिंबजवळ पालखी मार्गावर घडली. पोलिसांकडून आलेली माहिती अशी की, मोडनिंब येथील शेतीचे औषध दुकानदार सचिन संजय जाधव हे रविवारी सायंकाळी आपले दुकान बंद करून मोडनिंब गावातून पालखी मार्ग लगत असणाऱ्या घराकडे दुचाकीवरून निघाले.पालखी मार्गावरील रेल्वे ब्रिजखाली अज्ञात दोन चोरट्यांनी सचिन जाधव यांच्या गाडीसमोर नारळाची फांदी आडवी टाकून त्यांना थांबवले व तुझ्याजवळ असणारे सोन्याचे लॉकेट, अंगठ्या तात्काळ काढून दे, नाहीतर आम्ही तुला भोसकून टाकू, असे म्हणून डोळ्यात चटणी टाकून धमकी दिली. चटणी गेल्यामुळे गळ्यातील चेन काढत असतानाच चोरट्यांनी सचिन जाधव यांच्या हातातील अंगठ्या काढून घेतल्या. त्यामध्ये दोन तोळ्याची सोन्याची चेन, चार सोन्याच्या अंगठ्या व एक चांदीची अंगठी असा एकूण १ लाख ६० हजार ५०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला. घटनेचे वृत्त कळताच सोलापूर येथील गुन्हे अन्वेषण विभागाचे सुरेश निंबाळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यालगत असणाऱ्या सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून तपास घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. पुढील तपास पीएसआय स्वाती सुरवसे करीत आहेत.

## आ. मोहिते-पाटील यांना बडतर्फ करा : चेतनसिंह केदार-सावंत

### भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ नोव्हेंबर-**

विधान परिषदेचे सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांना भारतीय जनता पार्टी पक्षातून तात्काळ बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी सोलापूर जिल्हा पश्चिमचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र देऊन मागणी करण्यात आली.

रणजितसिंह मोहिते पाटील हे भारतीय जनता पार्टीने विधान परिषद सदस्य केले होते परंतु विधानसभा निवडणूक २०२४ या निवडणुकीमध्ये माळशिरस विधानसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या विरोधात प्रचार करून कार्यकर्ते व मतदारांना महायुती मधील भाजपच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात मतदान करण्यास प्रोत्साहित केलेला आहे म्हणून रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षातून बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आली.



## कृषी संलग्न केंद्राचे संगम येथे उत्साहात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ नोव्हेंबर-**

रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषीदूतांच्या कृषी संलग्न केंद्राचे उद्घाटन संगम सरपंच नारायणराव ताटे-देशमुख यांच्या हस्ते झाले. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष- संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य आर. जी. नलावडे, प्रा. एस. एम. एकतपुरे, प्रा. एम. एम. चंदनकर, प्रा. एच. व्ही. कल्याणी यांच्या मार्गदर्शनाखाली रोहित कल्याणी,दिपक पांढरे,श्रीनाथ पवार, केतन सारोक्ते,प्रतीक गायकवाड,रोहन माळी,हर्षल सुडके,अमरनाथ देसाई व करण भोंगळे या कृषीदूतांनी शेतकऱ्यांना माती परीक्षण, सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, औषध फवारणी आदी बाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी संगमचे उपसरपंच- आबा ताटे-देशमुख प्रगतशील शेतकरीवर्ग आणि कृषीदूत उपस्थित होते.

## माळी समाजाचा 1 डिसेंबर रोजी राज्यस्तरीय वधू-वर मेळावा



**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. २७ नोव्हेंबर-**

राज्यस्तरीय माळी समाज वधू वर व पालक परिचय मेळावा १ डिसेंबर रोजी आयोजित केला असल्याची माहिती शुभ रेखा माळी वधू वर सूचक केंद्राचे संचालक व आयोजक सुभाष शिंदे आणि सुरेखा शिंदे यांनी दिली. शुभरेखा वधू वर केंद्राचे हे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष आहे.

रविवार दि.१ डिसेंबर रोजी दुपारी एक ते पाच या वेळात स्वारगेट जवळ महालक्ष्मी सभागृह पुणे पर्वती पायथा येथे आयोजित केला आहे. शुभ रेखा माळी वधू वर सूचक केंद्रा तर्फे आयोजित केलेला हा १५ वा मेळावा आहे. मेळाव्यात प्रथम वधू वर, विधवा, विधुर, घटस्फोटित या सर्वांकरिता तसेच डॉक्टर, इंजिनीयर, पदवीधर, नोकरी व व्यवसाय करणारे वधू वर व त्यांचे पालक उपस्थित राहणार असल्याने समोरा समोर वधू वरांना व त्यांचे पालकांना या मेळाव्याच्या माध्यमातून संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. वधू वरां सोबत दोन व्यक्तींना प्रवेश आहे. मेळाव्याला हजर असलेल्या वधू-वरांना मेळाव्यानंतर आठ दिवसात इतर वधू वरांचे फोटो, फोन नंबर सह माहिती व्हाट्सअॅप वर पाठवली जाणार आहे. तसेच रौप्य महोत्सव वर्षानिमित्त सर्व वधू-वरांना या मेळाव्यात आकर्षक भेटवस्तू दिल्या जाणार आहेत. मेळावा नोंदणीसाठी ८०५५३७५५९९ तसेच ८४५९१०३५४२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संचालक सुभाष शिंदे यांनी केले आहे.

## गणपती फार्मसीच्या तीन विद्यार्थ्यांची अॅडव्हान्टमेंड इंडिया कंपनीमध्ये निवड





**टेंभुर्णी, दि. २७ नोव्हेंबर-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च टेंभुर्णी येथील विद्यार्थी अक्षय लोकरे, अजित राऊत व निहाल कोर्बु यांची गांधीनगर अहमदाबाद येथील मेडिकल कोडींग कंपनी अँडव्हॉन्टमेड इंडिया एलएलपीमध्ये निवड झाली असून त्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार आयोजित केला होता.


याप्रसंगी कार्यक्रमात बोलताना सचिव प्रा. डॉ. रवींद्र बेंदगुडे यांनी त्यांचे अभिनंदन केले व थोडक्यात महाविद्यालयाने मागील वर्षी विविध प्रकारचे व्याख्याने, कार्यशाळा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील दिशा अवगत झाल्या व त्यामुळे त्यांना आपले क्षेत्र निवडण्यासाठी मदत झाल्याचे सांगितले. यावेळी अक्षय लोकरे व निहाल कोर्बु यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रा. शिवराज ढगे यांनी सध्या चतुर्थ वर्ष पदवी विद्यार्थ्यांना यातून प्रेरणा घेऊन आपले करिअर निवडणे आवश्यक असून यामुळे त्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची तयारी करणे सोप्पे जाईल व महाविद्यालयामध्ये जात असलेल्या कार्यशाळा, व्याख्याने याचा मुलानी पुरेपूर फायदा करून घेण्याचेही आवाहन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे, डॉ. प्रशांत मिसाळ, ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे, प्रा. अक्षय भेंकी, प्रा. कोमल साळुंखे, प्रा. प्रियांका खडसरे, प्रा. गंगा गोरे आदी शिक्षक उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष अॅड. विजयराव हिरवे व उपाध्यक्ष बाबा येडगे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सोलापूर जिल्ह्यात पशुगणनेस प्रारंभ

### पशुगणनेसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात २१ व्या पशुगणनेला मंगळवार( दि.२६) नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला असून, गुरुवार (दि. २८) फेब्रवारी पर्यंत ही मोहीम चालणार आहे. ग्रामीण भागासाठी तीन हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची तर शहरी भागासाठी चार हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची नियुक्ती केली आहे. पशुगणनेमुळे पशुसंवर्धन विभागाला योजनांची अंमलबजावणी करणे, निधीची उपलब्धता करणे सोयीचे ठरणार आहे.

दरम्यान पशुसंवर्धन विभागाकडुन दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच हो मोहीम राबवली जाणार. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून तयारी केली आहे. जिल्हयात ग्रामीण भागात १ हजार ४६७ गावांसाठी २११ प्रगणक व ६१ पर्यवेक्षक असून, शहरी भागासाठी ८१ प्रगणक व १९ पर्यवेक्षक असे एकूण २९२ प्रगणक व ८० पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत. पशुगणनेसाठी नेमलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांना तालुकानिहाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. पशुगणना मोहिमेत गायवर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह, कुक्कुट पक्षी, पशुपालनात वापरली जाणारी यंत्रसामग्री यांची गणना केली जाणार आहे.

जिल्हयातील सर्व पशुपालकांनी पशुगणना करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकांना आपल्याकडील पशुंची अचुक व योग्य माहिती द्यावी हा राष्ट्रीय उपक्रम आहे. सदर पशुगणनेच्या आधारावर शासनाकडून विविध धोरण, योजना आखल्या जातात, निधीची उपलब्धता केली जाते. तसेच पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे.

त्यानुसार लसीकरण, औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे आपलेकडील जनावरांची खरी माहिती पशुपालकांनी प्रगणकांना द्यावी. असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मोडनिंबच्या शिबिरात ६० जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि. २७ नोव्हेंबर-**

मोडनिंब (ता. माढा) येथे मुंबई येथील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांच्या स्मृती जागविण्यासाठी व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मोडनिंब येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ६० जणांनी सहभाग नोंदवला.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, शिवसेना तालुकाप्रमुख




मधुकर देशमुख, बाबूराव सुर्वे, भारत शिंदे, एकनाथ सुर्वे, संजीव शिंदे, अमर ओहोळ, शिवाजी माळी, प्रकाश कोळी, माऊली पवार, माधव सुर्वे, प्रतीक सुर्वे, अशोक व्यवहारे, बाळासाहेब वागज, गणेश पाटील, डॉ. मारुती सुर्वे, पिनू पाटील, आकाश पाटील आदी उपस्थित होते.टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे निरीक्षक दीपक पाटील यांनी शिबिराचे उद्घाटन केले. शिवसेना गटप्रमुख दीपक सुर्वे यांच्या वतीने सलग सोळा वर्षे या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. प्रास्ताविक दीपक सुर्वे यांनी केले तर आभार माळी यांनी मानले.



### संक्षिप्त वृत्त...



## भारतीय संविधान हाच राष्ट्रीय एकात्मतेचा धागा : डॉ उबाळे

**माढा, दि. २७ नोव्हेंबर-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी संलग्न आर्या कृषी महाविद्यालयांमध्ये २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितिन उबाळे होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधान दिन व त्याचे महत्व याविषयी मनोगते व्यक्त केली. प्रा. ज्ञानेश्वरी झोळ यांनी संविधान उद्देशिका वाचन केले. सर्व उपस्थितांनी संविधान शपथ घेतली. यावेळी डॉ. तृप्ती राठोड, प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. के. पी. वाघे, कुमार शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. के. पी. वाघे यांनी केले. हा कार्यक्रम भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक योगदानाचा आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रती आदर व्यक्त करण्याचा एक महत्त्वपूर्ण क्षण ठरला.




## वळसंग पोलिस ठाण्यात ४५ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील पोलिस ठाण्यात संविधान दिन व २६/११ शहिद दिनानिमित्त श्री सिद्धेश्वर ब्लड बँकेतर्फे घेतलेल्या शिबिरात ४५ जणांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्याचे पोनि महेश स्वामी, वळसंग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले, डॉ. हरिश्चंद्र गलियाल, नम्रता बेंर्केल, जिनत रामपुरे, वाहब बागवान, आसिफ पठाण, शब्बीर शेख, पोलिस उपनिरीक्षक उस्मान शेख, पोलिस उपनिरीक्षक सागर पाटील, श्रेणी पोलिस उपनिरीक्षक धनसिंग राठोड, विद्यासागर सोनकांबळे, हवालदार अशोक पाटील, पोलिस अंमलदार मल्लिनाथ बंदिछोडे, रामदास मालचे, प्रसाद मांडरे, हवालदार अनिसा पटेल, रमणा राठोड, अंबिका माशाळे, राजश्री कोले, गजानन गायकवाड, बशीर शेखर, बालाजी रेड्डी यांच्यासह पोलिस व रक्तदाते उपस्थित होते. अक्कलकोटवरुन येऊन पोनि महेश स्वामी यांनी रक्तदान केले.

## हत्तूर येथे ३ डिसेंबरला अभिनव सिद्धारुढ स्वामीजींचे प्रवचन

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.00 वाजता षण्मुखारुढ मठ विजयपूर व शांताश्रम हुबळी मठाचे श्री अभिनव सिद्धारुढ स्वामीजींचे प्रवचन होणार आहे तरी पंचक्रोशीतील सदभक्तांनी प्रवचनाचा व गुरुदर्शन आशीर्वादाचा लाभ घ्यावा. गेल्या १५ वर्षांपासून परमपूज्य गुरुवर्य लिं. अभिनव शिवपुत्र महास्वामीजी यांच्या कृपाशीर्वादाने दरवर्षी अध्यात्मिक प्रवचनाचा सुविचार संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.बरुरचे आनंद शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत याही वर्षी प्रवचन हत्तूर गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पटांगणात संपन्न होणार आहे तरी सदभक्तांनी अध्यात्मिक प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धारुढ सदभक्त मंडळ व हत्तूर ग्रामस्थ यांनी केले आहे.



## शमा उर्दू शाळेत संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

हदवाढ भागातील मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळेत संविधान दिवस मुख्याध्याक अबुबकर नल्लामंदू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. शिक्षिका शाहीन सदफ यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाची शिकवण देणाऱ्या संविधानाचे सर्व विद्यार्थ्यांकडून वाचन करून घेतले. व संविधानाचे अधिकार सांगून मार्गदर्शन केले. अबरार अहमद नल्लामंदू यांनी सूत्रसंचालन केले तर दिलशाद बिजापूरे यांनी आभार मानले. या वेळी माजी मुख्यध्यापक ए.क्यू. नल्लामंदू, आसीया बिजापूरे, मेअराज अल्लोळी, जुबेदा सैदखा उपस्थित होते.

## अणदूर येथे २ डिसेंबर रोजी श्री खंडोबाची यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २७ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील कुलदैवत श्री खंडोबाची यात्रा येत्या २ डिसेंबर (सोमवार) रोजी मोठ्या उत्साहात भरत आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यात्रेची जय्यत सुरु आहे.

सकाळी ९.३० वाजता श्री खंडोबाची महापूजा होईल. दिवसभर भंडारा, खोबरे उधळणे, महानैवेद्य दाखवणे आदी कार्यक्रम पार पडतील. रात्री दहा वाजता श्रींची छबिना-मिरवणूक काढण्यात येईल. रात्री १२ वाजता नळदुर्गच्या मानकऱ्याचे आगमन होईल व त्यानंतर मानपानाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर अणदूर-मैलारपूर (नळदुर्ग) च्या मानकऱ्यात खंडोबाची मूळ मूर्ती नेणे व आणण्याचा लेखी करार होईल. मध्यरात्री २.३० वाजता खंडोबाच्या मूर्तीच्या पालखीचे मैलारपूर (नळदुर्ग) कडे प्रस्थान होईल. ३ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता



मैलारपूर (नळदुर्ग) मंदिरात खंडोबाचे आगमन होईल व नंतर विधिवत प्रतिष्ठापना केली जाईल. यात्रेनिमित्त श्री. खंडोबाच्या मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. भाविकांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. श्री खंडोबा मंदिर समिती व श्री खंडोबा यात्रा कमिटी यात्रा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. श्री खंडोबा हा महादेवाचा अवतार असून खंडोबाची महाराष्ट्रात ८ प्रमुख ठिकाणे आहेत. पैकी अणदूर-मैलारपूर (नळदुर्ग) हे महत्त्वाचे स्थान म्हणून ओळखले जाते. दमयंती राणीच्या भक्तीसाठी श्री खंडोबा नळदुर्ग येथे प्रकट झाले, अशी आख्यायिका आहे. श्री खंडोबा आणि बाणाई यांचा विवाह नळदुर्ग येथे झाला होता.

### मैलारपूर येथेही मंदिर

अणदूर व मैलारपूर (नळदुर्ग) या दोन्ही ठिकाणी खंडोबाची मंदिरे असून दोन्ही ठिकाणचे अंतर चार कि.मी. आहे. खंडोबाचे अणदूर येथे सव्वादहा महिने व मैलारपूर (नळदुर्ग) येथे पावणेदोन महिने वास्तव्य असते. अणदूरच्या यात्रेनंतर खंडोबाचे मैलारपूर (नळदुर्ग) कडे प्रस्थान होणार आहे.

## निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर; एका शिक्षकाविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२६ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहिल्याप्रकरणी आंधळगाव माध्यमिक प्रशालेचे शिक्षक जावेद महमद आतार यांच्याविरूध्द लोकप्रतिनिधी अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील आरोपी तथा शिक्षक जावेद आतार हे आंधळगांव येथील दत्ताजीराव भाकरे प्रशालेत कर्मचारी असून विधानसभा निवडणूकीसाठी दि.८ नोव्हेंबर रोजी १३.३० ते १८.३० दरम्यान पंढरपूर येथील दाते मंगल कार्यालयात प्रशिक्षणासाठी हजर राहणेबाबत लेखी निवडणूक विभागाने आदेशाव्दारे कळविले होते. परंतु ते प्रशिक्षणास गैरहजर राहिले होते. निवडणूक कर्तव्यास जाणेकरीता दि.१५ व दि.१८ नोव्हेंबरच्या २३ वाजेपर्यंत सदर शिक्षकास मोबाईल क्रमांक ७३८७९६५९६६ वर फोन करून संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही तदनंतर निवडणूक अधिकार्यांनी प्रशालेचे मुख्याध्यापक यांना फोन व्दारे सदर कर्मचार्यास हजर राहणेबाबत कळविले होते. मात्र त्यांचाही फोन उचलला नसल्याचे सांगण्यात आले.तसेच त्यांना लेखी अथवा तोंडी खुलासा सादर करणेस सांगितल्यावर त्याचे उत्तरही दिले नसल्याचे निवडणूक नायब तहसीलदार जयश्री विरभद्र स्वामी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले असून स्वामी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.





## हालहळ्ळीतील मुले, ग्रामस्थांनी घेतली बालविवाह मुक्तीची शपथ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

हालहळ्ळी अ (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थी गावांतील अन्यत्र शिक्षण घेणाऱ्या मुलांसह ग्रामस्थांनी बालविवाहमुक्त भारताची संकल्पना राबविण्याची शपथ घेतली. ही शपथ महिला व बालविकास विभागातील विधी तथा परीविक्षा अधिकारी ॲड. सारीका कोरे-हुक्केरी यांनी दिली.

सरपंच प्रकाश बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी जमलेल्या ग्रामस्थांनी बालविवाह मुक्तीची शपथ घेतली. यावेळी उपसरपंच शंकर जमादार, ग्रामपंचायत सदस्य निलप्पा बिराजदार, रेखा बिराजदार, विजयालक्ष्मी सुतार, ग्रामसेवक अभय नेलुरे, पोलिस पाटील मल्लिनाथ बिराजदार-पाटील, यशवंत बिराजदार, हणमंत बिराजदार, माजी ग्राम पंचायत सदस्य बसवराज बिराजदार, गुरुनाथ गोविंदे, चन्नप्पा बिराजदार, हणमंत कळमंडे, महेश कळमंडे, मडोळप्पा बिराजदार, मुख्याध्यापक उमाकांत कोटे, नदाफ, शालेय समिती अध्यक्ष पूजा बिराजदार, आशा वर्कर सविता बिराजदार, ज्योती बिराजदार, अशोक कोळी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते समाधान आवताडेंचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे विजयी उमेदवार समाधान आवताडे यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे नुकतीच भेट घेतली. या भेटीमध्ये फडणवीस यांनी आ. आवताडेंचा तर तर आवताडेंनी देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार केला.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील यावेळचा सामना अतिशट अटीतटीचा होता. या अतिशय अटीतटीची झालेल्या निवडणुकीत भाजपाचे विद्यमान आ. समाधान आवताडे यांनी अखेर बाजी मारली. समाधान आवताडेंनी आपले प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसचे उमेदवार भगिरथ भालके यांचा सुमारे ८ हजार ४३० इतक्या मतांनी पराभव केला. मुळात सुरुवातीला चौरंगी असलेली लढत निकालानंतर खऱ्या अर्थाने दुरंगी झाल्याचे दिसून आले. दमऱ्यान या निवडणुकीतील विजयानंतर तसेच महायुतीच्या भव्य आणि ऐतिहासिक विजयानंतर भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची आमदार समाधान आवताडे यांनी नुकतीच मुंबई येथील त्यांच्या सागर या निवासस्थानी भेट घेतली.




## सनराइज् गुरुकुलमध्ये संविधान दिन साजरा

**टेंभुर्णी, दि. २७ नोव्हेंबर-**

श्री माऊली शिक्षण संस्था संचलित सनराईज इंग्लिश मीडियम गुरुकुल स्कूल टेंभुर्णी मध्ये संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला तसेच २६/११ ला शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी मंगेश काशीद, प्राचार्या शाहिदा पठाण उपस्थित होते. यामध्ये सर्व कार्यक्रम प्रशालेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्तम रीतीने संपन्न झाला.

## बार्शीत सोमवारी शाहीर अमर शेख राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा बार्शी यांचेवतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शाहीर अमर शेख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळा सोमवार दि. २ डिसेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता संत तुकाराम सभागृह श्री शिवाजी महाविद्यालय परिसर बार्शी येथे आयोजित केला आहे.

या साहित्य पुरस्कार सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून माजी आमदार राजेंद्र राऊत उपस्थित राहणार आहेत तर पुरस्कार प्रदान प्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील पानिपतकार यांचे हस्ते करण्यात येणार आहे. साहित्य पुरस्कारांचे मानकरी गद्य विभाग कीड (कादंबरी) लेखक विशाल मोहोड तळवेल, जि. अमरावती, मायावी (कथासंग्रह लेखक सुनील मंगेश जाधव पालघर पद्य विभाग दिडदा दिडदा कवयित्री डॉ. अदिती काळमेख सातारा, कळ पोटी आली ओठी कवी इंद्रजीत पाटील, रुई पोस्ट मालेगाव, माणुसकीचे आभाळ कवी रामचंद्र इकारे, बार्शी. सदर कार्यक्रमासाठी उपस्थिती म्हणून डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, संस्थेचे नंदन जगदाळे उपाध्यक्ष, पी. टी. पाटील जनरल सेक्रेटरी, श्री. अरुण देबडवार, जॉईंट सेक्रेटरी, श्री. जयकुमार शितोळे खजिनदार हे लाभणार आहेत. पुरस्कार वितरणानंतर प्रसिद्ध लेखक पानिपतकार श्री. विश्वास पाटील यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ समाजसेवक श्री. जुगलकिशोर तिवारी घेणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष श्री. पां.न. निपाणीकर सर, उपाध्यक्ष प्रा. श्रीमती प्रमिला देशमुख, कार्याध्यक्ष प्रो. डॉ रविराज फुरडे, प्रमुख कार्यवाह श्री प्रकाश गव्हाणे, सहकार्यवाह श्री. प्रकाश महामुनी कोषाध्यक्ष, श्री. बी. आर. देशमुख व कार्यकारणी सदस्यांनी केले आहे.

## पत्रकारांच्या कुटुंबाचे आशीर्वाद घेण्यासाठी काम करणार

### संदीप काळे : व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल विंगचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ नोव्हेंबर-**

बदलत्या काळामध्ये डिजिटल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाला पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आमची संघटना करणार आहे. आम्ही पत्रकार व त्याच्या कुटुंबियांचे आशीर्वाद घेण्यासाठी काम करत आहोत. व्हॉईस ऑफ मीडियाची पंचसूत्री जगातील दोनशे देशात पोहचवायचे आहे, असे उद्गार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी काढले.

व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल विंगचा महाराष्ट्र राज्याच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा बार्शी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राज्य उपाध्यक्ष अजित कुंकुलोळ, शिक्षणतज्ज्ञ अनिल बनसोडे, साहित्यिक रामचंद्र इकारे,



कर सल्लागार व व्हॉईस ऑफ मीडियाचे संचालक सुरेश शेळके, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, वृक्ष संवर्धन समिती व कर्मवीर ढोल-ताशा पथकाचे अध्यक्ष उमेश काळे, व्हॉईस ऑफ मीडियाचे धाराशिव जिल्हा अध्यक्ष हुंकार बनसोडे, नाशिक जिल्हा अध्यक्ष कुमार कडलग आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पत्रकार समाजाच्या कल्याणासाठी आवाज उठवण्याचे काम करतो, परंतु त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणारी संघटना म्हणून पुढे आलेल्या व्हॉईस ऑफ मीडियाचे अभिनंदन करताना शिक्षणतज्ज्ञ अनिल बनसोडे बोलत होते. मोबाईलच्या माध्यमातून पत्रकारिता करीत असताना विश्वासार्हता निर्माण करण्याचे काम पत्रकाराने केले पाहिजे, समाजाने चांगले काम करणाऱ्या व्यक्तीच्या कायम पाठीशी राहिले पाहिजे, असे मत साहित्यिक शितोळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त डिजिटल मीडिया पत्रकारांनी व्हॉईस ऑफ मीडियाचे सभासद व्हावे, असे आवाहन प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांनी सर्वांना केले.

पत्रकारांसाठी चोवीस तास काम करणारी ही संघटना असून पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी व संघटनेच्या माध्यमातून सोडविले जातील, असे प्रतिपादन कार्यालयीन राज्य सचिव गणेश शिंदे यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. समाजामध्ये अनुयायी तयार करणारे तर अनेक आहेत परंतु नेतृत्व तयार करणारी ही संघटना आहे, आपल्याकडे असणारी रत्नपारखी दृष्टी हे अत्यंत महत्त्वाची आहे, कामावरुन निवड करणारी ही संघटना आहे, असे गौरोद्गार साहित्यिक रामचंद्र इकारे यांनी काढले. प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे हर्षद लोहार, सचिव इर्शाद शेख, सहसचिव प्रसाद कानेटकर, कोषाध्यक्ष प्रविण पावले, उपाध्यक्ष मनोज घायाळ, अश्विनी पुरी,कार्याध्यक्ष अशोक घावटे, बाळासाहेब भालेराव, कार्यवाहक संतोष शेलार, राज्य संघटक दीपक ढवळे यांनी स्वीकारली.

डिजिटल मीडिया विंगच्या पत्रकारांना अधिकृत मान्यता, शासनाच्या विविध सोयी व सवलती मिळाव्यात म्हणून काम करण्यात येणार असल्याचे नुकतेच नियुक्त झालेले प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार यांनी सांगितले. लवकरच डिजिटल मीडिया विंगची उर्वरित राज्य कार्यकारिणी लोकशाहीच्या माध्यमातून निवडणुकीतून निवडली जाणार आहे, असे ही ते म्हणाले. सूत्रसंचालन अपर्णा दळवी हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कर्मवीर ढोल-ताशा ध्वज पथक, व्हॉईस ऑफ मीडिया, बार्शी व तालुक्याचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संजीवन हॉस्पिटल येथे महिलांसाठी मोफत स्तन तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**
रोटरी क्लब उस्मानाबाद, ओस्ला व युविकॅन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवन हॉस्पिटल येथे २१ ते ६८ या वयोगटातील महिलांसाठी दि.२५ नोव्हेंबर पासून मोफत स्तन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत महिलांची नियमित तपासणी केली जाईल.

युविकॉन फाउंडेशनच्या वतीने डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी, डॉ. क्रांती भिसे, डॉ. राधिका मुंद्रडा व डॉ. मयुरी जाधव यांनी महिलांची तपासणी केली. या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जिंतूरकर, संजीवन हॉस्पिटलचे डॉ. अभय शहापूरकर, डॉ. मीना जिंतूरकर, किरण देशमाने व डॉ. अनार रवींद्र साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात एकूण ४३ महिलांची तपासणी करण्यात आली.



### संक्षिप्त वृत्त...



#### गटशिक्षण अधिकारी असरार सय्यद यांची कन्या प्रशालेस भेट

**तेर, दि.२७ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेस गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद यांनी २७ नोव्हेंबरला भेट दिली. गटशिक्षण अधिकारी असरार सय्यद यांनी इयत्ता पहिली ते सातवी वर्गाच्या नोंद वह्या, प्रगतीपत्रक, अभिलेखे पूर्ण पाहीले, शालेय परिसर, परसबाग पाहून त्यानी समाधान व्यक्त केले. यावेळी तेर बिटचे विस्तार अधिकारी मधुकर तोडकर उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांनी गटशिक्षण अधिकारी असरार यांचा सत्कार केला.



#### पार्वती प्रशालेत संविधान दिन साजरा

**जळकोट, दि.२७ नोव्हेंबर -**
पार्वती कन्या प्रशाला, जळकोट येथे २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून अतिशय उत्साही वातावरणामध्ये संपन्न झाला. प्रथमतः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभाई पटेल यांना भारतीय संविधान मूळ प्रत देत असलेल्या प्रतिमेचे प्रशालेमध्ये प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर २६/११ मध्ये अतिरेकी हल्लूयातील शहिदांना नमन करण्यात आले. यावेळी पार्वती कन्या प्रशालेमधून प्रभात फेरी काढण्यात आली. या फेरीची सरपंच गजेंद्र कदम, कृष्णात मोरे, अनिल छत्रे, शंकर कदम, बबन मोरे यांच्या उपस्थितीमध्ये सांगता करण्यात आली.



#### एकलव्य विद्या संकुलात संविधान दिन उत्साहात साजरा

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान संचलित एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी (ता. तुळजापूर) येथे संविधान दिन साजरा करणेत आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व उद्देशिकेला मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वक्ते संतोष बनसोडे यांनी संविधान दिनाविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या देशाचा कारभार संविधानानुसार चालते असे सांगितले. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच महादेव शेंडगे, अशोक बनकर, अण्णासाहेब मगर, अनिल घुगे, संतोष बनसोडे, बालाजी क्षीरसागर, हरीश मगदूम, निर्मला हुग्गे, प्रणिता शेटकार, सविता गोरे, माऊली भुतेकर, किरण चव्हाण, भीम कुंभार, शालीवाहन वाघमोडे, दयानंद भडंगे, खंडू काळे, कोंडीबा देवकर, दत्ता भोजने आदि उपस्थित होते.

### धरण उशाला आणि कोरड घशाला...

## कडकनाथवाडी साठवण तलावाची गळती थांबेना; शेतकरी ग्रामस्थ चिंतेत

**संबंधित अधिकाऱ्यांकडून ठेकेदाराची पाठराखण...**

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ नोव्हेंबर -**
शासन दुष्काळ निवारणासाठी अनेक उपाययोजना राबवित आहे. त्यात मराठवाड्यात मोठ्या प्रमणात नवीन तलाव बांधणी, नदी खोलीकरण, तलाव खोलीकरण अशी अनेक कामे दुष्काळ निवारणासाठी शासनाने केली आहेत. २०१४ ला महाराष्ट्रात त्यातल्या त्यात मराठवाड्याला मोठ्या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागले होते. त्यात शेतकरी मोडकळीस आला होता.

जनावरांसाठी चारा छावण्या, नागरिकांसाठी टँकरने पिण्याच्या पाण्याची सोय अश्या अनेक उपाययोजना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला २०१४ मध्ये कराव्या लागल्या होत्या. दुष्काळ आणि सतत नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी झाले होते. त्यात




वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी साठव तलाव क्रमांक (२) चे काम सुरु करण्यात आले. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निधी उपलब्ध करून लवकरात लवकर तलावाचे काम पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. ठेकेदाराने काम पूर्ण केले होते, मात्र हे काम पूर्ण झाल्यापासून या तलावाच्या भराव कामातून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. या तलाव क्षेत्रात हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली येणार आहेत. मात्र तलावातून पाणी वाया जात असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची, नागरिकांची स्वप्न पाण्यासोबत वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत आहे. नंतर धरण उशाला आणि कोरड घशाला असेच म्हणावे लागेल. परिसरातील शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी अनेक वेळा तलाव गळती बाबत संबंधित अधिकाऱ्यांना कल्पना दिल्या आहेत. तसेच तलाव गळती संदर्भात भाजपचे वाशी तालुका सरचिटणीस सुधीर घोलप यांनी तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. असा आरोप केला असून कामाची चौकशी करून ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हेगारीची कारवाई करण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली आहे. तसेच पाणी गळती न थांबल्यास तलावात जलसमाधी देखील घेण्याचा गंभीर इशारा सुधीर घोलप यांनी जिल्हाधिकारी व संबंधित विभागाकडे यापूर्वी दिला होता. संबंधित विभागाने घोलप यांना आपण जलसमाधी घेण्याचा निर्णय माघे घ्यावा आम्ही लवकरात लवकर तलाव गळती संदर्भात उपाययोजना करू असे, आश्वासन दिले होते. मात्र बरेच महिने उलटले असून अद्याप त्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याने अधिकाऱ्यांच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

अधिकारी ठेकेदारची पाठराखण करत आहेत, असा आरोप देखील भाजप तालुका सरचिटणीस सुधीर घोलप यांनी केला असला तरी तलावाची प्रत्यक्ष सर्व परिस्थिती पाहता तलावातून लाखो लिटर पाण्याचा विसर्ग मात्र सुरू आहे. गळती न थांबल्यास करोडो रुपये पाण्यात जाण्याची शक्यता ही नाकारता येत नाही.

## परंडा तालुक्यात आढळला बिबट्या; नागरिकांत दहशत

**शेतकऱ्यांना सतर्क रहावे : वन विभागाचे आवाहन...**


(संग्रहीत छाया)

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**
परंडा तालुक्यात कपिलापुरी, सोनारी, रूई खामसगाव, सोनगिरी, कारंजा, भोंजा, वांगेगव्हाण, लोणी व खासगाव या गावांमध्ये बिबट्या हा वन्यप्राणी २१ नोव्हेंबर रोजी आढळून आला आहे. वन विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांनी मोक्यावर जाऊन पाहणी केली असता काही पाळीव जनावरांवर बिबट्याने हल्ला करून ठार मारल्याचे दिसून आले.

परंडा तालुक्यातील काही गावात बिबट्या असल्याची माहिती वाऱ्या सारखी काही गावात पसरली. त्यामुळे गावातील नागरिकांत दशहतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून कपिलापुरी, सोनारी, खामसगाव, रुई, सोनगिरी, कारंजा, भोजा, वांगेगव्हाण, लोणी व खासगावासह इतरही गावात वन कर्मचारी तैनात केले असून ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे.

शेतकऱ्यांनी शेतात रात्री मुक्काम करू नये, जनावरे बंदिस्त गोठ्यात अथवा निवाऱ्यात बांधावे, लहान मुलांना एकट्याने फिरू देऊ नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, ज्या गाव व शिवारात बिबट्या आढळल्यास संबंधित गावाच्या सरपंचांना कळवावे, अफवा पसरवण्यापासून दूर राहून पुढील संभाव्य मानवी व पाळीव प्राणी यांची होणारी जीवित हानी टाळावी, असे आवाहन सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा) व्ही.बी. तांबे यांनी केले आहे.

## धाराशिवात ४ व ५ डिसेंबरला जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरु युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने जिल्हास्तर युवा महोत्सव २०२४ चे आयोजन ४ ते ५ डिसेंबर २०२४ दरम्यान छत्रपती शिवाजी नाट्यगृह, धाराशिव येथे करण्यात आले आहे.

या जिल्हास्तर युवा महोत्सवात संकल्पना आधारित बाबीमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना सांस्कृतिक कार्यक्रम (यात समुह लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम (कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व, कविता व फोटोग्राफी) युथ आयकॉन कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या जिल्हा युवा महोत्सवात १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होवू शकतील. जन्म तारखेबाबत सबळ पुरावा म्हणुन जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. जिल्हयाचा रहिवासी असल्याबाबत आधारकार्ड, रहिवाशी दाखला जोडणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या आयोजनाकरिता आपली नाव नोंदणी बाबनिहाय विहित नमुन्यातील अर्जासह २ डिसेंबरपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे करावी.

## विधानसभा निवडणुकीत मतदान केले नाही म्हणून मारहाण

**कपिलापुरीतील घटना...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**
आमच्या सांगण्याप्रमाणे कालच्या विधानसभा निवडणुकीत मतदान का केले नाही? असे विचारात जातिवाचक शिवीगाळ करून लोखंडी रॉडने १२ जणांनी महिलांना व पुरुषांना बेदम मारहाण केली. यात एक तरुण जखमी झाला आहे. हि घटना सोमवारी (दि.२५) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास परंडा तालुक्यातील कपिलापुरी येथे घडली.

परंडा तालुक्यातील कपिलापुरी येथील किरण संतोष शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोमवार, दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता घरी असताना ग्रामपंचायत कार्यालय



कपिलापुरी येथील शिपाई बाहुबली मसलकर हा माझ्या घरासमोर येऊन तुम्ही आमच्या सांगण्याप्रमाणे कालच्या विधानसभा निवडणुकीत मतदान का केले नाही? असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी राजकुमार जैन, जयकुमार जैन, भरतेष आवानी, जयघोष जैन, किशोर आवानी, नाबिराज आवानी, बाहुबली मसलकर, जितेंद्र वसगडेकर, अनिल वसगडेकर, रणजित राजकुमार जैन, जगदिश जैन (सर्व रा.कपिलापुरी ) हे घरासमोर जमून फिर्यादी व भांडण सोडविण्यासाठी आलेल्या यशवंत बोडरे या दोघांना राजकुमार जैन यांनी जातीवाचक शिवीगाळ करून, तुम्ही आमच्या गावात राहून विरोधात मतदान करता असे म्हणून लोखंडी गजाने मला डावे हाताचे कोपरावर, डोक्यात तसेच पाठीवर मारले. यातील दोन आरोपींनी घरात घुसून दोन महिलांचा विनयभंग केला.

याबाबत किरण संतोष शिंदे यांनी परंडा पोलिस ठाण्यात सोमवारी (दि.२५) तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी १२ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास भूम उपविभागीय अधिकारी गौरीप्रसाद हिरामेठ करत आहेत.

## अणदूर येथे २ डिसेंबरपासून श्री खंडोबाची यात्रा; तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील कुलदैवत श्री खंडोबाची यात्रा येत्या २ डिसेंबर (सोमवार) रोजी मोठ्या उत्साहात भरत आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यात्रेची जय्यत सुरु आहे.

सकाळी ९.३० वाजता श्री खंडोबाची महापूजा होईल. दिवसभर भंडारा, खोबरे उधळणे, महानैवेद्य



दाखवणे आदी कार्यक्रम पार पडतील. रात्री दहा वाजता श्रींची छबीना-मिरवणुक काढण्यात येईल. रात्री १२ वाजता नळदुर्गच्या मानकऱ्याचे आगमन होईल व त्यानंतर मानपानाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर अणदूर-मैलारपूर (नळदुर्ग) च्या मानकऱ्यात खंडोबाची मूळ मूर्ती नेणे व आणण्याचा लेखी करार होईल.

मध्यरात्री २.३० वाजता खंडोबाच्या मूर्तीच्या पालखीचे मैलारपूर (नळदुर्ग) कडे प्रस्थान होईल. ३ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता मैलारपूर (नळदुर्ग) मंदिरात खंडोबाचे आगमन होईल व नंतर विधीवत प्रतिष्ठापना केली जाईल. यात्रेनिमित्त श्री. खंडोबाच्या मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

भाविकांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. श्री खंडोबा मंदिर समिती व श्री खंडोबा यात्रा कमिटी यात्रा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. या यात्रेनिमित्त मंदिर व परिसरात रंगरंगोटी करून विद्युत रोशनाई करण्यात आली आहे.

## तुळजाभवानी महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रा. धनंजय लोंढे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ. गायकवाड यांनी संविधान उद्देशिकाचे सामुदायिक वाचन घेतले. सदर प्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.व्ही. एच. चव्हाण, प्रा. वागदकर एस.पी. यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिर जीर्णोध्दारास प्रारंभ...

## पुजारी, भाविकांच्या कामाबाबत सूचनांना प्राधान्य : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**
कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तिर्थक्षेत्राचा संपुर्ण कायापालट करण्यासाठी दोन हजार कोटींची आराखडा अंतिम करण्यात आला आहे. हा विकास आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला आहे. लवकरच त्यास मान्यता मिळेल आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. दरम्यान मंदिर समितीच्या स्वनिधीतून ६० कोटी रुपयांची कामे हाती घेतली आहेत. यातून तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. पुजारी वर्ग आणि भाविकांच्या या कामाबाबतच्या सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी गुरुवारी बैठकीचे आयोजनही करण्यात आले आहे. त्यानुसार जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

तुळजाभवानी मंदिर समितीच्या स्वनिधीमधून मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात आले आहे. पुरातत्व खात्याच्या निगराणीखाली कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराच्या सभामंडपचा काही भाग पूर्ण उकलून पुन्हा नव्याने मजबूत केला जाणार आहे. मंदिरासह आसपासचा भागही मोकळा करून घेतला जाणार आहे. त्यासाठी मंदिरातील ओवऱ्या थोड्या मागे घेण्यात येणार आहेत. मंदिर आणि परिसरातील कामाची प्रत्यक्ष सुरुवात लवकरच केली जात आहे. यापूर्वीच कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. पुढील वर्षभरात हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरम्यान भाविक, पुजारी बांधव आणि व्यापारी वर्गाला त्याचा त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा दर्जा आणि भाविकांच्या सोयी-सुविधांमध्ये यामुळे मोठी गुणात्मक वाढ होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी राज्य आणि देशभरातून येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेवून मंदिराच्या जीर्णोध्दार कामाचे नियोजन करण्यात आले आहे. काम सुरू असताना भाविकांना तुळजाभवानी देवीचे दर्शन घेता येईल, याकडे विचारपूर्वक लक्ष देण्यात येत आहे.

सर्वात महत्वाची बाब म्हणजे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या ज्येष्ठ आणि दिव्यांग भाविकांच्या सुविधेसाठी पुढील काळात लिफ्ट आणि रॅम्पची व्यवस्थाही केली जाणार आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनानंतर अत्यंत उत्साहामध्ये आणि समाधानाने प्रत्येक भक्त आपल्या घरी जावा, असेही नियोजन आम्ही करीत आहोत.

मंदिरात नव्याने केलेले बांधकाम काढणे, भुयारी मार्ग, यज्ञमंडप, सभा मंडप व भवानी शंकर मंदिराचे जतन व दुरूस्ती केली जाणार आहे. त्याचबरोबर कार्यालयीन प्रशासकीय इमारती, पोलीस चौकी, खुला प्रेक्षा मंच आदी नव्याने केलेली बांधकाम काढली जाणार आहेत. गोमुखतीर्थ, दत्त मंदिर, मातंगी मंदिर, कल्लोळतीर्थ, निंबाळकरद्वार, मार्तंड ऋषी मंदिर, टोळ भैरव मंदिर, दीपमाळ, शिवाजी महाद्वार व खंडोबा मंदिर, यमाई मंदिराच्या जतन आणि दुरूस्तीचे कामही केले जाणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात तुकोजीबुवा मठाकडील दगडी संरक्षण भिंत, दगडी फरशा, आवश्यकतेनुसार दगडी पायऱ्या, महावस्त्र अर्पण केंद्राचेही जतन आणि दुरूस्तीचे काम नियोजित आहे. तुकोजीबुवा मठावरील ओव्हर्या, आराध्य खोली, दगडी फरशी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, तुळजाभवानी देवीचे मुख्य प्रवेशद्वार, त्याचबरोबर जिजामाता महाद्वाराची देखील दुरूस्ती आणि जतन केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितली.

# महायुतीला लोकसभेची चुक विधानसभा निवडणुकीत नडली..! कळंब तालुक्यात लाडकी बहीण रुसली

## तेरणा पट्ट्यात मॅजिक...

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२७ नोव्हेंबर -**

वीस तारखेला झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे कैलास पाटील मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. आजपर्यंत सद्यस्थितीत व याआधीही मतदारसंघातील लोकप्रतिनिधी हा सत्तेच्या विरोधातील निवडून आलेला आहे. साहजिकच यामुळे मतदारसंघात विकास कामावर फटका बसलेला दिसुन येतो.

विधानसभा निवडणुकीतच्या कांही दिवस अगोदर लोकसभेची निवडणूक पार पडली. यावेळी ओमराजे हे महाविकास आघाडीचे फिक्स उमेदवार असल्याने त्यांनी प्रचार यंत्रणा जोरात राबवून कमांड मिळवली होती. त्यावेळी महायुतीकडून उमेदवारी कोणाला देयची यातच वेळ गेला..? याचा फटका महायुतीला बसलेला दिसुन आला. काल झालेल्या वीस तारखेच्या निवडणुकीतूनही असेच चित्र महायुतीकडून पाहायला मिळाले याची किंमत महायुतीला मोजावी लागली. कळंब-उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात महायुतीकधून कोणत्या मित्रपक्षला जागा देयची.?

उमेदवार कोण देयचा..? यातच बरच पाणी पुलाखालून गेले. यातच भर शिंदे सेवेतून अनेक इच्छुक बसिंग बांधून अडून बसले होते. मात्र मुंबईतून सूत्र हालली भाजपाचे कळंब तालुका अध्यक्ष अजित पिंगळे यांचा शिंदे सेनेत प्रवेश होऊन उमेदवारी घोषित झाली. तोपर्यंत मतदारसंघात महायुतीला प्रचाराला वेळ निघून गेला होता. हिकडं महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास पाटील यांची उमेदवारी उद्धव ठाकरे यांनी आधीच घोषित केल्याने त्यांना मतदारसंघात प्रचाराला पूर्णवेळ मिळाल्याने त्यांनी कमांड सांभाळली.

महायुतीकधून अजित पिंगळे शिंदे सेनेचा कांही नेते व भाजपाच्या नेते कार्यकर्त्यांनी कमी वेळेत प्रचार यंत्रणा राबवली. इच्छुक उमेदवार यांची नाराजी खुद्द एकनाथ शिंदे यांच्या टीमकडूनच काढावी लागल्याने सेनेतीलच अंतर्गत नाराजीने कार्यकर्ता घडी विस्कळीत झाली. याचाही परिणाम शिंदे सेनेच्या पराभवाचे कारण असल्याचे चर्चेतून कळते.

लाडकी बहीण म्हणून महायुतीकडून जोरदार प्रचार झाला मात्र कळंब




तालुक्यात लाडकी बहीण कुठे रुसली तर कुठं आंनदी असे चित्र झाल्याने महिला मतांची विभागणी होऊन याचाही परिणाम महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांना झाल्याचे दिसते.

सोशियल मीडियावरून मराठा आरक्षण प्रचार झाल्याने याचाही परिणाम महायुतीला बसल्याचे दिसते. कळंब शहरात अजित पिंगळे व कैलास पाटील यांच्यात जोरदार फाईट पाहायला मिळाली तर तालुक्यातील मोठी गावे कैलास पाटील यांच्यासाठी निर्णायक ठरली.

भाजपाचे नेते आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कळंब तालुक्यातील त्यांची जुनी टीम सक्रिय करून शेवटच्या सप्ताहात प्रचार यंत्रणा पळवली होती. महायुतीचे मित्र पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्याकधून प्रदेश अध्यक्ष वक्तासेल सुशील शेळके यांनी सक्रिय प्रचार केला मात्र स्वतःला मोठा नेता समजणारी राष्ट्रवादीची मंडळी सक्रिय न दिसल्याने राष्ट्रवादी पक्षाचे अस्तित्व आहे का हेही तेवढेच खरे परिनामी याचाही फटका महायुती उमेदवाराला बसल्याचे दिसते. तेरणा कारखान्याच्या ऊस क्षेत्रातील खामसवाडी, मोहा, मंगरूळ, ढोकी, तडवळा आदी गावात कैलास पाटील यांच्याकडे मताचा कौल मिळाला आहे. शिंदे शिवसेनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष सुरज साळुंके, कळंबचे माजी नगराध्यक्ष शिवाजी कापसे, युवा नेते अनिल खोचरे यांची जोरदार राजकीय फिल्डिंग लावली होती.

मात्र पक्षाला उशिरा मिळालेली उमेदवारी कमी वेळ यामुळं यांनाही एकतर्फी झुंज कांही गावात व कळंब शहरात बरोबरीत असल्याचे चित्र दिसले.

एकंदरीत कळंब-धाराशिव विधानसभा मतदारसंघात सुरुवातीपासूनच नियोजबद्ध फिल्डींग, सक्रिय प्रचार यंत्रणा, पाहुण्यांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी यावर कैलास पाटील यांनी आपली धुरा सांभाळली. महायुतीचे उमेदवारी शेवटपर्यंत कोणाला मिळणार याचा संभ्रम.? प्रचाराचे अपुरे दिवस, महायुतीतील रुसवे फुगवी, प्रचारासाठी मिळालेला अपुरा वेळ यामुळे महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला.

लोकसभेसारखीच गत विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराच्या बाबतीत झाल्याने कैलास पाटील मोठ्या मताधिक्याने निवडुन आले. राज्यात महायुतीला लाडकी बहीण हसली मात्र कळंब-धाराशिव विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण रुसली हे विशेष...!

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**



येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, अकॅडमीक डीन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभाग प्रमुख डॉ.डी.डी. दाते, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. उषा वडणे, प्रा. सुनीता गुंजाळ, प्रा. सुजाता गायकवाड, प्रा. आरती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. माने म्हणाले की भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाले असून आपल्यासाठी हा दिवस आनंदाचा आहे. हा दिवस सुवर्ण अक्षराने भारताच्या इतिहासात लिहिला गेलेला आहे. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी संविधानाविषयी माहिती करून त्याविषयी आपल्या मनात नितांत आदर आणि प्रेम असले पाहिजे.

यावेळी कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनीता गुंजाळ संविधानाविषयी बोलताना म्हणाल्या की, संविधानामुळे देशाची राज्यघटना तयार झाली असून भारतातील विविध धर्म, जाती आणि करोडो लोकसंख्येला एक देश म्हणून एकत्रित करणारी ही राज्यघटना आहे. या राज्यघटनेने आपल्या प्रत्येकाला आपले मूलभूत अधिकार बहाल केले आहेत.

यावेळी विद्यार्थ्यांमधून अक्षय माळी, वर्षा पाटील, वैष्णवी उबाळे यांनी संविधानाविषयी महत्त्व आपल्या विचारातून व्यक्त केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाचे सामूहिक वाचन करून शपथ घेतली. या सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# नॅचरल शुगरचे किण्वन प्रक्रीया केलेले सेंद्रीय खत (एफओएम) प्रकल्पाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ नोव्हेंबर -**



नॅचरल उद्योगात उभारणी केलेल्या किण्वय प्रक्रीया केलेले सेंद्रीय खत (एफओएम) या प्रकल्पाचा शुभारंभ विद्या शितोळे, विभागीय उपायुक्त, कौशल्य विकास, छत्रपती संभाजीनगर यांचे हस्ते मंगळवार दि.२६ नोव्हेंबर रोजी करण्यात आला.

या प्रसंगी बोलतांना विद्या शितोळे, विभागीय उपायुक्त, कौशल्य विकास यांनी नॅचरल उद्योग व नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांची दूरदृष्टी व कल्पकता ही कौतुकास्पद असून तरूण उद्योजकांना नवी उमेद निर्माण करणारी व मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. नॅचरल उद्योगातील सेंद्रीय खत, पोटॅश खत, सल्फर निर्मिती ही उत्पादने शेतीसाठी वरदान असल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी बोलताना कृषिरत्न बी.बी. ठोंबरे, अध्यक्ष नॅचरल उद्योग यांनी सांगितले की, सद्यस्थितीत गोठ्यातील गुरांची संख्या कमी झाल्यामुळे शेणखता सारख्या सेंद्रिय खतांची उपलब्धता कमी झालेली आहे. जमिनीचा पोत अबाधित ठेवण्यासाठी कृषी विद्यापीठाकडून रासायनिक खतांसोबत दहा ते वीस बैलगाड्या सेंद्रिय खतांचा वापर करण्याबाबत शिफारस केली जाते, मात्र सेंद्रिय खतांची उपलब्धता कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांकडून फक्त रासायनिक खतांचा वापर केला जातो, परिणामी जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण प्रचंड वेगाने कमी होत आहे व जमिनी क्षारपड होत आहेत. शेतकऱ्यांना सेंद्रिय खते उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने भारत सरकारने किण्वन प्रक्रिया केलेले सेंद्रिय (एफओएम) खत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना रासायनिक खत पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने नॅचरल शुगर कारखान्याच्या वतीने सीएनजी प्लांटमध्ये तयार झालेले व किण्वन प्रक्रिया केलेले सेंद्रिय खत अर्थात फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर (एफओएम) उत्पादित करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला असून त्याचा आज शुभारंभ करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीसाठी जास्तीत जास्त सेंद्रीय (एफओएम) खताचा वापर करावा असे आवाहान ही त्यांनी या प्रसंगी केले.

सदर प्रकल्प शुभारंभ प्रसंगी कारखान्याचे जेष्ठ संचालक ज्ञानेश्वराव काळदाते, संचालक पांडुरंग आवाड, हर्षल ठोंबरे, कारखान्याचे जनरल मॅनेजर यु.डी. दिवेकर, कारखान्याचे प्रवर्तक सभासद शेतकरी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सावंत पती-पत्नींच्या हस्ते 'तेरणा'चा मोळी पूजनाने गळीत हंगामाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

जिल्ह्यातील डोकी येथील भैरवनाथ शुगर वर्क्स लि. युनिट क्र.-६ चा दुसरा गळीत हंगामाचा शुभारंभ कारखान्याचे कार्यकारी संचालक विक्रम उर्फ केशव सावंत व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते दि.२५ नोव्हेंबर रोजी पार पडला.

महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी पहिल्या २०२३-२४ च्या गळीत हंगामात शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा शब्द मोळी पूजना दिवशीच दिला होता. कारखान्यास ऊस दिलेल्या शेतकऱ्यांच्या उसाला २ हजार ८२५ रुपये सर्वाधिक उच्चांकी दर देऊन शब्द पाळला आहे. त्याबरोबरच आ प्रा.डॉ. सावंत यांनी चालू गळीत हंगामाच्या शेतकरी स्नेह मेळाव्यातच परिसरातील इतर सर्व कारखान्याच्या तुलनेत या वर्षी देखील इतर कारखान्यांपेक्षा प्रती मेट्रीक टनास ५१ रुपये जास्ती दर देण्याचे जाहीर केलेले आहे.

यावेळी ढोकीचे उपसरपंच अमोल समुद्रे, शिवसेना तालुकाप्रमुख अजित लाकाळ, गफार काझी, संग्राम देशमुख, दत्ताभाऊ तिवारी, अमोल पाटील, राजपाल देशमुख, राहुल वाकुरे, जे.के. काझी, एस.के. काझी, कारखान्याचे फॅक्टरी मॅनेजर देशमुख, चिफ अकौंटंट बिराजदार, चिफ केमिस्ट आवाड, मुख्य शेती अधिकारी पुंड, डिस्टलरी मॅनेजर पाटील, शिरसाठ यांच्यासह कारखाना परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व हितचिंतक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधानात देशाची समता, समानता, एकात्मता आणि अंखडता : खारवे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**

भारतीय संविधानात नागरीकांचे मुलभुत अधिकार आणि कर्तव्य यांना खुप महत्त्व दिलेले आहेत.देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे देशाची एकता एकात्मता समता समानता आणि अखंडता व जगातील सर्वात मोठे आणि महान असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास प्रत्येक घरात पोहोचविण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यायला हवा असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडियम स्कुलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती खारवे यांनी केले.

नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लिश मेडीयम स्कुल मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी ते बोलत होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून संविधानाची प्रास्ताविका वाचन करण्यात आले.

त्याचबरोबर नळदुर्ग बसस्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकामध्ये स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कुलचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक संजय बताले यांच्या हस्ते संविधान फलकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच यावेळी संविधानाच्या प्रतिमाचे पुजन करण्यात आले. यावेळी बौद्धाचार्य दादासाहेब



बनसोडे व अदिनाथ बागडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नागरिक बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

# कसबे तडवळे जि.प. कन्या शाळेत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**क. तडवळे, दि.२७ नोव्हेंबर -**

आदर्श कन्या प्राथमिक शाळेत संविधानाचा ७५ वा वर्धापन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ढोकी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे पुढे म्हणाले की, भारत देश विस्ताराने मोठा असून केवळ संविधानामुळे एक संघ राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांसाठी संविधान देऊन पुढे जगातील सर्वात मोठी लोकशाही देण्याचे काम केले.

संविधान दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त ते जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा तडवळे येथे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

शाळेतील विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी आकलन, आकलनयुक्त अभ्यास व सराव त्रिसूत्रीचा वापर करावा असे सांगितले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधानाच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून



गावच्या सरपंच स्वाती जमाले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ भोसले, उपाध्यक्ष शुभांगी करंजकर, काळे, होगले, ठाणे अंमलदार गजेंद्र गुंजकर, जयहिंद विद्यालयाचे मुख्याध्यापक गाढवे केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक पवार, जमाले सेवानिवृत्त शिक्षक लांडगे, केंद्रप्रमुख जगदीश जाकते उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते शाळेतील ७५ विद्यार्थिनींना त्यांनी खरेदी केलेल्या संविधानाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक जगन्नाथ धायगुडे यांनी केले.

संविधान दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थिनी मृत्युंजय लांडगे, स्नेहा मगरे, शिवानी भोरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी सहकार्य केले.

## शौचालय सुरू करण्याची मागणी

**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

वार्ड क्रमांक ११, न.प.शाळा क्र.३ व सांजा रोड जवळील शौचालय बंदावस्थेत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना शौचास जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगर परिषदेच्यावतीने बांधलेली शौचालय ही फक्त शोभेची वस्तू बनली आहेत. त्याचा वापर करता येत नसल्यामुळे असून अडचण अन् नसून खोळंबा अशी अवस्था या शौचालयाची झाली आहे. अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनविसेनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी केली आहे.

# भारतीय संविधान जगातील सर्वश्रेष्ठ संविधान होय : प्रा. उत्तम कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**

संविधान म्हणजे कायदा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती धर्माचा विचार करून अनेक देशाचे संविधान वाचून भारतीय संविधान सविस्तरपणे लिहिले, असे प्रतिपादन प्रा. उत्तम कोकाटे यांनी केले.

श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा येथे सांस्कृतीक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान सन्मान दिन साजरा करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव उपस्थित होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. महेशकुमार माने, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. हरिश्चंद्र गायकवाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शहाजी चंदनशिवे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. अमर गोरे पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. उत्तम कोकाटे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की भारतीय संविधानाची प्रास्ताविका ही संपूर्ण संविधानाची उद्देशिका आहे. त्यामध्ये सर्वप्रथम आम्ही भारतीय आहोत व शेवटी हे संविधान अंगीकृत करत आहोत या दोनच शब्द संपूर्ण भारतीय संविधानाची ओळख निर्माण होते. पुढे बोलताना प्रा. उत्तम कोकाटे म्हणाले की संविधान म्हणजे कायदा आहे.

स्वातंत्र्यापूर्वी आपण एकत्र नव्हतो विखुरलेले होतो संविधानाने मी ला आम्ही केले आमच्या देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यात मोठी दरी असणार नाही देशाच्या संपत्तीवर सर्वाचा हक्क असेल संपत्तीचे काही मोजक्या लोकांच्या केंद्रीकरण होणार नाही याची काळजी घेतली जाईल असे या संविधानामध्ये नमूद केले आहे. आम्ही भारताचे लोक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा सामाजिक न्याय आर्थिक न्याय राजनैतिक न्याय विचार स्वातंत्र्य अभिव्यक्ती स्वातंत्र्य विश्वास स्वातंत्र्य श्रद्धा व उपासना स्वातंत्र्य दर्जाची समानता संधीची समानता व्यक्तीची प्रतिष्ठा राष्ट्राची एकात्मता बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्प पूर्वक निर्धार अंगीकृत अधिनियमित अशा संविधानाच्या प्रास्ताविकेमधील प्रत्येक शब्दाचा अर्थ विश्लेषण करून संविधान सांगण्याचा प्रयत्न प्रा उत्तम कोकाटे यांनी केला.

यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ वरिष्ठ भागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन खरेदी ओलावा १२ ऐवजी १५ टक्के तसेच १९ क्विंटल खरेदी करावी : संजय पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

शासनाने सोयाबीन खरेदी करताना ओलावा १२ ऐवजी १५ टक्के वाढ करावा तसेच एक हेक्टरला १२ ऐवजी १९ क्विंटल खरेदी करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी केली आहे. याबाबत पुणे सहकार व पणनचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा यांच्याकडे शुक्रवारी (दि.२२) निवेदन दिले आहे.



या निवदेनात दुधगावकर यांनी म्हंटले आहे की, मराठवाड्यात खरीपामध्ये सोयाबीन पेरणी मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये ९० टक्के सोयाबीनची पेरणी झालेली आहे. शेतकऱ्यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामध्ये सोयाबीन काढलेले आहे. पावसाळ्यामध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे अतोनात नुकसान झालेले आहे. सोयाबीन मधील आरद्रता (हवा) थंड हवामानामुळे कमी होत नाही. त्यामुळे शासनाने ४८९२ रुपये प्रती क्विंटलप्रमाणे सोयाबीन खरेदी करत असताना त्यामधील ओलावा (हवा) १२ ऐवजी १५ टक्के वाढ करावी व सोयाबीन खरदी करताना हेक्टरी १२ ऐवजी १९ क्विंटल खरेदी करावी व जिल्ह्यामध्ये अजुन नव्याने दहा खरेदी केंद्र ताबडतोब चालु करावीत. ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन कमी पैशात विकावे लागणार नाही.

तसेच व्यापारी शेतकऱ्यांचे सोयाबीन कमी पैशात खरेदी करणार नाहीत व यामुळे शेतकऱ्यांचे आर्थीक संकट टळेल. त्यासाठी संबंधीतांना त्वरीत आदेशीत करावे ही विंनती जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगांवकर यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### वलांडी येथे कवी संमेलन

**वलांडी, दि. २७ नोव्हेंबर-**

तालुक्यातील वलांडी येथे शेरे हिंद हजरत टिपु सुल्तान यांच्या जयंती निमित्त मूशायरा कवी संमेलनाचे आयोजन ह, टिपु विचार मंचच्या वतिने करण्यात आले होते.या कवी संमेलनात नामवंत हास्य कावी मूजावर मालेगावी, कवीता शाहीन,श्याम माने,परीतोष कूलकर्णी, सूमीत हसाळे,अझहर शेख,आदी कवीचा समावेश होता. तर कार्यक्रमाची सुरुवात ही शहीद टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण सर्वप्रथम अभय साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभय साळुंके यांनी सांगीतले की, शहीद टिपू सुलतान यांचे विचार व आदर्श अमलात आणले पाहिजे.डॅल्बी व डिजे न लावता काव्य संमेलन व व्याख्यानातून नागरीकांना त्यांचे विचार आदर्श आचरणात घेता येतील हीच खऱ्या अर्थाने शहीद टिपू सुलतान यांना शब्द सूमणांजली राहील असे व्यक्त त्यांनी केले. व आलेल्या सर्व कवींनी आपल्या शब्द सूमनाने नागरीकांची मने वेधून घेतली होती. या कवी संमेलनातून शहीद टिपू यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार धर्माजी सोनकवडे, माजी सरपंच राम भंडारे,सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, मकबूल मकबूल वलांडीकर,सूरेंद्र अंबूलगे, हकीम बौडीवाले, हसन मोमीन, मूकेश सूडे,विलास वाघमारे, नरेश बिरादार उपस्थित होते.प्रमूख अतिथी म्हणून अहमद सरवर, एफ.एम. सलीम सय्यद हैदराबाद आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी हमीद तांबोळी, अक्रम शेख, मकसूद जमिनदार, अहेमद पठाण, बाबूलाल पठाण, मन्नान शेख आदींनी परीश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्राध्यापक ताजोद्दीन सय्यद यांनी मानले.



### शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय दुग्ध दिवस साजरा

**उदगीर, दि. २७ नोव्हेंबर-**

शिवाजी महाविद्यालयात दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय दुग्ध दिवस भारतीय दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांना सन्मानित करण्यासाठी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस.डी. कल्याणकर सहयोगी प्राध्यापक दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय उदगीर, डॉ.एस.एन.लांडगे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर, आयक्वेशी सेलचे समन्वयक डॉ.व्ही.एम.पवार, दुग्धशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रंजन येडतकर यांची होती. सर्वप्रथम भारतीय दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ.एस.डी. कल्याणकर यांचे दुग्धशास्त्र व टीकाऊ शेती' या विषयावर व्याख्यान झाले. आयक्वेशी सेलचे समन्वयक डॉ.पवार यांनी कुरियन यांच्या I Too Had a Dream या ग्रंथाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रथम वर्षातील विद्यार्थीनी अक्षरा कांबळे यांनी प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रा. रंजन येडतकर यांनी तर आभार शिवलीला पाटील यांनी मानले. या कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयाचे के.व्ही.जाधव, प्रयोगशाळा सहाय्यक एस. एम. मुंडे, आर.डी. दर्वेशवार व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

### महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क (फ्रीशिप), राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजनेचा लाभ दिला जातो. या योजनांसाठी सन २०२४-२५ या वर्षासाठी नवीन अर्ज भरण्यासाठी २५ जुलै पासून महाडीबीटी पोर्टल सुरु करण्यात आले आहे. ८ जानेवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संबंधित महाविद्यालयांत राबविण्यात येणारे अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्कांची मंजूरी, विद्यापिठांमार्फत दिली जाणारी इतर शुल्काची मंजूरी व शैक्षणिक विभाग, शासकीय यंत्रणा यांच्याकडून घेण्यात येणारी मंजूरी या सर्व बाबींची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधित लिपीक कर्मचारी यांची असल्याने या कामकाजास प्राधान्य देण्यात यावे.महाविद्यालयामध्ये स्थापन करण्यात आलेल्या समान संधी केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाबाबतच्या अडचणी सोडवाव्यात. विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिरे आयोजित करून निर्धारित वेळेत शिष्यवृत्ती अर्ज नोंदणी पूर्ण करावी. सर्व प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज अचूक भरून मंजुरीसाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयाकडे विहीत मुदतीत ऑनलाईन सादर करावेत. महाविद्यालय स्तरावर अथवा विद्यार्थी लॉगीनवर अर्ज प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी आर्थिक जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील, असे समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी कळविले आहे.

### सैनिक कल्याण कार्यालयाच्या आस्थापनेवर अशासकीय माळी पदाची भरती

**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचे आस्थापनेवरील माजी सैनिक विश्रामगृह, मल्टीपरपज हॉल येथे अशासकीय माळी पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमाहा रक्कम रुपये १३ हजार ८९ प्रमाणे भरण्यात येणार आहे. ज्यांना माळी कामाचा अनुभव असेल, अशा महिला उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तरी इच्छूक माजी सैनिक, विधवा व नागरी जीवनातील पुरुष, महिला उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे स्वत: उपस्थित राहावे निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

# ओबीसी-भटके विमुक्त बलुतेदार आरक्षणासाठी न्या. रोहिणी आयोगाच्या शिफारसी लागू करा : वनारसे

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

देशभरातील ओबीसी -भटके विमुक्त बलुतेदार इतर मागासवर्गीयांना प्रवर्गातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने न्या.रोहिणी आयोग स्थापन केला होता. या आयोगाने त्यांचा अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे ३१ जुलै २०२३ रोजीच सादर केला आहे. परंतु,४८४ दिवस लोटूनही अद्याप आयोगाच्या शिफारसींसंबंधी कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही म्हणून दिल्ली येथे गृहमंत्री अमित शहा यांना भेटून निवेदन सादर करणार अशी माहिती राष्ट्रीय संत संदेश पक्ष चे अध्यक्ष राजेंद्र वनारसे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

आयोगाच्या शिफारसी तात्काळ लागू करण्यात याव्यात या मागणीसाठी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू महोदया यांचीही भेट घेणार असल्याचे वनारसे यांनी पत्रकात नमूद केले आहे.

न्या.रोहिणी आयोगाच्या शिफारसी वंचित घटकांना योग्य न्याय देऊ शकतात. आयोगाच्या शिफारसी लागू झाल्या तर ओबीसी मधील उपेक्षित घटकांना विकासधारेत आणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर ओबीसी सह संपूर्ण देशाचा विश्वास आहे.नुकत्याच झालेल्या विविध राज्यातील विधानसभा निवडणुकीत विरोधकांकडून जाती-पाती संदर्भात केल्या गेलेल्या राजकारणाला न्या.रोहिणी आयोगाच्या शिफारसी लागू करून मोदी सरकार चोख प्रत्युत्तर देऊ शकते,असे वनारसे यांनी व्यक्त केले. संसदेचे अधिवेशन सुरू आहे.सरकारने त्यामुळे सभागृहात देखील आयोगाच्या शिफारसींसंबंधी चर्चा करावी. देशातील इतर मागासवर्गीयांच्या ओबीसी उप-वर्गीकरणासाठी २



ऑक्टोबर २०१७ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती जी.रोहिणी यांच्या अध्यक्षतेखाली 'रोहिणी आयोग' स्थापन करण्यात आला होता. अनेक वेळा मुदतवाढ दिल्यानंतर रोहिणी आयागाने तब्बल सहा वर्षांनी त्यांचा अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सादर केला. उपेक्षित, वंचित असलेल्या ओबीसींच्या न्याय हक्कासाठी हा अहवाल सार्वजनिक करावा,अशी मागणी देखील वनारसे यांनी केली. ओबीसींसाठी आरक्षणाच्या लाभांच्या असमान वाटपाच्या मर्यादेचे परीक्षण करणे आणि ओबीसींच्या उप-वर्गीकरणासाठी शास्त्रोक्त पद्धतीने यंत्रणा,निकष आणि मापदंड तयार करण्याची महत्वाची जबाबदारी इतर मागासवर्गीय आयोगाने 'रोहिणी आयोगा'कडे सोपवली होती. ओबीसींच्या केंद्रीय यादीतील विविध नोंदींचा अभ्यास करण्याचे आणि कोणत्याही डुप्लिकेशन, अस्पष्टता यांसारख्या त्रुटींमध्ये सुधारणा करण्याची शिफारस करण्याचे काम देखील आयोगाकडे सोपवण्यात आले होते.प्रत्येक ब्लॉकसाठी आरक्षणाची टक्केवारी मर्यादित करून ओबीसी प्रवर्गातील दुर्बल जातींना सशक्त समाजाच्या बरोबरीने आणण्याचा उप-वर्गीकरण करण्यामागचे मूळ उद्दिष्ट होते.हे मुळे उद्दिष्ट साध्य झाल्यास वंचितांना न्याय मिळेल, असा दावा राजेंद्र वनारसे यांनी केला आहे.

## यंग लीडर्स डायलॉग चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन

**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

भारत सरकारमार्फत विकसित भारत युवा नेते संवाद म्हणून राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यादरम्यान देशभरातून निवडलेले ३ हजार तरुण, तरुणी १२ व १३ जानेवारी, २०२५ या कालावधीत नवी दिल्ली येथे मा. पंतप्रधान यांच्यासमोर विकसित भारत विषयी त्यांचे व्हिजन मांडतील. चर्चासत्र काळात तरुणांना देश-विदेशातील तरुण आयकॉन्सशी चर्चा करण्याची व शिकण्याची अनेक संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाचा उद्देश देशभरातील तरुण नेतृत्व प्रतिभेचा शोध घेणे आणि त्यांचे संगोपन करणे, विकसित भारताविषयी त्यांची दृष्टी स्पष्ट करण्यासाठी तरुणांना एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे तरुणांना सर्वोच्च निर्णय घेणारे आणि प्रसिध्द जागतिक आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्वाशी जोडणे आणि विकसित भारताचे नेतृत्व करण्यासाठी तरुणांना सक्षम करणे असा आहे.

**चार टप्प्यात होणार निवड**

विकसित भारत यंग लीडर्स चर्चासत्राच्या माध्यमातून या तरुणाची चार टप्प्यात विकसित भारत प्रश्न मंजुषा ऑनलाईन पध्दतीने आयोजित केली जाईल. ज्यामध्ये वय वर्षे १५ ते २९ वयोगटातील युवक https://mybharat.gov.in पोर्टलवर नोंदणी करुन भाग घेवू शकतात. पहिल्या टप्यातील निवडलेले तरुण दुसऱ्या टप्यातील विकास भारत ब्लॉग, निबंध स्पर्धेत सहभागी होतील, आणि तिसऱ्या टप्यातील विजेते अंतिम टप्यातील विकसित भारत राष्ट्रीय चॅम्पिअनशिपमध्ये सहभागी होतील. पहिला टप्पा २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२४ या कालावधीत भारत सरकारच्या पोर्टलवर आयोजित केला जाईल. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ विकास भारत यंग लीडर्स डायलॉगमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लातूर नेहरु युवा केंद्र जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैय्या यांनी केले आहे.



## डॉ. वर्गीस कुरियन यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. २७ नोव्हेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात दुग्धशास्त्र विभागात धवल क्रांतीचे प्रणेते डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, प्रा. डॉ. ए. एस. होनकर, प्रा. डॉ. जे. सी. तोंडारे, प्रा. विशाल रंगवाळ, प्रा. एस. एम. गायकवाड, प्रा. डॉ. जी. जी. जेवळीकर, प्रा. डॉ. ई. डी. कोरपकवाड आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थिती होती.

## अनुसूचित जाती, नवबौध्द समाजातीसाठी मार्जिन मनी योजना

**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णय ९ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या योजनेकरिता नवउद्योजक इच्छूक लाभार्थ्यींनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय लातूर यांच्याकडे शासन निर्णयातील नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन करावा. ३१ डिसेंबर, २०२४ पूर्वी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्या कार्यालयात आपला प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस.एन. चिकुर्ते यांनी केले आहे.

## नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पुर्व परीक्षा २०२४ रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता ते दुपारी १२ पर्यंत व दुपारी ३ ते ५ पर्यंत दोन सत्रामध्ये आयोजित केलेली आहे. त्याअनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

लातूर शहरात बार्शी रोड येथील दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स अँन्ड बीसीए, अंबोजोगाई रोड लातूर येथील कॉलेज ऑफ कम्प्युटर सायंस अँन्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी (कॉक्सिट), नांदेड रोड येथील यशवंत विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगर येथील परिमल माध्यमिक विद्यालय, रिंगरोड येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, खाडगाव रोड येथील सरस्वती विद्यालय , शाहु चौक नांदेड रोड येथील ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजर्षी शाहु विज्ञान व कला महाविद्यालय, खाडगाव रोड येथील श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर , सिंग्नल कँम्प लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान विद्यालय, खाडगाव रोड येथील श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय, खाडगाव रोड येथील बसवन्नाप्पा वाले न्यु इंग्लिश मेडियम स्कुल, बार्शी रोड येथील दयानंद कला महाविद्यालय , श्याम नगर येथील श्री. केशवराज विद्यालय या उपकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी, जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ नोव्हेंबर रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १० डिसेंबर रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही.

## जागतिक दिव्यांग सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**दि. २ ते ९ डिसेंबर दरम्यान आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्र, उमंग मल्टीडिसेबिल्टी सेंटर व दिव्यांग शाळा, कार्यशाळा व मतिमंद बालगृह यांच्या संयुक्त विद्यमाने ३ डिसेंबर, हा जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त २ ते ९ डिसेंबर दरम्यान दिव्यांग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या अनुषंगाने लेबर कॉलनी येथील शासकीय अंध विद्यालयात जिल्ह्यातील दिव्यांग शाळेचे मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांची समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याणचे अविनाश देवसटवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट ब विलास केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठकी घेण्यात आली. यात जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून विविध कल्पना घेण्यात आल्या. यासह २ ते ९ डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड यांनी तर आभार सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे यांनी मानले.

दिव्यांग सप्ताह अंतर्गत ९ कार्यक्रम घेण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांच्या बालगृहात दिव्यांग विद्याल्यांची नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे डोरमेन्ट्री हॉलचे उद्घाटन होणार असून दुपारी १ वाजता स्व. दगडोजीराव देशमुख सांस्कृतिक सभागृह येथे दिव्यांग शाळेतील मुला-मुलींचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कारही देण्यात येणार आहे. ४ डिसेंबर रोजी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे दिव्यांग मुलांसाठी आनंद नगरी व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ४ व ५ डिसेंबर रोजी सुआश्रय निवासी अस्थिव्यंग विद्यालय इंडिया नगर येथे भौतिक उपचार शिबीर होणार आहे. ५ डिसेंबर रोजी ११ ते २ दरम्यान दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कायदेविषयक कार्यशाळचे आयोजन व दुपारी ४ वाजता दिव्यांग मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे करण्यात येणार आहे. ६ व ७ डिसेंबर रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांचे उपचार शिबीर, वैद्यकीय तपासणी, वाचा व श्रवण तपासणी, कृत्रिम अवय मोजमाप, बुध्दांक तपासणी व समुपदेशन होणार आहे. ९ डिसेंबर रोजी श्री केशवराज विद्यालयात २१ प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गाची माहिती प्रदर्शन व जनजागृती करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांची परंपरा मराठी भाषेतच : अडसुळे

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

साहित्य, विज्ञान, आरोग्य, शेती, पर्यावरण, ज्योतिशास्त्र आदी विविध विषयांवरील ज्ञान दिवाळी अंकांच्या माध्यमातून देण्याची गेली ११५ वर्षांची परंपरा आजही कायम असून,ज्या दिवाळी अंक जगभर परसलेला मराठी वाचक त्यांचा आस्वाद घेत असतो,दिवाळी अंक काढण्याची ही अभिमानास्पद परंपरा केवळ मराठी भाषेतच आहे असे सांगून,सर्वांगसुंदर अशा भारतीय संविधानामुळेच आपण आज सुरक्षित राहून विकासाच्या वाटा धुंडाळतो आहोत,असे प्रतिपादन ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी येथे केले.

लातूरच्या हरिभाऊ नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात मंगळवार,दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान गौरव दिन आणि दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ग्रंथमित्र अडसुळे बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी साहित्यिक इंजि.हरिदास अडसुळे हे होते.

पुढे बोलताना ग्रंथमित्र अडसुळे पुढे म्हणाले की, भारतात २२ बोली भाषा आहेत, डॉ. गणेश देवी यांनी भाषेचे संशोधन करुन दहा हजार बोली भाषेची सूची केली. सुमारे सव्वाशे वर्षांपासून दिवाळी अंकांमधून सुरु असलेली ही ज्ञान गंगा अहोरात्र



वाहती ठेवण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करीत आहेत. त्याचा उपयोग करुन घ्यावा. म.ज्योतिराव फुले, सयाजीराव गायकवाड,शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनीही वसतीगृहे, शाळा, ग्रंथालये सुरुवात करुन ज्ञानाचा प्रसार केला. अलीकडे ज्ञान बंदिस्त करण्याचे कारस्थान सुरु आहे, पण ज्ञानाची किंमत ओळखून आपण त्याचा उपयोग विकासासाठी करावा. संविधानाचे वाचन प्रत्येकाने केले पाहिजे हा देश सगळ्यांचा आहे, असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात इंजि.हरिदास अडसुळे यांनी संविधानाने सर्वांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिले आहे, तथापि आज संविधानाला मोडीत काढण्याचे प्रयत्न होत आहेत, अशावेळी सर्वांनी याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी केले.ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी आभार मानले.प्रारंभी ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. मान्यवरांचे ग्रंथभेट देवून स्वागत करण्यात आले. यावेळी लिपिक संकेत होळीकर,वाचक गणपत वाव्हळे, विकी सोमवंशी, प्रल्हाद गायकवाड, कवी प्रदीप कांबळे, अर्थव कदम, आर.एन.खाडप, जे.एन.माने, किशन यमुलवाड, धनराज कांबळे, मारुती तलवारे, जी.एच. गायकवाड,पी.एन.बसपूरे, एस.एस.साबळे, आनंद अडसुळे आदींची उपस्थिती होती..

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत,** सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल




## ग्रामपंचायत कार्यालय येरोळ येथे संविधान दिन

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि. २७ नोव्हेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी गावचे सरपंच सुकुमार लोकरे यांनी ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून संविधान दिन साजरा केला. संविधानाचा आदर करत संविधानाचे तत्परतेने पालन करून देशाच्या विकासात हातभार लावला जावा यासाठी जनतेने संविधान अभ्यासून त्याचे दैनंदिन जीवनात अमल केले पाहिजे असे सरपंच सुकुमार बोलताना म्हणाल्या. याप्रसंगी प्रकाश बनसोडे, हणमंत पालकर, गणेश आप्पा येरोळकर, तानाजी महाराज दाडगे, भिवाजी लोकरे, नामदेव बनसोडे, नवनाथ जाधव, प्रकाश कांबळे, बस्वराज शिंदाळकर, बाबुराव वाघमारे, विनोद लोंढे, सरपंच सुकुमार लोकरे, निता कुलकर्णी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### जानकी महाविद्यालयात संविधान दिन

**अहमदपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

येथील जानकी महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य केतन प्रदीप खोमणे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक अजय स्वामी म्हणाले, संविधानामुळे आपण जगात खऱ्या लोकशाही मध्ये वावरत आहोत याचा आपल्याला अभिमान आहे. असे नमूद करत आपल्या देशात २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने सध्याची राज्यघटना स्वीकारली. त्यामुळे या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी सर्वत्र संविधान दिन साजरा केला जातो. याप्रसंगी प्रा. दीक्षा लामतुरे, प्रा.जोहरा देशमुख, प्रा. वैष्णवी आगलावे, प्रा. आकांक्षा जगताप, प्रा. गिरी प्रदीप, गोपाळ म्हेत्रे, प्रसाद गुंडरे, पठाण सलीम, रुद्रवाड पांडुरंग, बेंबडे उद्धव, धुळगुंडे विद्यासागर, सुचिता हारे, मजगे रोहिनी, सूर्यवंशी प्रसाद, उमादेवी गायकवाड उपस्थित होते.




### डॉ. आंबेडकरांनी संविधानात सुडाची भावना येवू दिली नाही : डॉ. सूर्यवंशी

**अहमदपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

सबंध भारतीयांसाठी भारतीय संविधान हाच पवित्र धर्मग्रंथ मानून यास समाजमान्यता द्यावी असे आग्रही प्रतिपादन युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. सम्राट मित्रमंडळाच्या वतीने आयोजीत संविधान गौरव दिन व संविधानाच्या उद्देशीकेच्या सामूहिक वाचन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी उपनगराध्यक्ष दत्तोबा कांबळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक भूसनूर, सहा.पोलीस निरीक्षक पठाण साहेब,माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे, अॅड. टी. एन. कांबळे, सामाजिक कार्यकर्ते युवानेते इमरोज पटवेगर, मोहम्मद पठाण, रिपाई तालुकाध्यक्ष अरूण वाघंबर, पीएसआय देवकत्ते आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व संविधानाच्या उद्देशीकेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी पोलीस निरीक्षक बी.डी.भूसनूर, इमरोज पटवेगर यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन सचिन बानाटे यांनी केले तर आभार अरूण वाघंबर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अण्णाराव सूर्यवंशी,दलित मित्र डॉक्टर घोटकेकर,माजी सैनिक वाघबिजे बालाजी, भुजंग शिंदे, भालेराव संभाजी, कांबळे वाल्मीक, आकाश पवार,शेख चांद सौदागर, के. के राठोड,आनंद सोनकांबळे, युवराज गायकवाड, जगदीश वाघमारे, भानुदास कांबळे,पत्रकार त्रिशरण मोहगावकर, भीमराव कांबळे, अजय भालेराव, गणेश मुंडे, शेख इब्राहीम, पत्रकार त्रिशरण वाघमारे, कैलास भालेराव, संभाजी कांबळे, आनंद सोनकांबळे, मतिन शेख आदींनी पुढाकार घेतला.

### बॅग ऑफ स्टोरीज म्हणजे नात्यातलं प्रेम वाढवणाऱ्या गोष्टी : बोरगावे

**उदगीर, दि. २७ नोव्हेंबर-**



आजी-आजोबा म्हणजे खेडेगावातल हासतं-खेळतं विद्यापीठ. जुन्या आठवणींना उजाळा देत भविष्याची दिशा दाखवत संस्काराची पेरणी करणारे खरे मार्गदर्शक. अशा कितीतरी आठवणींची साठवण असलेली बॅग ऑफ स्टोरीज म्हणजे नात्यातलं प्रेम वाढवणाऱ्या गोष्टींचा संग्रह होय असे मत संचित बोरगावे याने व्यक्त केले. आजोबा शिवाजीराव जाधव यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रम ांतर्गतच्या ३२५ व्या विशेष बाल वाचक संवादामध्ये संचित संध्याराणी रमाकांत बोरगावे, हा नांदेड येथील नागार्जून पब्लिक स्कूल मध्ये ८ व्या वर्गात शिकणारा विद्यार्थी सूधा मुर्ती लिखित ग्रॅन्ड पॅरेन्ट्स बॅग ऑफ स्टोरीज या इंग्रजी साहित्यकृतीवर सुंदर असा संवाद साधताना तो म्हणाला, वाचनाची सुरुवात करायची असेल तर हे पुस्तक वाचलं पाहिजे. नातेसंबंध जोडणे आणि नात्यातलं प्रेम वाढवण या गोष्टी शिकवणारे हे पुस्तक असून कोरोना काळात घडलेल्या घटनांचे संदर्भ देऊन आजी-आजोबांनी सांगितलेल्या या सगळ्या कथा आहेत. वाचक संवादावेळी डॉ. दत्तात्रय देवकत्ते, गट शिक्षणाधिकारी बालाजी बिरादार, प्राचार्य डॉ.शिवाजीराव सगर, तुळसीदास बिरादार, मोहन निडवंचे, गुंडप्पा पटणे यांचे सह अनेकांनी चर्चेत सहभाग नोंदवला. यावेळी अथर्व उगीले व प्रगती मुंढे या दोन बाल वाचकांनीही त्यांनी वाचलेल्या पुस्तकाबद्दल माहती सांगितली.अध्यक्षीय समारोप करताना शिवाजीराव जाधव यांनी केले. शासकीय दुध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या वाचक संवादचे सूत्रसंचालन रिझर्व्ह बँक अधिकारी मुरलीधर जाधव यांनी केले तर आभार प्रा. चिटगिरे आर.एस. यांनी मानले.

## मंदिर निर्मिती मागचा इतिहास समजून घेणे गरजेचे

**प्रसिद्ध इतिहासकार डॉ. गो.ब. देगलूरकर**

**जागतिक वारसा सप्ताह निमित्त राष्ट्रीय चर्चासत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२७ नोव्हेंबर-**

मंदिर हे साधना व उपासनेचे केंद्र असले तरी या मंदिराचे निर्मिती मागचा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे, मंदिर हे केवळ पूजास्थान नव्हे, तर ते आपल्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध इतिहासतज्ञ मंदिर व मूर्तीशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती गो.बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले. जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्त आयोजित एका राष्ट्रीय चर्चासत्रात, प्रसिद्ध इतिहासकार डॉ. गो.बं. देगलूरकर यांनी महाराष्ट्रातील मंदिरांच्या निर्मितीमागचा इतिहास उलगडून दाखवला. यावेळी बोलताना त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास, मंदिर निर्मिती, मुर्तीचे प्रयोजन इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई अंतर्गत सहायक संचालक,पुरातत्त्व विभाग,पुणे व इंडियन स्टुडंट कौन्सिल, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर दरम्यान साजरा केल्या जाणाऱ्या जागतिक वारसा सप्ताह निमित्त राष्ट्रीय चर्चासत्राचे आभासी आयोजन दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते .

या राष्ट्रीय चर्चासत्राचा विषय महाराष्ट्राचा समृध्द वारसा हा होता. मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध इतिहासतज्ञ मंदिर व मूर्तीशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती गो. बं देगलूरकर उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर देव यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलतांना प्रा.प्रभाकर देव यांनी मराठवाड्यातील मंदिरे व मूर्तीशास्त्र यांचा इतिहास उलगडून सांगताना मराठवाड्यातील व्यापार परंपरा व त्या अनुषंगाने भारताचा रोम या प्राचीन साम्राज्याशी येणारा सहसंबंध याविषयी आपले मत मांडले. प्राचीन महाराष्ट्रातील समृद्धता, व्यापारी मार्ग,व्यापारी नगरे याविषयी माहिती दिली.वस्तुसंग्रहालयांचे इतिहासातील व मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करतांना संशोधकांच्या शंकाचे निरसन केले.

याप्रसंगी प्रा.डॉ शिला स्वामी व प्रा.सिमा घोलप यांनी शोध निबंध वाचन केले.प्रसिद्ध इतिहासकार व जेष्ठ तज्ञ मार्गदर्शकांच्या म ार्गदर्शनामुळे हे चर्चासत्र फलदायी ठरले असे मत पुणे येथील पुरातत्व विभगाचे सहायक संचालक डॉ.विलास वाहणे यांनी व्यक्त केले तर या चर्चासत्रामुळे नव्याने इतिहासाची माहिती मिळाली असे मत माजी प्राचार्या मिता रामटेके यांनी मांडले. या राष्ट्रीय चर्चासत्रात इंडियन स्टुडंट कौन्सिलचे अध्यक्ष श्री ज्ञानोबा कदम यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. माधुरी राऊत यांनी चर्चासत्राच्या आयोजनाचे प्रयोजन स्पष्ट करतांना इंडीयन स्टुडंट्स कौन्सिलच्या कार्याचा आढावा घेतला. मान्यवर डॉ. गो.बं.देगलूरकर यांचा परिचय डॉ सिमा शेटे यांनी तर डॉ. प्रभाकर देव यांचा परिचय प्रा. सोनाली लांजेवार यांनी करून दिला. सूत्रसंचलन श्रीमाला के. जी.यांनी तर आभार सीमा घोलप यांनी मांडले. गुगल मीट या आभासी तंत्रज्ञानाद्वारे घेण्यात आलेल्या या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात मोठ्या प्रमाणात इतिहास प्रेमी,अभ्यासक व नव संशोधकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विलास वाहणे, डॉ. ज्ञानोबा कदम, हेमंत गोसावी, समन्वयक डॉ. माधवी महाके व इंडियन स्टुडंट कौन्सिलच्या सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



## काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांचा प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत टिळक भवन मुंबई येथे झालेल्या नवनिर्वाचित आमदार, जिल्हाध्यक्षांच्या बैठकीस आ. अमित देशमुख उपस्थित राहीले.

विधानसभा निवडणूक निकालानंतर पक्षाची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्याचर्चेत सहभाग घेतला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांचे स्वागत केले.महाराष्ट्र प्रांताध्यक्ष आमदार नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित विधानसभा सदस्य व नांदेड लोकसभेचे नवनिर्वाचित सदस्य तसेच नवनिर्वाचित सदस्यांचे संबंधित जिल्हाध्यक्ष यांची बैठक २७ नोव्हेंबर रोजी. टिळक भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीस अमित देशमुख उपस्थिती राहीले,काँग्रेस पक्षाची विधानसभा निवडणूक निकालानंतरची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्या चर्चेत सहभाग घेतला. विधानसभा निवडणूकीत काँग्रेस महाविकास आघाडीला झालेले मतदान, या अनुषंगाने पूढील काळातील नियोजन बाबत चर्चा झाली.या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अमित देशमुख यांचे स्वागत केले

## लाहोटी स्कूलची संविधान रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२७ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मंगळवारी लातुरात विविध उपक्रम ांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून लातुरातील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या वतीने शहरातून संविधान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत स्कूल मधील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या प्रम ाणात सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात स्कूलच्या प्रांगणातून प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून झाली.




स्कूलपासून मिनी मार्केट, गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क अशी ही रॅली काढण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांनी रॅलीदरम्यान संविधानाचे महत्त्व, नागरी हक्क व कर्तव्यांवर आधारित, जनजागृतीपर संदेश फलक हातात घेतले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व संविधान संविधान उद्देशिकेचे वाचन करून घेतले. राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि समता या मूल्यांचा संदेश देण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचा समारोप परत स्कूलमध्ये झाला. रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर , कॅ. बीके भालेराव, विनोद चव्हाण, सुनील मुनाळे, अरून भोगे, अमित होनमाळे, स्नेहा गोमारे, प्रियंका गडदे, विवेक डोंगरे, अनिल कांबळे आदींनी रॅली यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## रंगकर्मी प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**पुरस्काराचे नववे वर्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २७ नोव्हेंबर-**

येथील रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रातील उत्कृष्ट व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी केली आहे .रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक ,शैक्षणिक ,कृषी, आरोग्य ,पर्यावरण ,कला व साहित्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राज्यस्तरीय पुरस्काराने मागील ९ वर्षापासून मान्यवरांच्या हस्ते भव्य रपुरस्कार वितरण सोहळ्यात सन्मानित केले जाते.

रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील लघुपट महोत्सव आरोग्य शिबीर, पत्रकारिता पुरस्कार , साहित्य संमेलन, पथनाट्यातून विविध विषयावर जनजागृती, महापुरुषांच्या विचारावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा ,शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते.

मानपत्र गौरव चिन्ह असे रंगकर्मीच्या वतीने दिल्या जाणार्या पुरस्काराचे स्वरूप असून सामाजिक शैक्षणिक साहित्य कला आरोग्य पर्यावरण क्षेत्रातील उत्कृष्ट व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीस संस्थानी २०२५ च्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी दिनांक २५ डिसेंबर २०२४ पर्यंत पोहोचतील या पद्धतीने प्रस्ताव पाठवावे पुरस्कार वितरण जानेवारी शेवटच्या आठवड्यात होणार असून त्यासाठी प्रस्ताव प्रा बिभीषण मद्देवाड लोकाक्षर कार्यालय ग्रामीण पोलीस स्टेशन समोर उदगीर जिल्हा लातूर ४१३५१७ मोबाईल नंबर ९८२३१६०५५२ या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन रंगकर्मीचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड सचिव प्रा. ज्योती मद्देवाड, सिद्धार्थ सूर्यवंशी मारुती भोसले अॅड महेश मळगे महादेव खळ्रे, रसूल पठाण रामदास केदार लक्ष्मण बेंबडे, सचिन शिवशेट्टे मुख्याध्यापक दादाराव दाडगे, विवेक होळसंबरे, प्रल्हाद येवरीकर, जहॉगीर पटेल, नीता मोरे, ज्ञानेश्वर बडगे, टी. डी. पांचाळ बालाजी भोसले, अर्चना पाटील, मोहसिन शेख नारायण कुंडले, मारुती वाघमारे, गजानन देवकत्ते, हणमंत केंद्रे, नागनाथ गुट्टे, विशाल आदेप्पा आदींनी केले आहे.

## उत्कृष्ट कामगिरी नोंदवण्यासाठी खेळा : मुख्याधिकारी बोंदर

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

स्पर्धेत जिंकण्यासाठी न खेळता आपली उत्कृष्ट कामगीरी नोंदविण्यासाठी खेळल्यास यशस्वी होणारच असेप्रतिपादन नगरपरिषद उदगीरचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी आज येथे केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतिने जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे २४ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय लॉनटेनिस स्पर्धेचे उदघाटन उदगीर नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे

सहाय्यक आयुक्त बालाजी मरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उमरगा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राम कृष्ण जाधवर, सिंदखेड राजा येथील उपजिल्हाधिकारी खडसे सर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, लातूर जिल्हा लॉनटेनिस संघटनेचे अध्यक्ष एम. अहमद, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी कैलास लटके, क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, राज्यक्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, चंद्रकांत लोदगेकर, तांत्रिक समितीचे सदस्य मोहसीन खान उपस्थित होते. सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले तर आभारप्रदर्शन जयराज मुंढे यांनी केले. या स्पर्धेमध्ये राज्यातील अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, लातुर, मुंबई, पुणे व कोल्हापूर अशा आठ विभागातून ८० खेळाडू, १६ संघव्यवस्थापक, ८ तांत्रिक अधिकारी सहभागी झाले आहेत. या स्पर्धेच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

## मनं जोडण्याची परंपरा वाचनातून जोपासली जाते : कादरी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२६ नोव्हेंबर-**

माणसानं आपलं जगणं सुंदर करायचे असेल तर आहे त्याचा उत्सव करावा,जगणं सुकर करायचे तर चांगलं वाचन महत्वाचे आहे असे सांगून,माणसांची मनं जोडण्याची परंपरा वाचनातून जोपासली जाते,असे मत प्रसिध्द साहित्यिक मोहिब कादरी यांनी व्यक्त केले.

माळकोंडजी (ता.औसा) येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयात दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते.या कार्यक्रम ाच्या अध्यक्षपदी वाचनालयाचे अध्यक्ष प्रकाश विभूते हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी राम गारकर हे होते. मंचावर सत्कारमूर्ती जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर,जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका रचना पूरी,आलमलाच्या



विश्वेश्वर फार्मसीचे प्राचार्य डॉ.विश्वेश्वर धाराशिवे,साहित्यिक द.मा.माने यांची उपस्थिती होती.

प्रारंभी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन् यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते सामूहिक पूजन करुन अभिवादन करण्यात आले. मोहिब कादरी यांच्या हस्ते दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रस गी लातूर रोटरी क्लबचा डॉ.ब्रिजमोहन झंवर यांना व्यावसायिक पुरस्कार मि ळाल्याबद्दल, माळकोंडजी जि.प.शाळेला मुख्यमंत्री सुंदर शाळेचा द्वितीय पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापिका रचना पूरी, प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे यांनी पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचा उपरणे, भारताचे संविधान देवून सन्मान करण्यात आला. दहावीच्या परीक्षेंतील गुणवंत श्रध्दा विभूते, वृषभ क्षीरसागर, महेश विभूते,कराटेचा ब्लकबेल्ट विजेता पुष्कर मोरे तसेच या वर्षी या गावातील शासकीय सेवेत दाखल झालेल्या गणेश जाधव, आदिनाथ उस्तूरे, विशाल विभूते, योगेश घोंगडे, बळीराम भालेकर, ओंकार रायफळे,महादेव मुळे, ज्योतीराम सिरसाट,किरण क्षीरसागर, सुमित क्षीरसागर,अल्ताफ शेख, आरती घोंगडे ,तसेच सरपंच जयशंकर विभुते,पोलीस पाटील सौदागर माळी यांचाही म ान्यवरांच्या हस्ते भारताचे संविधान,उपरणे देवून गौरव करण्यात आला. प्रास्ताविक पांडुरंग अडसुळे यांनी केले. सूत्रसंचालन नारायण अडसुळे व बाळ होळीकर यांनी केले. ग्रंथालय संचालक पल्लवी अडसुळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सहसचिव ज्ञानोबा क्षीरसागर, ग्रंथपाल शिवलिंग अडसुळे, लिपिक रामलिंग अडसुळे, संचालक मारुती बरडे, आनंद अडसुळे, इंदु बनसोडे, काका बनसोडे, प्रकाश कांबळे, नारायण कांबळे, वसुधा मोरे, लक्ष्मण वाघमारे, दिलीप भारती, विकास साठे, आनंद कांबळे, ज्ञानोबा कांबळे, विकास पांचाळ, निकीता अडसुळे, रामदास कांबळे आदींनी सहकार्य केले.

## रोटरी क्लबतर्फे १ डिसेंबरला चित्रकला स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ नोव्हेंबर-**

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने स्व.कांतीलाल कुचेरिया यांच्या स्मरणार्थ चित्रकला स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक १ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. शहरातील प्राथमिक,माध्यमिक शाळातील मुलांसाठी या चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले जाते.स्पर्धेचे हे तिसावे वर्ष आहे. क्लबमधील सर्व सदस्यांच्या सहकार्याने ही स्पर्धा घेतली जाते.

स्पर्धेचे मुख्य प्रायोजक कुणाल सायकल वर्ल्ड यांच्याकडून स्पर्धेतील १२ विजेत्यांना १२ सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. स्टीम एज्युकेशन सेंटर आणि तिरुपती बॅटरी व प्रमोद सुपर मार्केट हे सहप्रायोजक आहेत. दिनांक १ डिसेंबर रविवार रोजी श्रीकिशन सोमानी विद्यालय कन्हेरी रोड, बुद्ध गार्डन जवळ लातूर या ठिकाणी प्राथमिक गट पहिली ते चौथी सकाळी ९.३० ते १.३० पर्यंत तर पाचवी ते दहावी दुपारी १२ ते १.३० या वेळेत स्पर्धा होणार आहे. रोटरी कडून ड्रॉइंग शीट उपलब्ध करून दिला जाणार असून इतर साहित्य व पाण्याची बॉटल मुलांनी आणावयाची आहे. पहिली ते दहावी पर्यंतच्या प्रत्येक वर्गासाठी एका सायकलसह ५ बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. मूकबधिर मुलांसाठी एक आणि मुलींसाठी एक सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहे. सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास प्रम ाणपत्र मिळणार असून शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे आवाहन चित्रकला स्पर्धेचे प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले व यश कुलकर्णी,पब्लिक इमेज डायरेक्टर श्रद्धानंद आपशेट्टी तसेच अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार यांनी केले आहे.